

मृण्मूर्ति-रंगकला-विज्ञान

अथवा

श्री गणपती वगैरे मातीच्या चित्रांवर रंग लावण्याची माहिती.

किं. १ रुपया

लेखक

गोविंद विष्णु गोखले.

गणपतीवाले

मुंबई.

का/६८

मृण्मूर्ति-रंगकला-विज्ञान.



लेखकः—गोविंद विष्णु गोखले.

मुद्रक-रा. काशिनाथ यशवंत माने स्टँडर्ड प्रेस, ७३, ७५
१ ला सुतार रस्ता गिरगांव-मुंबई.

प्रकाशक— गोखले अॅन्ड सन्स सदाशीव स्ट्रीट मुंबई नं. ४.

श्री.

मृण्मूर्ति-रंगकला-विज्ञान.

ह्या पुस्तकाचीं प्रकरणें ९ आहेत.

रंगकाम करण्याचा क्रम.

१ गणपती वगैरे मातीकाम, फुटलेतुटलेल्याची दुरुस्ती व पालीस. २ डिंक व शिरस भिजवून तयार करणें. ३ सफेता तयार करून लावणें. ४ गोरा रंग वगैरे अंगाचा रंग करून गणपती व अन्य चित्रास लावणें आणि नंतर लाली देणें. ५ वर्ख बसविण्यासाठीं चिकोटा, व गोल्ड साईस तयार करून, तें लावणें, नंतर त्यावर वर्ख बसविणें. ६ रेखणी करणें,-(डोळे गंध वगैरे.) व वर्खावरची कांठ किनारी वगैरे बारीक काम. ७ मूळ रंग आणि निरनिराळ्या प्रकारचे मिश्र रंग तयार करून ते ठिकठिकाणीं योजनेप्रमाणें लावणें. ८ बैठक, लोड, तक्या, गालीच्या वगैरेवर वेल पत्ती, व सर्पावर टिबके किंवा खवळे वगैरे देऊन सर्प रंगविणें. ९ झालेल्या रंग-कामाची भूल चूक तपासून, नंतर वारनीश लावून तें सुकल्या नंतर तें चित्र झांकून ठेवणें. या क्रमानें काम करण्याची आमची रीत आहे. जसें ज्यांच्या सोईस वाटेल तसें त्यांनीं करावें.

मृण्मूर्ति-रंगकला-विज्ञान-पुस्तकाची प्रस्तावना.

सदहू पुस्तक माझे मित्र रा. रा. गोविंद विष्णु गोखले यांनीं लिहिलें असून त्याची प्रस्तावना ग्रंथकार या नात्यानें त्यांनींच ल्याहावयाची परंतु तें काम आग्रहपूर्वक त्यांनीं माझ्यावर टाकल्यामुळें त्यांची इच्छा पुरी करणें मला भाग झालें. वास्तविक ह्मटलें तर माझा व्यवसाय निराळा व हा निराळा; परंतु "व्यसनेषु सख्यं" या न्यायानें ग्रंथकर्त्यांच्या व्यवसायाशीं त्या नादानें कां होईना बरेच कालाचा परिचय असल्या कारणानें मृण्मय वगैरे चित्रकलेवर रंग देण्याच्या माहितीचें पुस्तक अवश्य झालें पाहिजे. या विचाराचा मजकडून त्यांस पाठिंबा मिळाला, आणि त्या कामास त्यांनीं सुरवातही केली.

आतां महाराष्ट्र वाङ्मयाच्या दृष्टीनें सदर ग्रंथकार महाराष्ट्र भाषा लेखनपटु नसल्यामुळें भाषा सौष्ठवादि स्वारस्य सदर ग्रंथांत जरी नाहीं तरी मुख्यतः मूर्तिपूजेच्या धार्मिक दृष्टीनें गणपतीच्या मूर्ति बनविणें, त्यावर रंगकाम करणें, आणि त्या बरोबरच मातीच्या पुतळ्या, व पुतळा, सर्प, वाघ, वगैरे अनेक प्रकारचीं उपांगें करून जशी ज्यास्त नैसर्गिक बुद्धी असेल त्या प्रमाणें चांगलीं बनविण्याच्या कामीं अहमहमिका चालत असते, व असे हे प्रकार गांवोगांव चालत असतात, त्या शिवाय पुष्कळ लोकांचा हा उदर निर्वाहाचा धंदा होऊन बसला आहे. व जो तो आपापल्यापरी मातीकाम व रंगकाम चांगलें बनविण्याचा प्रयत्न करतो परंतु रंगकामाचें साहित्य परदेशी कां होईना, जें आज आमच्या उपयोगी पडत आहे, त्याचीं मिश्रणें कशीं करावीं, चित्राचा मोडला फुटला भाग कसा सांधावा, तसेंच मातीकामापासून तों रंगकामापर्यंत व्यवस्थितपणानें, खरेपणाचा भास दाखविण्यासारखीं कामें क्वचित दृष्टीस पडतात. मुंबईसारख्या शहरांत गणपतीच्या मूर्ती करण्याचे अनेक कारखाने आहेत; त्यांत कुणाचें कांहीं बरें साधतें तर दुसरें कसें तरी केलेलें, असेंच सर्वत्र आढळण्यांत येतें. परंतु राजश्री गोखले यानीं दरएक बाबतींत चिकित्सक बुद्धीनें लोक आपल्या

कामास कुठे नांवें ठेवतात हें आडून कां होईना परंतु लक्षपूर्वक ऐकून तें सुधारण्याच्या कामीं त्यांनीं अनेक प्रयत्न केले आहेत. तसेंच रंगकामाच्या बाबतींतहि त्यांनीं अविश्रांत श्रम केले असून त्यांचा उपयोग करण्यांत आपल्या बुद्धीचा अनेक बाबतींत उपयोग केला आहे. यामुळें त्यांनीं परिश्रमानें मिळविलेल्या माहितीचा संग्रह, त्यांच्या वृद्धावस्थेंत त्यानीं महाराष्ट्रीय जनतेला करून देण्याच्या उद्देशानें आपल्या साध्या सोप्या भाषेनें करून दिला आहे.

या दृष्टीनें या पुस्तकाची महाराष्ट्रीय वाङ्मयांत भर पडली असून या कलेची आवड नसलेल्या लोकांस आपल्या माहितीचा व अनुभवाचा उपयोग करून देऊन कायमचें ऋणी करून ठेविलें आहे, असें म्हटलें पाहिजे.

आतां सदर पुस्तक लिहिण्यास इ० स० १९१४ साला पूर्वी आरंभ करून वयमानानुरूप प्रकृतीचें मान आणि व्यवसाय सांभाळून तें पुरें करण्यास त्यांस १।२ वर्षे लागलीं. पुढें महायुद्धामुळें छपाई वगैरे महाग होऊन रंगकामाची साहित्यासंबंधीं जी माहिती दिली आहे त्या वस्तूंचे नंबर व मेकरचें नांव वगैरे वगैरे जी माहिती दिलेली आहे त्या त्या वस्तु बाजारांत येण्याचें बंद होऊन जपान वगैरे ठिकाणाहून माल येऊं लागला. अशा कांहीं कारणामुळें सदरहु पुस्तक छापण्याचें राहून गेलें. परंतु आतां कालाचा अपव्यय करणें योग्य नाहीं, असा विचार करून ग्रंथकर्त्यांनीं स ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा विचार केला. त्याचा उपयोग म्हणजे आपल्या व्यवसायाचें साधन इतकेंच नव्हे, तर आपल्या आयुष्यांत मिळविलेल्या ज्ञानाचा अपूर्व ठेवा केवळ शुद्ध बुद्धीनें जनतेच्या उपयोगी पडावा म्हणून प्रसिद्ध केला आहे. त्याचा उपयोग सदर कलेचे शोकी मंडळी व ग्रंथ संग्रह करणारे करून घेतील अशी आशा आहे.

आपला,

वैद्य हरी रामचंद्र पाठक. मुंबई.

रंगाच्या वजनमापाविषयीं खुलासा

सदर्हू पुस्तक लिहिण्याचें काम चाललें असतां प्रसंगानुसार इष्ट मित्र जवळ बोलतांना आह्मी श्रीगणेशादि चित्रकलेच्या व रंगकामाच्या माहितीचें पुस्तक लिहीत आहोंत असें म्हणत असूं, त्यावेळीं कांहीं इसम असें ह्मणत कीं, फार उत्तम काम करीत आहां. पण (त्यांस ती कल्पना नसल्यामुळें) त्यांत रंगाचें वजन माप स्पष्ट करून लिहा हो! ह्मणजे कोणास अडचण पडणार नाहीं. हें ऐकिलें कीं. आह्मांस रंगकामाची विशेषशी माहिती नव्हती, त्या वेळीं दुसऱ्यानीं रंगवून तयार केलेलें काम पाहण्यांत आलें ह्मणजे त्या कामावर लावलेल्या प्रत्येक रंगांत किती प्रमाणानें कोणकोणते रंग मिसळले असतील बरें; असा प्रश्न उत्पन्न होत असे. परंतु पुस्तकाचे आरंभीं " अनुभवाचे दोन शब्द " या सदराखालीं जी हकीकत दिली आहे तींत सांगितल्याप्रमाणें निरनिराळ्या प्रकारें मार्गदर्शक मिळत गेले. परंतु वजन मापाविषयीं कोणाचा उद्गार नाहीं. नंतर हळू हळू कल्पनेनें व चिकित्सकपणानें काम करीत गेल्यामुळें माझें ठाम मत झालें आहे कीं, ह्या कामांत वजन मापाचा कांहीं उपयोग होत नसून, कल्पनेचा व नजरेचाच खरा उपयोग होत असतो.

प्रत्येक मिश्र रंगांत फिक्का, मध्यम आणि गेहरा (गर्द) ह्या तीन प्रकारच्या रंगांचा उपयोग केल्याशिवाय कोणतीच एक वस्तु उठावदार व हुबेहुब दिसणार नाहीं. उदाहरणार्थ एकादें पान दाखविणें झालें तर त्या झाडाच्या पानाची आकृती मातीची तयार केली, त्यावर नुसता हिरवा रंग लावून तें पान हुबेहुब कधींच दिसणार नाहीं. हिरवा रंग द्यावयाचा खरा, परंतु खरें पान जवळ घेऊन त्या हिरवेपणांत जितके प्रकारचे रंग दिसतात, तितके दाखवावयाचे ह्मणजे, या हिरव्या रंगाचे तीन चार प्रकार करून छाया आणि प्रकाश [शेड व लाईट] द्यावा लागतो. तर ज्या ज्या रंगाचीं जीं जीं मिश्रणें करावयाचीं त्यांचीं प्रमाणें ठरविणें ह्मणजे फक्त नजरेचें काम आहे.

आर्टीस्ट लोक वाटर पेन्ट किंवा ऑईल पेन्ट जें करतात, त्यासाठीं पाण्यांत आणि तेलांत खलून तयार केलेल्या रंगांच्या शिशाच्या कुप्या युरोपांतून येत असतात. त्यांना [ट्यूबस्] ह्मणतात. परंतु मनुष्याच्या गोऱ्या रंगापासून

तो मध्यम व काळ्या वर्णाच्या मनुष्य रंगापर्यंतचे प्रकार निरनिराळे दाखवावयाचे ह्मणजे लांकडाच्या पातळ फळीवर किंवा जाड कांचेवर थोडथोड्या प्रमाणानें रंग कुपींतून काढून घेऊन कलमानें [ब्रशानें] मिश्रण करीत जाऊन, बेतशीर असा रंग झाल्यावर लावण्यास सुरवात करतात. ह्याचप्रमाणें पडद्यावर, कागदावर, भिंतीवर, रंगकाम करावयाचें तें करीत असतात. शेड व लाईट (छाया व प्रकाश) रंगकाम करीत असतांच दाखवितात, त्यावेळीं त्यानीं कोठें वजन मापाचा ताजवा हातीं घेतलेला असतो ?

कदाचित् कोणीं ह्मणेल कीं, फारच मिश्रणाचे पोट भेद राहूं द्या, परंतु मुख्य रंगाची मिश्रण प्रमाणें कां दिलीं नाहींत; प्रश्न योग्य आहे खरा, परंतु काम करावयास लागलें कीं, अनुभवानें या प्रश्नाचा उलगडा आपोआप होणार आहे. तरी देखील उदाहरणार्थ, पिरोजी रंग करावयाचा योजला, त्याला लागणारे सुखे रंग, सफेता, हिरवा, निळा, हे मिश्र करण्यापूर्वी सुखेच तोलून घेऊन निरनिराळे, पाणी, डिंक व शिरस घालून घोटून गाळून मनाप्रमाणें पिरोजी रंग बनविला. त्या रंगांत कोणकोणता किती प्रमाणानें, मिश्रणाचे उपयोगी पडला; व कोणता किती शिल्लक राहिला, हें जाणावयाचें असलें तर पेल्यास, घोट्यास बोटांस, गाळण्याचे कपड्यास लागून कोणता किती रंग फुकट गेला; हें समजण्याचें साधन नसल्यामुळें हें सर्व प्रमाण ठोकळ मानानें करावें लागतें, व शिलकींत राहिलेला रंग, सुकवून वजन करून, अंदाज बांधतां येईल. असें धरून चालण्यास त्या रंगात डिंक व शिरस घातला असेल त्याचें वजन वाढेल, त्याचा मेळ कसा बसवितां येईल ? अर्थात् वर सांगितल्याप्रमाणें कांहीं रंग फुकट जात असल्यामुळें, कायमचें प्रमाण बांधतां येत नाहीं तरीही कांहीं रंगाचें मिश्रण व वजन रंग तयार करणें प्रकरणांत दिलें आहे.

अभिप्राय नं. १.

राजश्री गो. वि. गोखले यानीं लोकोपयोगी लिहिलेलें मृण्मूर्ती-रंगकला-विज्ञान नांवाचें पुस्तक वाचून पाहातां सानन्दित अंतःकर्णपूर्वक आभार प्रदर्शित करीत असतां त्यांच्या या उपयुक्त कार्यासंबंधीं दोन शब्द लिहिणें अनाठाई होणार नाहीं.

१ हिंदु लोकांवर अ तत्वज्ञानी लोक नेहमीं एक मोठा दोष देत असतात कीं "ते जाणत असलेल्या विद्याव्यासंगाचा अनुभव दुसऱ्या कोणास न देतां मरून जातात. याप्रमाणें हिंदु लोकांबद्दल ग्रह करणें अगदीं चुकीचें आहे. कारण ते आपला अनुभव योग्य कालीं व योग्य स्थळीं देत असतात, त्याची साक्ष राजेश्री गो. वि. गोखले यांचा मृण्मूर्ती-रंगकला-विज्ञान ग्रंथ देणारा आहे. विद्या ह्मणून ज्याला ह्मणतां येते ती प्रेमानेंच बांधले जाणाऱ्यांना मिळत असते. तिला कोणीहि धन दौलतीप्रमाणें, कपटानें, किंवा बळजबरीनें मिळवूं शकत नाहीं. हें तत्व जाणणारे कधींहि हिंदु लोकांना दोष देणार नाहींत.

२ रा. गोखले यानीं आपल्या ग्रंथांत ग्रंथित केलेल्या विषयांची मांडणी कारागिरीच्या दृष्टीनें फार चांगली केलेली आहे. एकाद्या नव शिष्याला एकेक भागाची फोड करून जणू काय ते दाखवीत आहेत असेंच त्यांचा हा ग्रंथ पाहिला असतां वाटतें. चटकदार भाषा व मनोरंजन, यांची चाड असणारे या ग्रथाची किंमत न जाणोत, पण गणपती वगैरे मातीचीं चित्रें करणारे यांना एक हा अमोलिक ग्रंथ आहे, असें ह्मटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं.

३ सामान्य विचार दृष्टीनें या ग्रंथाकडे पहातां प्रत्येक हिंदु कुटुंबानें या ग्रंथाची एकेक प्रत आपल्या गृहीं संग्रहास ठेवण्याची याची योग्यता आहे. आणि रंगीत रांगोळी काढण्याऱ्या कुशल स्त्रियांनींहि या पुस्तकाचा अवश्य संग्रह केल्यानें यांतील कांहीं गोष्टी त्याच्या फारच उपयोगी पडण्यासारख्या आहेत.

आपला,

शिवकर बापूजी तळपदे

आर्टिस्ट आणि फोटोग्राफर, मुंबई.

अभिप्राय नंबर २.

रा. रा. चित्रकार गोविंद विष्णु गोखले यांस वि. वि. आपण रचलेलें सर्व पुस्तक साद्य वाचून पाहिलें. आपण बहु प्रयत्नानें मिळविलेल्या माहितीचा अनुभव घेऊन व लोकांच्या निदर्शनास आपला गूण आणून जी माहिती सदर पुस्तकांत ग्रथित केली आहांत, ती मातीचीं चित्रें करणाऱ्या लोकांस फारच उपयोगी होणारी आहे हें सांगितल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. सारांश सदहू पुस्तक मृण्मूर्ति-रंगकला-विज्ञान या नांवास सार्थ शोभणारें झालें आहे. अशा प्रकारच्या माहितीचें पुस्तक **हें पहिलेंच** असल्यामुळें, या कामाच्या लोकांस याचा अमूल्य लाभ झाला असें म्हटलें पाहिजे. क. लो. अ. हे विनंती.

एन्. जी. मंत्री.
आर्टिस्ट-मुंबई.

ता. ८ नवंबर १९२०

अभिप्राय नं. ३

श्रीयुत गोविंदराव गोखले गणपतीवाले यांचें मातीच्या कामावर रंगाचें काम मुंबईत आज बरेच वर्षांपासून व अलीकडे बाहेरगांवींही सुप्रसिद्ध आहेच. त्यांचें काम कोणत्या प्रकारचें असतें त्याचें वर्णन करण्याची अवश्यकता नाहीं. या बाजूचें काम करणारांना अवश्य ती माहिती सांगणारे कोणी मिळत नाहींत त्यामुळें गोविंदरावांना ती माहिती मिळविण्याकरितां फारच श्रम करावे लागले व त्या अनुभवामुळें हल्लीं या कलेंत काम करणारांना तशीच अडचण असते.

हें जाणून व पुष्कळ वेळां त्यांच्या घरीं त्यांचें काम पहावयास येणाऱ्या मंडळीकडून या संबंधानें पृच्छा झालेली पाहून, व इतर लोकांनाही या रंगकामाच्या माहितीची अवश्यकता आहे हें जाणून परोपकार बुद्धीनें मृण्मूर्ति–रंग–कला–विज्ञान या नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. यांत अवश्य लागणारी सर्व प्रकारची माहिती दिली आहे. या पुस्तकाचा लोकांना फारच उपयोग होईल.

कृष्ण भाई
मुंबईतील स्कूल ऑफ आर्ट मधील
माजी शिक्षक

मृण्मूर्ति-रंगकला-विज्ञान.

अनुभवाचे दोन शब्द.

सदर्हु पुस्तक लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास जी कारणें झालीं, तसेंच प्रसंगानुरूप मातीकामाचा व्यवसाय संपादून त्यांत मिळविलेल्या माहितीचा अनुभव कसकसा येत गेला, व त्यांत कसें यश मिळत गेलें, हें प्रथमारंभीं सांगण्याचा हेतू, ज्यांस मातीचीं चित्रें करण्याची आवड आहे, अथवा धंदा करणें आहे, अशा लोकांस थोडा बहुत उपयोग होण्यासारखा वाटल्यावरून ती माहिती देत आहें.

माझी स्थिती फार गरिबीची, लहानपणींच वडील वारल्यामुळें आधार सुटला. अशा स्थितींत मधुकरी मागून विद्याभ्यास करण्याकरतां सांगली येथें गेलों. थोडे दिवस मराठीचा अभ्यास केल्यावर एका नाटक मंडळींत दाखल झालों. माझ्यावर सोंपविलेली भूमिका सजविण्याचें काम माझें मीच करीत असें. त्यांत रंग व कपडालत्ता नेसणें व पांघरणेंचा वगैरे टापटोप कंपनीच्या मालकास पसंत पडल्यामुळें विशेषतः दुसऱ्यांनीं घेतलेल्या भूमिका नीटनेटके-पणानें सजविण्याचें काम मजकडे सोंपविण्यांत आलें होतें.

भूमिका घेऊन रंगभूमीवर येण्यापेक्षां त्या कामाचीं स्वाभाविक आवड असल्यामुळें बरें वाटत असे, व नाटकांत लागणारे किरीट कुंडलें, बाहु भूषणें, मुखवटे वगैरे कागदी सामान मी करील असें. त्यामुळें मंडळीच्या मालकाची मजवर मेहरबानी होती, परंतु त्या उद्योगानें मनाची शांति होईना म्हणून नाटक मंडळीस रजा देऊन मुंबईस आलों, आणि पुन्हा मराठी साहाव्या इयत्तेचा अभ्यास करूं लागलों. सुटीचेवेळीं रस्त्यानें जातां येतां लागणाऱ्या श्रीगणप-तीच्या कारखान्यांतील कामें तयार होत असलेलीं पाहण्यांत बराच वेळ जात असे. गांवीं असतांना लहानपणीं श्रावण मासांत गणपती करण्याचे अड्डे सुरू झाले

कीं माझेंही मिळेल त्या मातीचें वेडें वांकडें गणपती वगैरे काम सुरू व्हावयाचें. सारांश मनापासून चित्रकलेची आवड, परंतु ती पुरी होण्यास मुळींच साधन नव्हतें. अशा स्थितींत साहावी इयत्ता पास झाल्यावर इंग्रजी शिकण्यास द्रव्य साहाय्य नसल्याकारणानें विवंचनेंत असतां, तालुका रोहें, मुकाम मेढें, येथील रहिवाशी रा. रा. विसाजी कृष्ण आठवले आडनांवाचे कोकणस्थ ब्राह्मणाचा मुंबई येथें गणेश वाडींत गणपती करण्याचा कारखाना सुरू होता. हे गृहस्थ माझे या कामाचा मार्गदर्शक प्राथमिक गुरु होत. ईशकृपेनें त्यांचेकडे एका सद्गृहस्थाच्या मेहरबानीनें जावयास सांपडलें.

पहिल्यानें स्वस्थ बसून त्यांचें चाललेलें काम पाहण्यांत कांहीं दिवस गेले, पुढें पुढें गुरुजींनीं गणपतींच्या बैठकीचें व पाठीकडलें आंग कोरण्यानें साफ करण्याचें सांगितलें. असें होतां होतां कांहीं दिवसांनीं गणपतीची मूर्ति येईल तशी करण्याची आज्ञा केली. अशा तऱ्हेनें कशावशा मजकडून कांहीं गणपतींच्या मूर्ति तयार झाल्या. नंतर रंग कामाची सुरवात होतांच माझ्या हातच्या तयार झालेल्या मूर्तीस रंग देण्यास सांगितलें. होईल तितक्या टापटिपीनें मूर्ति रंगवून तयार झाल्यावर ग्राहकांस दिल्यानंतर त्या रकमेंतून माती रंग खर्चाबद्दल पैसे वाद करून उरलेले पांच रुपये गुरुजींनीं मला दिले. ते घेऊन गुरु दक्षणा ह्मणून मी त्यांस दिले. ते त्यांनीं न घेतां गुरुप्रसाद समजून मला परत देऊन ह्मणाले कीं, पुढल्या वर्षापासून तूं स्वतः गणपतींच्या मूर्ती करीत जा, मी फुरसतीनें येऊन दुरुस्ती सांगत जाईन.

त्याप्रमाणें मी दुसऱ्या वर्षापासून स्वतंत्रतेनें मूर्ति बनविण्याचा क्रम सुरू केला. परंतु मिळालेल्या माती व रंगकामाच्या माहितीनें समाधान होईना. मजपेक्षां चांगलें काम केलेली मूर्ती पाहिली कीं, मन खट्टू होई. मला असें काम करतां येईल काय ? ह्या प्रकारचा रंग साधेल काय; लोकांत माझा कारखाना ह्मणून नावारूपास येईल काय ; असे अनेक विचार उत्पन्न होत. परंतु निराश

न होतां, पाहिलेल्या मूर्तीत जें चांगलें झालें असेल तें ध्यानांत ठेवून, हातानें वठविण्याचा क्रम चालू ठेविला, व कोणतेंही काम बरेंसें दिसलें कीं त्यांत चांगल्या भागाबरोबर बेडाल भाग कोणता दिसतो, बैठकीवर टेंकून बसण्याचा तोल कितपत साधला आहे, दृष्टींत काय व्यंग आहे, तसेंच बसलेल्या झोंकाचे मानानें पाहण्याची ऐट कशी साधली पाहिजे; अशी चित्तवृत्ती असल्यामुळें चित्राकडे या दृष्टीनें पाहण्याची पहिल्यापासून संवयच लागून गेली तिला कोणी खोड म्हणोत, [याबद्दल आमचे व्यवसायबंधु मजवर टीकाही करतात.] परंतु मला ती खोड आवडते.

माझ्या कामाकडे लोक पहात असतांना कुठे कुठे नांवें ठेवतात, हें ऐकण्यासाठा बाजूस उभा राहून अद्याप ऐकत असें; ह्यामुळें माझ्या हातून थोडें बहुत काम होऊं लागलें. त्याप्रमाणें मातीकामाचा अनुभव येत चालला, परंतु अडलें रंग कामाचें. कोणाचा रंग बरा होतो, ह्या गोष्टी निघाल्या कीं, तो असें करीत असला पाहिजे, अमूक रंगांत अमूक रंग घालीत असेल, अशा तऱ्हेच्या नादी मंडळींच्या गप्पा ऐकूं येत, परंतु निश्चयानें खरें सांगणारा व्यवसाय बंधू कोणी मिळेना. ह्मणून मी चिंतेंत असें, पण सुदैवानें ह्मणा कीं श्रीगणपतीच्या कृपा-प्रसादानें ह्मणा !! सारखा निश्चयानें प्रयत्न चालल्यामुळें, कोणी निरनिराळ्या रंगाबद्दल तर कोणी रेखणीविषयीं, कोणी वर्ख लावणें विषयीं, कोणी कांठ किनारीविषयीं, वगैरे माहिती देणारे निरनिराळ अनुभवी व शोकी असे प्रेमळ गुरू भेटत गेले. त्यांजकडून मिळालेल्या माहितीला स्वतःची कल्पना वेळोवेळीं लढवून विशेष सुधारणा करण्याचा व ताडून पाहण्याचा क्रम चालू ठेवला, व अजूनही आहेच.

सारांश अशा प्रकारानें वागत असतां उत्तरोत्तर माझें काम लोकांच्या पसंत पडूं लागलें, असें वाटून, लोकांनीं पाहण्यासाठीं श्रीगणपतीची मूर्ती स्वतःकडे मांडूं लागलों ती पाहण्यास दिवसेंदिवस गर्दी होऊं लागली. गणपतीचे फोटो

काढून विक्रीस ठेवा, असें लोक ह्मणू लागले. पुढें चित्रांचा देखावा मांडण्याचा क्रम सुरुकेला तो अद्याप चालू आहे.

श्री कृपेनें प्रथमारंभीं वाटत असलेल्या इच्छा पूर्ण होत चालल्या. आमचे कडील चित्रांचे आणि गणपतीचे फोटो लोक विकत घेऊन, संग्रहीं असलेल्या फोटोवरून पुष्कळ शोकी मंडळी श्रीच्या मूर्ती बनविण्याचा प्रयत्न करते, पण आमच्यासारखें रंगकाम साधत नाहीं, असें त्यांस वाटून प्रसंगीं समक्ष भेटून किंवा पत्रानें रंगाची माहिती विचारूं लागले, व विचारतात. परंतु उडती उडती पत्रानें रंगाची माहिती दिली व देत आहें. परंतु त्यापासून व्हावा तसा उपयोग होऊन त्यांची समाधानी होत नाहीं. तसेंच माळवा. महाराष्ट्र, वऱ्हाड वगैरे प्रांतीं मी फिरत असतां अनेक लोकांनीं रंग देण्याची माहिती विचारून विचारून पुरे पुरे केलें.

सारांश अशा मंडळींची इच्छा कशी पुरवावी, हा विचार करीत असतां कांहीं मंडळींनीं पुस्तक रूपानें इवय तितकी माहिती देण्याबद्दल सांगितलें, व कांहींनीं पत्रानें कळविलें. तेव्हां असें मनांत आलें कीं ज्या ज्या गुरूंनीं निरनिराळ्या प्रकारें माहिती देऊन मला आपलें ऋणी करून ठेविलें आहे, त्यांचें उतराई होण्यास हाच मार्ग चांगला आहे. असें निश्चित करून स्वानुभवपूर्वक असलेली माहिती ह्या पुस्तकांत दिली आहे. व ह्या पुस्तकासंबंधीं मजला हरएक प्रकारें मदत करणारांचे मी फार आभार मानीत आहें.

गो. वि. गोखले, गणपतीवाले.

श्री गजानन प्रसन्न.



मृण्मूर्ति-रंगकला-विज्ञान.

प्रकरण पहिलें

(मातीकामास लागणारें साहित्य)

जे रंग आणि इतर सामान आम्ही उपयोगांत आणतों, त्यांची इंग्रजी व मराठी प्रचारांत असलेलीं नांवें, वगैरेची यादी.

लांकडी चौरंग—(स्टूल), नारळाचा काथ्या, ताग, किंवा आंबाडा, कापूस, डींक, शिरस, जिलेटाईन, व्हायटींग, भाजलेले प्लास्टर, चायना क्ले, व्हाइट झींक, व्हाईट लेड, व्हिक्टोरिया ब्ल्यू, रॉ सेना, बर्न्ट सेना, रॉ टर्की अंबर, एमिरल्ड ग्रीन, चायनीज ग्रीन, चायनीज व्हर्मीलिअन, आयव्हरी ब्लॅक, ब्ल्यू लेक, स्कार्लेट लेक, पींक लेक, जेरानिअम लेक, ग्रीन लेक, लेमन क्रोम, मिडल क्रोम, आरेंज क्रोम, शेंदूर, तेल काजळ, क्रीमझन, रंगांच्या वड्या,—[विंडसर आणि न्यूटनच्या,] सेबलब्रश, इतर प्रकारचे ब्रश, —(कलमें,) सोन्याचा आणि चांदीचा खरा वर्ख, खोटा वर्ख, मिना, टिकल्या, गोल्ड पेन्ट,

गोल्ड साइस, व्हॅारनीश, टरपेन्ट तेल, बेल तेल, हबक, पेले, बशा, बोंटे, खलबत्ता, पॉलीस कागद, टिशू पेपर पांढरे, धुवट कपडा, बारीक आणि जाडा, अफू, दारू —(वाइन) खडीसाखर, चिमटे, सवाणें, लांकडी घोडी. — (अडणी) इत्यादि सामुग्रीचा उपयोग वगैरे स्पाष्टिकरण पुढें दिलें आहे.

"थोडक्यांत स्पष्टिकरण"

लाकडी चौरंग (**स्टूल**) ह्याविषयीं सूचना प्रकरण नंबर १ पहा. नारळाचा **काथ्या,** ताग, किंवा **आंबाडा,** व **कापूस** ह्यांचा उपयोग माती प्रकरण पहा. **डिंक** स्वच्छ साधारण खडीसाखरेप्रमाणें पांढरट जो तोंडांत टाकला असतां जिभेस व दांतांस चिकटतो, व किंचीत गुळचट लागतो, तो उत्तम **शीरस** मिळेल त्यांत स्वच्छ पाहून घ्यावा. **जिलेटाईन**–शुद्ध केलेला शिरस, हा साधारण अभ्रकासारखा असतो. **व्हायटींग** ह्मणून सफेत्यासारखीच पण थोडी मलीन अशी भुकी असते, ह्याचा माती कामांतील मोडतोड फूट वगैरे दुरुस्त करण्यास उपयोग होतो. तसाच भाजलेल्या **प्लॅास्टर-**चाहि ह्या कामीं उपयोग होतो. **चायनाक्ले** चिनाई पांढरी माती हिचा उपयोग सूचना प्र. न. ९ पहा. **व्हाईट झींक,** उत्तम सफेता, **व्हाईट लेड** ह्याही उत्तम सफेता परंतु वजनास जड असल्यामुळें पेल्यांत बुडाशीं बसतो, हे दोन्ही सफेते रंग कामांत मुख्य रंग आहेत.

व्हिक्टोरीया ल्ब्यू नं. १ (नीळ) " गुळी,, म्हणतात. **रॉसेना** (पिवळा अंबर) **बर्न्ट सेना** (तांबडा अंबर,) **रॉ,**

टर्की अंबर नं. १ सूर्य छाप, (तबाकिरी अंबर) **एमिरल्ड ग्रीन** [उत्तम खुला हिरवा.) बेस्ट डीप **च्यायनीज ग्रीन** (कींचीत मलीन हिरवा.) **ब्ल्यू लेक पेटी** नं. ५४५ (निळा.) **पिंक-लेक** पेटी नं. ४४८ (गुलाबी रंग बनविण्यास हा फारच उत्तम) **जरानिअम लेक** पेटी नं० ५४१ (तांबडा कुसुंबी.) स्कार्लेट लेक पेटी नं० ५२३ (तांबडा गुलेनार.) **ग्रीन लेक** पेटी नं. ५५० (गर्द हिरवा) हे रंग ब्लंडल मेकरचे उत्तम असतात. फ्यूअर **लमन क्रोम** (लिंबी पिवडी.) फ्यूअर **मिडल क्रोम** (केशरी पिवडी.) फ्युअर **आरेंज क्रोम** [नारिंगी पिवडी] हे तीन रंग क्रोच मेकरचे उत्तम. ज्यूनीयन् **रेडलड** (उत्तम शेंदूर.) आयव्हरी **ब्लॅक** परी छाप (काळा रंग) घरी तेल **काजळ** पाडलेले उत्तम. फ्यूअर **कारमाइन**, बरमींग हॅम कलर्सको, लंगर छाप त्यावर चिमणी हा ट्रेड मार्क कुप्या असतात व पेटीही असते. (किरमेजी) **रंगाच्या वड्या**, विन्सर आणि न्युटनच्या उत्तम. च्यायना ब्लॅक, (काळी) कोबाल्ट ब्ल्यू (निळी,) (एमिरल्ड ग्रीन हिरवी) रेडलेड (शेंदरी) क्रीमझन लेक (किरमेजी) ह्या पांच तऱ्हेच्या वड्या अती बारीक आणि रेखणी कामास फारच उपयोगीं. **ब्रश.** रेडसेबल निकल फेसल्स नं० शून्यचे नं. १ चे. नं. २ चे. हे रेखणी काम वगैरे बारीक काम करण्यास फारच उत्तम, आंखूड केंस व दांडेही आंखुड असतात. इंडीयन **रेड सेबल्स इन निकल फेसल्स** शून्य नं. एक नं. दोन नंबर हे लांब केंस असून दांडेही लांब असतात, हे

रेघा [लायनी] देण्याचे कामीं उपयोगीं पडतात. **इतर प्रकारचीं कलमें**, ब्रश, लहान आणि मोठीं चपटीं थोड्या केंसां पासून हाता-च्या आंगठ्या एवढ्या जाड झुपकेदार केसां पर्यंत जरूर तितकीं घ्यावीं. ह्यांचे केंस काळे असून नरम बारीक असे असतात. दांडेही आंखूड असतात. याशिवाय **हॉग हेअर ब्रश** यांचे केस जाड व ताठ असतात. चित्रांच्या खांचि खोंचींतली धूळ झाडण्यास, जाडा भरडा रंग लावण्यास गणपतीच्या सोंडेवर तुषार देण्यास वगैरे कामीं ह्यांचा उपयोग आहे.

वर्ख सोन्याचा चांदीचा खरा आणि खोटा मिळतो. ह्यांच्या चोपड्या असतात. सोन्याच्या चोपडींत २० पानें आणि २५ पानें असतात. खऱ्या वर्खाची परिक्षा अशी कीं वर्खाचा तुकडा काडीला गुंडाळून पहावा, काळा पडणार नाहीं. खोटा वर्ख काळा पडतो. अशीच चांदीच्या वर्खाची परिक्षा. गांवठी खरा वर्ख मुंबईत, मुंबादेवी नजीकच्या चाळींत मिळतो. हा वजनावर देतात. उत्तम असून पानें मात्र वांकडीं तिकडीं असतात, हा वैद्य लोक मात्रेंत वगैरे उपयोगांत आणतात. तेथेंच मिन्याच्या टिकल्या (**कटोऱ्या**) मिळतात. **खोटा वर्ख** गोल्ड साईसवर चिकटविला तर कांहीं दिवस काळा पडत नाहीं. **मिना** पत्र्याचा मिना व कागदी मिना मिळतो. कागदी मिना चकाकीस कांहीं कमी असतो. मिन्याच्या टिकल्यांचा उपयोग मुगुटावर वगैरे बसविण्यास उपयोगीं पडतात. **गोल्ड पेन्ट**—एका कागदी पेटींत दोन बाटल्या असून एकींत सोनेरी पूड व एकींत ती पूड कालवून लावण्याचें तेल. हें गोल्ड पेन्ट खऱ्या वर्खाप्रमाणें टिकाऊ तेजदार नव्हे.

पेल क्रिस्टर पेपर वार्निश, हें ब्लंडेल मेकरचेंच चांगलें असतें. बाकीच्या वार्नीसापेक्षां हें स्वच्छ असतें. **ज्यूनीयन टरपेन्ट तेल** हें स्वच्छ पाण्यासारखें असून वारनीश लवकर सुकविण्याच्या कामीं उपयोगीं आहे. याहून उत्तम पाहिजे असेल तर, इंग्रजी औषधें विकणारांकडे मिळतें, जरा महाग मिळतें. **गोल्ड साईस** हें वार्नीसासारखेंच असून ह्याचा वर्ख डकविण्याकडे उपयोग होतो. ह्याचे मदतीस आणखीं कांहीं वस्तु लागतात.

त्याचा खुलासा वर्ख प्रकरणांत पहा. **बेलतेल** बऱ्याच प्रकारचें असतें, परंतु चांगल्यापैकीं शुद्ध केलेले लवकर सुकणारे असें मागितलें ह्मणजे दुकानदार देतात, गोल्ड साईसच्या मिश्रणासाठीं व अन्य उपयोगी पडतें. **हबक्क** हा बेलतेलांत तयार केलेला सफेत रंग असतो. खरा वर्ख डकविण्याचे कामीं ह्याची जरूर लागते. **लांकडी घोडी** (अड़णी) ब्रश कलमें टेकून ठेवण्यासाठीं सूचना प्र॰ नं. ३ पहा. **चिनई पेले** लहान आणि मोठे, तशाच वशा, (रिकाम्या) व चमचे जितके जरूर तितके घेणें. वाट्या वगैरे भांड्यांतून रंग केलेले बिघडतात. **सँडपेपर**–(पॉलीश कागद) शून्य नंबरपासून दोन नंबरापर्यंत घ्यावे, मातीकाम वाळल्यावर पालीश करण्यास ह्यांची जरूर लागते. **घोंटे**–चिंचेच्या लांकडांतील गाभा [नार] म्हणतात. हा शिशव्याच्या लांकडाप्रमाणें काळा असून त्याहून वजनशीर असल्यामुळें रंग घेटणी चांगली होते. व ह्या घोट्यांचा काट रंगांत उतरत नाहीं. बाकीच्यां लांकडी घोट्यांचा काट उतरल्यामुळें रंग बिघडतो. **खलबत्ता** न झिजणाऱ्या दगडाचा असावा, किंवा

डॉक्टर लोक औषधें घेण्यासाठीं उपयोग करतात, ते विलायतेहून येतात, त्यांवर नंबर असतात, त्याना नंबर वारीनें किंमत पडते. रंग चांगला होणें. चांगला लागणे, सफाईदार दिसणें हें सर्व रंग घोंटण्यावर अवलंबून आहेत. करितां रंग घोंटण्या साठीं शालिग्राम शिलेचा किंवा विलायती खलबता घ्यावा. **टिशु सिल्व्हर पेपर** पांढरे हे पातळ नरम असल्यामुळें ह्यांच्या खोळी करुन रंग दिलेल्या चित्रावर झांकण घातलें असतां रंगास हा कागद घांसटून रंग खराब होत नाहीं. ह्या कागदांच्या, पतंग वावड्या करतात, ते कागद **चिमटे** (सवाणे) पितळेच्या तारेचे अगर पत्र्याचे, बोटभर लांबीचे, ज्यांची टोंके चपटीं, असे दोन तीन करुन ठेवावे. वर्ख बसविते वेळीं वर्खाचा तुकडा अचळ उचलून डकवितां येतो. करतां हे चिमटे पाहिजेत.

सदर प्रकरणांत रंगमेकरचीं नावें व नंबर दिले आहेत, परंतु त्यात्या मेकराचे रंग सध्यां मिळतीलच किंवा नाहीं, तें खात्रीनें सांगतां येणार नाहीं. तरीही मुंबई येथें हे रंग विकणरांकडे सदरीं दिलेल्या मेकरचें नाव व त्या नंबरचा रंग मागीतला असतां त्याच तोडीचा दुसऱ्या मेकराचा रंग मिळू शकतो. असाही आह्मास अनुभव आहे. ह्मणुन तीं नावें कायम ठेविलीं आहेत.

प्रकरण २ रें.

श्री गणपती वगैरे चित्रें करण्यास माती संबंधी विचार, मुंबई बडोदें, इंदोर, वऱ्हाड, उमरावती, नागपूर, पुणें, वाई, राजापूर वगैरे जितक्या ठिकाणीं, मातीच्या चित्रांचें प्रदर्शन दाखविण्याकरितां फिरलों, तेथें तेथें माती कशी आहे व ती चित्र कामासाठीं कशी तयार करतात, तिजवर रंग काम कितपत वठतें, टिकाऊपणाला कशी, हें थोडें बहुत अनुभवून पाहिलें आहे. त्यावरून असें ठरतें कीं, मुंबई येथें चित्रें गणपती वगैरे काम करण्याकरितां जी माती मिळते, तीच उत्तम आहे.

कांहीं ठिकाणीं मातीच्या निम्मेंनीम कोठें तिसरा चौथा हिस्सा तींत राख मिश्र करतात. व घोंगडी किंवा गोणपाट यांतून गुलगुलींत शेण गळण्यायोग्य असें साधारण पातळ करून तें मिश्र करावयाचें, कांहीं स्थळीं गोपीचंदनांत कापूस घालून त्याचें काम करतात. कारण सर्वच ठिकाणीं मुंबईची माती मिळणें शक्य नाहीं. म्हणून जेथें जशी मिळेल त्या मानानें तिची हर तऱ्हेनें कमावणी करून उपयोगांत आणतात.

मुंबई येथें मिळणारी माती गुजराथ प्रांतांतील भावनगर शहराकडून येते. इचा राखट रंग असून तींत बारीक रेवाळपणा फारसा नसून गारगोटयांचे लहान मोठे खडे असतात. ही लांकडी उखळींत मुसळानें, किंवा लादी, फरसबंदीवर मोगरा [लांकडी मोठा हातोडा] घेऊन त्यानें कुटून बारीक करतांना ते

खडे काढून बारीक करून तारेच्या बारीक चाळणीनें चाळून जाडा रवा रहातो तो पुनः पूर्ववत कुटून चाळून जो रवा राहील, तो तसाच भिजवून दोन तीन दिवस ठेवून चेंचते वेळीं त्यांत नारळाचा काथ्या मिश्र करून खूप चेंचून चित्रांच्या बैठकी [गाद्या] व मोठ्या चित्रांच्या आंतल्या बाजूनें उपयोग करावयाचा या कृतीनें मजबुती येते.

बारकी माती दोन तीन दिवस भिजवून ठेवून नंतर मोगऱ्यानें दोन तीन फेरणीनें चेंचून उपयोगांत आणावयाची. मुंबईखेरीज इतर बाहेर गांवी थंडीच्या दिवसांत ह्या मातीचे काम करावयाचें असल्यास ती ओली माती चेंचतांना थोडा कापूस मिश्र करून चेंचावी ह्मणजे सहसा चित्रास तडा जाण्याची भीति नाहीं. कापूस मिश्र करणें तो असोल्या नारळाएवढा गोळा घेऊन त्यांतील अर्धा गोळा दगडाच्या लादीवर पसरून त्यावर कापूस विंचरुन पातळसर पसरून राहिलेला अर्धा गोळा त्या कापसावर पसरुन नंतर चेंचावी.

बाहेर गांवची माती गाळून तयार करण्याची कृती

अनेक तऱ्हेचे कंकर, रेंवटळ असतेच. ती मोठ्या पातेल्यांत भिजवून साधारण कढी इतपत पातळ करून कांहीं वेळ जाऊं देऊन मग घोंगडीतून दुसऱ्या भांड्यांत गाळावी. ती सगळी ओतू नये. खालीं रवाळ खडे असतात ती घेऊं नये. ही घोंगडींतून गाळलेली पुन्हां एकवार गाळावी. नंतर त्या बेताचा रुंद पसरट खाडा करून त्यांतील ढेपें बारीक करुन त्यावर चाळलेली राख पसरावी, त्या राखेवर दुहेरी कपडा हंथरावा त्यावर ती माती ओतावी. तींत केर

धूळ वगैरे उडूं नये, करितां बारीक दुहेरी कपडा सभोंवर झांकण घालावा. नंतर गोळा करण्या योग्य झाली म्हणजे काढून चेंचावी. त्यावेळीं तति काथ्या, ताग किंवा आंबाडा तुकडे करून, कापूस घालून तीन प्रकारची वेगवेगळी तयार करावी.

हिचे तडे जाण्याचा संभव असल्यास, बारीक चाळलेली राख, व सदरी सांगितल्या प्रमाणें शेणाची रेवडी, एकत्र मिसळावी, त्या प्रमाणेंच ती कपड्या वरून काढलेली माती ज्यास्त ओली गरगरीत करून दोन्ही हातानें कालवून चांगलें मिश्रण करून चेचण्यास योग्य होई पर्यंत कपडा झांकण घालून सुकवून मग चेंचतानां कापूस वगैरे घालावा. सदरीं तीन प्रकारें वेगवेगळीचा उपयोग असा करावा कीं, प्रथम आंतून काथ्याची त्यावर आंबाड्याची, त्यावर कापसाची, व गिलावा **बिन** कापसा शिवाय मातीचा. अशा तऱ्हेनें चित्र रचले तर सहसा फुटण्याची व तडे जाण्याची भीति नाहीं.

चित्राचा अवंत्री भाग लहान मोठा असेल त्या मानानें त्या त्या भागांत चित्र रचतांनां सुतळी बारीक व मोठी घालावी. अशा योगानें तो तो भाग मजबूत होतो. तडे जाण्याऱ्या मातीचें तयार झालेलें काम निवाऱ्याच्या जागीं वरतीं कपडा घालून सुकवावें .उन्हांत ठेवून सुकवूं नये.

कोणी मनांत आणील कीं, गांवठी मातीचें चित्र रचून त्यावरून मुंबईच्या मातीचा गिलावा करूं या. तर तो हेतू सिद्धिस जाणार नाहीं. कारण अशा कृतीनें चित्र तयार केलेलें खडखडीत

सुकलें ह्मणजे मधून कोठें कोठें मुंबईच्या मातीचें पापद्रे (कळपे) सुटूं लागतात कदाचित प्रथम नाहीं सुटले तर रंग कामाचे वेळीं रंगाचा हात दिल्यावर त्या ओलाव्यानें सदरील प्रकार होतो याप्रमाणें आम्हांस अनुभव आहे.

फूट तूट तडा वगैरे गेलेल्या चित्राची दुरुस्ती खालीं दिल्याप्रमाणें:— डींक आणि शिरस वेगवेगळा तेला इतपत पातळ करुन तो, प्लास्टर, व्हायटींग ह्यांतील गुठळ्या हातानें मोडून कपडछान करून, दोन्ही निरनिराळीं, कापूस चिमटा, पातळ टोंकाचें कोरणें, पाणी, कलमें दोन इतकी तयारी करून दुरुस्तीस लागावें. जरूर असेल त्या मानानें व्हायटींग शिरसांत वेगळें व डींकांत वेगळें भिजवावे. फटींत प्रथम कलमानें शिरसाचें पाणी लावून त्यांत शिरसांतले व्हायटींग कोरण्यानें भरावें. बाहेर कडची व्हायटींग भरण्याची थोडी बाजू राखावी. शिरसाचे व्हायटींग वाळल्यावर त्या राखलेल्या भागावर डींकांत भिजविलेले भरावें. तें माती कामाच्या लेव्हल पेक्षां किंचित जास्त लावावे. खडखडीत सुकल्यावर तो अधिक व्हायटींगचा भाग पॉलीश करते वेळीं चित्राचे अंगाची लेव्हल संभाळून घांसून काढावा. मोठी फट असल्यास कलमानें शिरस फटींत लावावा व त्यांत कापूस भरावा. तो भरतांना मधून मधून शिरसाचे कलम फिरवावें. ह्मणजे कापूस गच्च चिकटून बसतो.

प्रकार २ राः—जितके जरूर असेल त्या मानानें गव्हांची कणीक एका फडक्यांत घेऊन पुरचुंडी बांधून एका पातेंलींत पाणी घेवून त्यांत ती पुरचुंडी एका हातांत धरुन दुसऱ्या हातावर चोळावी म्हणजे कणीक

भिजून त्यांतील सत्व येऊं लागतें ते येण्याचे बंद होईपर्यन्त चोळावें नंतर दुसरें पाणी घेऊन ती पुरचुंडी स्वच्छ धुवावी. आणि सोडून त्यांतील बलक पाणी घालून धुवावा. म्हणजे गव्हांचा कोंडा सालपटें निघून गेल्यावर राहिलेला भाग रबरासारखा असतो, तो एका स्वच्छ लांकडी फळीवर घेऊन, हातोडीनें खूप घोंटतां घोटतां त्यांत थोडा कळीचा चुना घालून घोंटीत रहावें मग चिकट पणाची तार येते ती आली कीं फुटलेल्या फटींत भरावा. वाटल्यास त्यांत घोंटतांना शेवटीं थोडा गूळ घालावा. पण गूळ घातल्यावर चिकटविण्याची जलदी केली पाहिजे. कारण तो सुकल्यावर त्याचा उपयोग होणें नाहीं. कोणी हा चिकोटा कपाटांच्या वगैरे पातळ फळ्या चिकटविण्यास उपयोग करतात. एकाद्या चित्राचा भाग मोडून अजीबात निराळा झाला असतां दोन्हीं भागांस युक्तीनें भोकें पाडून त्यांत ते भाग वजनदार असतील त्याभानानें बारीक जाडी तार घालुन पाहून फक्त तारेच्या आधारावर दोन्ही भाग एक मेकांस सम्भाळून आहेत, इतकें झाले म्हणजे, त्या तारेस हा चिकोटा लावून ती दोन्ही भागांत भरून मधल्या सांध्यासहि हा चिकोटा गच्च धरून दोन बाजूनें दोन कांबटें भाळी बांधतात तशी बांधून चांगला सुखल्यावर मग सोडावे.

३ रा **प्रकार**—ह्या फूट तूट माती कामाचे साधनांस प्लॅस्टरचाहि चांगला उपयोग होतो. परंतु भाजलेलें कुटलेलें ताजें असलें ह्मणजे जोरदार जास्त. जितकें जुनें होत जाईल तसतसें इरईस कमी कमी. हें जेव्हांचे तेव्हांच शिरस किंवा डिंकाचे पाण्यांत भिजवून ताबडतोब उपयोग करावा. घट्ट झालें कीं कामाचें नाहीं. एकादी

मातीची जात अशीहि आहे कीं, वाळल्यावर चित्राचा भाग मोडला तर त्याच मातीनें चिकटविला असतां जडतो.

४ पालीश करणें:—चित्राच्या वरच्या भागापासून खालीं पालीश करीत येऊं नये, खालीं धूळ पडत गेल्यामुळें ती खांची खोचीत शिरते, त्यामुळें कोणता भाग चांगला पालीश झाला तें समजत नाहीं. ह्मणून बैठकीपासून वरती पालीश करीत जावें. भर-भरीत कपडा, गालीच्या, खरबरीत भाग पाहिजे असेल तो वृद्ध स्थितीचें शरीर वगैरे अशा भागांचे पालीश करूं नये. साहित्य यादींत तीन प्रकारचे पालीश कागद सांगितल आहेत, जेथें जसा उपयोग होण्यासारखा असेल तेथें तेथें शून्य नंबर, एक नंबर, दोन नंबरच्या कागदाचा उपयोग करावा.

एकाद्या जातीच्या माती कामावर भूरभुरीतपणा येत नाहीं, तरीहि शून्य नंबरच्या कागदानें पालीश करावें. ह्मणजे रंग चांगला सफाईदार लागतो. खांची खोंची वगैरे अडचणीचा भाग असेल तेथें कोरण्यास कागद गुंडाळून पालीश करावें, व नुसत्या कोरण्यानें तो भाग साफ करावा. कारण तेथें रंगविते वेळीं शेड (छाया) दाखवावयाची असते, ती चांगली वठते. अशा तऱ्हेनें पालीश झाल्यावर तें काम साफ झाडून कोठें चूक भूल तपासून नंतर बारीक विणकरीचा पातळ कपडा पाण्यांत भिजवून अगदीं घट्ट पिळून त्या कपड्यानें तें काम बेतशीर हळू पुसून काढावें. ह्मणजे पालीश करतांना धुरळा चिकटून राहिलेला असेल तो निघतो. फडका जोरानें चोळू नये. कारण मातीचे कण मोकळे होतात ते होऊं नयेत पालीश झालेलें काम, कागद अगर कपडा घालून झांकून ठेवावें.

प्रकरण ३ रें.

(सफेता व गोरा रंग)

[" सफेता वगैरे सर्व रंग तयार करण्याकरितां पाणी कसें असावें डिंक व शिरस कसा पातळ करावा व त्याचा परिणाम काय ? वगैरे सर्व विवरण, सूचना प्रकरण नंबर ५ पहा. त्यांत सांगितलेल्या गोष्टी ध्यानांत ठेवून त्याप्रमाणें करावें. ,,]

रंग तयार करणें प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें सफेता सुखा घोंटून तयार केलेल्या सफेत्यांपकीं जरूर असेल तितका, एका मोठ्या पेल्यांत घेऊन थोडें थोडें पाणी घालून, भिजवीत घोटीत जाऊन, बारीक घट्ट विणकरीच्या धुवट कपड्यांतून गाळून निघेल, इतकाच साधारण, बासुंदीप्रमाणें पातळ झाल्यावर त्यांत थोडा तेलाप्रमाणें पातळ केलेला डिंक घालून सारखा करून फडक्यांतून गाळून, मग त्यांतील थोडा सफेता निराळ्या पेल्यांत घेऊन आणखी डिंक घालून जास्त आपणास हवा तितपत पातळ लावण्यास योग्य असा करून घेऊन पहिला हात बिनचूक द्यावा. तो वाळल्यावर, बारीक स्वच्छ फडक्यानें साधारण पुसलासा करून मग पहिला हात देतांना कोठें चूक भूल, व विशेष पट्टे दिसत असतील अशा ठिकाणीं मधून मधून लावून दुसरा हात देऊन सर्व सारखा करावा. हा दुसरा हात बरोबर लागला म्हणजे, त्यावर अन्य रंग चटकन जुळून लागतात. थेंब पडूं देऊं नये. ओरंगळ येऊं देऊं नये. पेल्यांत कलम बुडवून

त्याच्या काठांवर एक दोन वेळां ओढून नंतर चित्राच्या खांची खोंचीत प्रथम टेकून मग ते सफाईच्या मोकळ्या भागावर आणावें.

अशा तऱ्हेनेंच सर्व रंग लावण्याची पद्धत ठेवावी. गोरा रंग लावण्याचेपूर्वीं वर सांगितल्याप्रमाणें फडक्यानें पुनः पूसून मग गोरा रंग लावावा.

केसांचा भाग शेंडी, जायवळ, मिशा, काळें लुगडें वगैरे वस्त्र, अशा भागावर सफेता लावूं नये. ते ते रंग मातीवरच चांगले वठतात.

कोठें कोठें अशी तऱ्हा आहे कीं महिना पंधरा दिवस सफेता कुजत ठेवून **रोज** त्यावरची निवळी ओतून टाकून दुसरें पाणी घालावयाचें, म्हणजे—वरतीं जी करा येते, त्यानें रंग बिघडतो, पण हें निव्वळ थोतांड आहे, कांहीं अर्थ नसून मेहेनत मात्र आहे. तसेंच **गोरा** रंग करावयाचा असला ह्मणजे अगदीं एकांतीं जाऊन तें मिश्रण करावयाचें, तो तयार करतांना बांगडी वाजलेली ऐकूं आली तर रंग नीट जुळत नाहीं, असें कांहीं तरी कारण सांगावयाचें. यांत हेतू **हा** कीं, गोऱ्या रंगाचें मिश्रण दुसऱ्यास सांगावयाचें नाहीं, व दाखवावयाचें नाहीं.

गणपतीच्या मूर्तीसाठीं जो गोरा रंग करावयाचा तो प्रथम सांगतों. सुके रंग खूप घोटून तयार केलेल्यापैकीं, व्हाईट झिंक, व्हाईट लेड, सफेता किंवा चायना क्ले १० तोळे, केशरी पिवडी (मिडल क्रोम) अर्धा तोळा, नारिंगी पिवडी (ऑरेंज क्रोम)

चवली भार, या मापानें जरूर असेल त्या बेतानें कमी किंवा जास्त प्रमाण वाढवून हें मिश्रण खलांत घेऊन थोडें थोडें पाणी घालीत जाऊन घोटतां घोंटतां भिजवावा. सर्व भिजवून एक जीव झाला ह्मणजे तेला इतपत गाळून ठेवलेला डींक त्यांत घालावा. आणि घोंटून कढी इतका पातळ करावा. नंतर त्यांत थोडें पाणी घालून जास्त पातळ करून कलमानें चित्राच्या कोणत्यातरी भागावर लावून दाट आहे कीं पातळ आहे, दोन हात देऊन नीट सर्व सारखा जुळून येण्यास आणखी पातळ केला पाहिजे कीं काय? लावलेला रंग बोटास लागून येतो कीं काय? हे सर्व प्रकारें नीट तपासून कांहीं व्यंग नाहीं असें मनानें ठरवून डींक घालणें किंवा पाणी घालणें वगैरे प्रकारें आतां हा गोरा रंग लावण्यास हरकत नाहीं, असें ठाम ठरलें म्हणजे धुवट जाड कपड्यांतून गाळून घेऊन नंतर लावण्यास लागावें. सदरीं वजन माप दिलें आहे, तथापि त्यांत कमी जास्ती प्रमाण करण्याचे ज्याच्या त्याच्या नजरेवर व खुशीवर आहे. आमच्या पद्धतीप्रमाणें हें माप लिहिलें आहे.

सफेता लावण्यापेक्षां गोरा रंग लावण्याची विशेष काळजी घेतली पाहिजे. सदरीं लिहिलेल्या मापा प्रमाणें रंग तयार करून गाळून घेऊन लावूं लागल्यानंतर फेर बदल करावा असें कदाचित् वाटल्यास जो रंग त्यांत अधीक घालावा असें वाटेल तो रंग पाण्यांत चांगला भिजवून खलून गाळून तें पाणी त्यांत: मिश्रण करावें. ह्मणजे लवकर सर्वभर मिश्र होतो. सुकी पूड घालू नये. गोरा रंग बरोबर वठला कीं नाहीं तो लावून पहावयाचें वेळीं तो भाग चांगला सुक-

त्यावर लाली देण्याची पूड कापसास किंचित लावून घेऊन तो कापूस त्या रंगावर साधारण चोळलासा करावा, नंतर काळोख करून दिवा लावून पहावा· नुसता कसा दिसतो, लालीचा कापूस चोळल्यावर कसा दिसतो, तें नीट पाहून मनास पसंत पडल्यावर मग सर्व शरीरावर लावण्याची सुरवात करावी. त्याचे अगोदर सफेता लावलेलें चित्र कपड्यानें झाडून पुसलेंसें करून नंतर गोरा रंग चेहऱ्याकडून लावण्यास सुरू करावें. सफेत्याचें जे पूर्वीचे साधारण पट्टे दिसत असतील त्या पट्ट्यांच्या साधारण तिरकस कलम मारण्याची पद्धत ठेवावी, या योगानें रंग चांगलाच जुळून येतो व सर्व सारखा दिसतो,

पेल्यांत कलम [ब्रश] बुडवून किंचित् हालविलेंसें करून पेल्याचें किनारीवर एक दोन वेळ ओढून मग लावण्यास लागावें. एकदम बुडवून तसेंच उचलून रंग लावू नये. कारण कलमांत रंग जास्त असल्यामुळें चित्रावर ओरंगळ येतात. ते येऊं नयेत. अडचणीच्या भागास लहान कलमानें मोठ्या भागास मोठ्या कलमानें रंग लावावा. एकाच कलमानें डफराकणी करूं नये. याबद्दल खबरदारी ठेवावी. पेल्यातील रंगाचें कलम उचलल्या बरोबर चित्राच्या खांचीखोचींत टेंकून तसेंच सफाईच्या भागावर ओढावें प्रथमच सफाईच्या भागावर टेंकू नये. तेथें रंग जाड होतो. याप्रमाणें पहिला गोऱ्या रंगाचा बिनचुक हात द्यावा. कलमाची चाल उलट पालट अशी ठेवावी. शंखजिरे घेऊन कपड्यानें गोरा रंग चोळून आंगाच्या रंगास चकाकी आणण्याची पद्धत खेडे गांवांतून वगैरे बरीच आहे. पण

इतकें आंग चकाकीदार असत नाहीं म्हणून ती तऱ्हा आम्हास पसंत नाहीं. माफक तेजी चेहेऱ्यावर वगैरे उच्च जागीं शरीराचे भागावर पाहिजे त्या साठीं आम्ही थोडासा अभ्रकाचा उपयोग करता. अगदीं फारच बुकणी नव्हे मध्यम अशी. दुसरा हात गोऱ्या रंगाचा द्यायचें वेळीं निराळा गोरारंग एका पेल्यांत घेऊन त्यांत ती बुकणी बेतानेंच घालून तो रंग कलमानें घेतांना पेल्यांत कलम हालवून घेऊन लावण्याची आमची पद्धत आहे. अशा तऱ्हेनें लाविलेला गोरा रंग चांगला वाळल्यावर लाली दिली म्हणजे ती ब्रशानें व कपड्यानें झाडून टाकल्यावर त्या गोऱ्या रंगास माफक चकाकी तेजी दिसून रात्रीं दिव्यांच्या प्रकाशांत घाम आल्यासारखा बेतशीर असा होतो, व तोच रंग चांगला दिसतो. अतीशय अभ्रक घातला तर सुकलेल्या शेंबडा सारखा किंवा कफाचें डरफल सुकलेल्या प्रमाणें हिडूस दिसतो त्यामुळें अती अभ्रक घालणें चागलें नव्हे. या उपर ज्याची त्याची मर्जी.

या प्रमाणें गोरा रंग दुसऱ्या हातास जमवून मिळवून द्यावा अती जाड होऊं देऊं नये. काय विशेष खास खुबी करणें असेल ती प्रथमच्या हातासच करावी.

गोऱ्या रंगाच्या तऱ्हा बऱ्याच आहेत. सफेत्यांत किरमेजी रंग व लिंबी पिवडी, कोणी हिंगुळ व लिंबी पिवडी, कोणी नुस्ता शेंदुर आणि सफेता, कोणी सफेत्यांत केशर घालून करतात. परंतु किरमेजी व लिंबी पिवडी हे रंग वजनांत हलके असल्यामुळें त्यांचा तवंग वारं वार वर येतो, हिंगुळाचा तांबडेपणा उडतो. शेंदुर फार जड अस-

त्या कारणानें पेल्याच्या बुडाशीं बसतो. केशर हें महाग व त्याचा पिवळेपणा कलमाचा लवकर जात नाहीं. सारांश सफेत्याशीं मिळून रहाण्याचें कामी जितका केशरी पिवडी (मिडल क्रोम) व नारंगी पिवडी (आरेंज क्रोम) ह्या दोहोंचा उपयोग होतो, तितका बाकी-च्याचा होत नाहीं. हें आम्ही अनुभवानें सिद्ध करून ठेविलें आहे. गोऱ्या रंगांत सफेत तांबूस पिवळट हे भास झाले पाहिजेत. ते वर दिलेल्या मिश्रणापासून होऊन शिवाय सुरख्या तांबड्या रंगाची लाली कापसानें लाविल्यानें अगदीं योग्य गोरा रंग होतो. गौरवर्णांत पिवळटपणा चित्राच्या मानानें ज्यास्त पाहिजे असें वाटल्यास केशरी पिवडी ज्यास्त घातली म्हणजे पिवळेपणा दिसतो, नारिंगी पिवडी जास्त घातली असतां तांबूसपणा दिसतो, शिवाय लाली द्यावयाची असतेच. त्या शिवाय गोरा रंग खुलावयाचा नाहीं.

गोऱ्या रंगास लाली—

देण्यासाठीं किरमेजी, नारिंगी पिवडी, आणि शेंदुर हे तीन रंग सारख्या प्रमाणानें तिहींचा एकजीव होईपर्यंत सुकेच खूप घोटून एका बाटलींत ठेवावे. जरूरीच्या वेळीं एका गुळगुळींत कागदावर थोडा थोडा काढून घेऊन कापसानें, मऊ ब्रशानें, जाड्या केसांच्या ब्रशानें, मोठ्या कुशलतेनें लाली द्यावी. ती अशी कीं, चांगला विंचरलेल्या कापसास कागदावरील पूड कापसास लागेल तितकीच बेतानें घ्यावी. ज्यास्त लागली असल्यास फुंकावी. बेतशीर आहे असें पाहून लाली तोंडाकडून खालीं देत येण्याची पद्धत ठेवावी. ती देतांना खालीं डाव्या हातांत कागद धरावा, व कांहीं भागावर

कपडा टाकावा. कारण ती देतांना खालीं पडते ती एखाद्या जागीं नको असते व एकाद्या जागीं पडलेली फुंकरानें जात नाहीं. ती ब्रशानें झाडूं लागलें तर वेळीं त्या जागीं, ती चोळटून तो डाग दिसतो. कापसास सुखा रंग अगदीं पुसट पुसट घ्यावा. ज्यास्त झाला आणि दुसऱ्या कापसानें चोळून पुसूं लागलें तर तेथेंच तो डाग दिसतो, तो दिसतां कामा नये, ह्मणून पहिल्यापासून किंचित किंचित पूड कापसानें, व ब्रशानें, घेत जावी. कमी झाली तर पुन्हा पुन्हा लावतां येते. पण अधीक लाली लागलेली काढतां येत नाहीं. गणपतीच्या चित्रास लाली देणें ती प्रथम काबास व कानाच्या खोल भागांत जरा ज्यास्त द्यावी. नंतर गाल, मग सोंडेवरच्या सुरकुत्यांतून, सोंडेची नाकपुडी, (पुष्कर) ओंठ, जवडा, गळ्याच्या सुरकुत्या, पुसट पुसट छातीवर, तशीच दंडांवरून, कपाळवटी, गंधाच्या खालच्या भागापासून ती पुष्करापर्यंत, सोंडेच्या मध्य भागावरून थेट पुष्करापर्यंत, सोंडेचा वरचा दर्शनी भाग, सर्व सोंडभर नव्हे, ह्मणजे सोंडेचा कणा असें समजावें. खाकेंत, कोपर मुरडलेला भाग, खाची खोंची, हातापायांचे तळवे जरा जास्त लाल, बोटांचीं टोंकें व बोटें, पायांचीं बोटें, कपाळावर, केंसांस सुरवात होते ती सर्व कमान, कोठें थोडा सखलपणाचा भाग, कुशी, नेसण्यावरचा पोटाचा पाठीचा घेर. जेथें कापसानें देतां येणार नाहीं तेथें कलमानें लाली द्यावी. कान, पावलें, बोटें यांस जास्त असावी. त्याहून कमी गालावर व खोलगटपणांत त्याहून कमी डोळ्यांच्या झापण्यावर, त्याहून कमी इतर ठिकाणीं, त्याहून कमी सर्वांग.

कापूस मात्र वरचेवर बदलीत जावा. ज्यांचींत जेथें कापसानें चोळतां येणार नाहीं अशा जागीं जाड्या ब्रशानें चोळावी. नंतर सर्व, वर पासून फुंकीत यावी. राहील ती स्वच्छ कपड्यानें चोळलीशी करावी ह्मणजे ती कायम रहाते. असें केल्यावर कमी लागली असेल तेथें पुन्हा लावावी. नंतर साधारण झाडावी. चित्र वारंवार झाडण्याचा प्रसंग येतो. त्या योगें ही सुकी दिलेली लाली कमी होण्याचा संभव असतो. करितां आपल्या मनास ठिक वाटेल त्याहून सवाईनें ज्यास्तच लावावी. वाटेल तर काळोख करून दिवा लावून पाहावें आणि त्या मानानें कमी कीं ज्यास्ती, तें प्रमाण ठेवावें. हें रंग काम दिव्याच्या प्रकाशांतच शोभा देणारें आहे असें ध्यानांत आणून काम केलें पाहिजे. ही लाली दिल्यावर धुवट मलमलीचा पातळ कपडा घेऊन चेहेऱ्यावर जरा जास्त चोळलासा करावा. सर्व शरीरापेक्षां चेहेरा टवटवीत तेजदार दिसला पाहिजे. बाकीच्या शरीरावर कपडा बेतानें चोळावा. गोऱ्या रंगांत डिंक ज्यास्त झाला असेल तर कपड्यानें चोळून हवी तशी तेजी चकाकी येणार नाहीं; अशा वेळीं शंखजिरें स्वच्छ पूड करून कपडा बोटास गुंडाळून तें बोट शंखजिऱ्याचे बुकणीवर टेंकून कपड्यास ती पूड लागेल त्या बोटानें चोळावें म्हणजे तेजी चकाकी येईल तितकी पुरे. ज्यास्त चोळलें तर ज्यास्त चकाकी येईल परंतु गोरा रंग मळकट दिसतो म्हणून बेतशीरच चोळावें.

मानुषी चित्रावर तर अती चकाकी उपयोगी नाहींच, साधारण भास झाला म्हणजे पुरे. कांहीं कारखानदार गणपति आणि चित्रें

शंखजिऱ्याचें सहाय घेऊन कपड्यानें खूपच घांसून तेल ओतल्या प्रमाणें चकाकी आणतात; पण तें खरें काम नव्हे. गोरा रंग तर शंख-जिऱ्यानें चोळून अती चकाकी आणली तर बिलकूल चांगला दिसत नाहीं. आर्टिस्ट व मार्मीक कसब जाणणारे लोक, हा अती चकाकणारा रंग पसंत करीत नाहींत. अती चकाकणारी, मध्यम चकाकणारी, कमी चकाकणारी, न चमकणारी ह्या वस्तु कोणकोणत्या तें ध्यानांत आणून चकाकी तेजी आणावी.

अशा तऱ्हेनें सफेता, गोरा रंग, लाली लावून, तेजी चकाकी आणून, तयार झालेलें चित्र निवाऱ्यास धुरळा न उडेल अशा ठिकाणीं झांकून ठेवावें. उगाच विनाकारण आल्या गेल्यास दाखवीत राहूं नये. आंतून कपडा त्यावरून सिल्व्हर पेपर पातळ कागदाची खोळ झांकण घालावी. रेखणी काम करावयाचे वेळीं पुढें काढावें.

" इतर प्रकारच्या गोऱ्या रंगा विषयींचीं मिश्रणे. "

सफेत्यांत फक्त किरमेजी रंग घालून करतात, कोणी फक्त शेंदूर घालतात, कोणी फक्त केशर घालतात, कोणी डिंका ऐवजीं कोंबडीच्या आंड्यांतील बलक, तर कोणी बेल फळांतील चीक, कोणी रान-भेंडीचे दोर चेंचून त्यांत पाणी घालून त्याचा बलक, कोणी दुधांत थोडा डींक घालून तें दूध सदरील मिश्रणांत घालून गोरा रंग कर-ण्याची पद्धत आहे. परंतु अलिकडे हे प्रकार कमी होऊन गांवोगावीं मुंबईच्या धर्तीवर रंग वगैरे माती काम करण्याची आवड होऊं लागली आहे, यामुळें आनंद वाटतो.

" गोऱ्या रंगाखेरीज इतर प्रकारचे माणशी रंग "

१ सफेत्यांत पिवळा आणि तांबडा अंबर घालून करावा. २ सफेत्यांत पिवळा अंबर व थोडी नारिंगी पिवडी घालून करावा. ३ सफेत्यांत फक्त पिवळा अंबर घालून करावा. ४ सफेत्यांत फक्त तांबडा अंबर घालून करावा. ५ सफेत्यांत तांबडा आणि तपकिरी अंबर घालून करावा. ६ सफेत्यांत तीनही जातीचे अंबर घालून करावा. ह्याच मिश्रणांत किंचित किरमेजी व किंचित काळा रंग घालून ७ वा प्रकार करावा.

हे सात प्रकार माणशी रंगाचे लिहीले आहेत. तर जसें ज्या योग्यतेचें चित्र केलें असेल त्याच्या योग्य, अंगाचा रंग मिश्र करून लावण्याची योजना करावी. परंतु सदरील मिश्रणांत सांगितलेले रंग जरी पूर्वीं सुके खूप घोंटलेले असले, तरीही, मिश्रण केल्यानंतर डिंक व पाणी घालून साधारण घट्टसर असतांनां खूपच घोंटून घोंटून पातळ करून गाळून कांहीं वेळ ठेवून नंतर वरचाचसा बोटानें ढवळून दुसऱ्या पेल्यांत थोड थोडा घेऊन लावावा ह्मणजे सर्व सारखा लागेल. अशी घोंटण्याची कृती न केली तर डाग डाग व पट्टे पट्टे दिसतील.

हे जे माणशी रंग सांगितले, त्या त्या प्रत्येक रंगास लाली देणेची ती ज्या रंगास जी लाली मिळून दिसेल ती त्या रंगाची सुखीच लाली द्यावी. ह्या रंगांतूनही अभ्रकाचा उपयोग करावा. तेजी व चकाकीची स्थिती पुर्वी सांगितल्या प्रमाणें.

सफेत्या ऐवजीं चायना क्लेचा उपयोग केला असेल तर, त्या रंगास शिरसाचा उपयोग होणार नाहीं डिंकच पाहिजे. चायना क्ले ह्मणजे चिनाई पांढरी माती आहे, ह्मणून शिरसाच्या योगानें रंग काळा पडेल.

गोऱ्या रंगास व्हाईट लेड सफेता सांगितला आहे, परंतु हा जात्या फार जड असल्यामुळें पेल्याच्या बुंधाशीं बसतो. ह्यांतून गोरा रंग केलेला जाड पातळ असा लागतो हा रंग लावते वेळीं दुसरा कोणी तरी पेल्यांत ढवळीत राहिला पाहिजे. थोडकेंच काम असल्यास वेळीं कसें असें होईल. घाऊक कामास व्हाईट झिंक सफेताच उत्तम.

प्रकरण ४ थें.

वर्ख डसविण्याकरतां चिकोटा व गोल्डसाईस बनविण्याची कृति.

चिकोटा करण्यासाठीं चांगल्या स्वच्छ शिरसाचे बारीक तुकडे करून ऊन पाण्यांतून धुवून काढून ऊन पाण्यांतच १ दिवस रात्र कल्हईच्या पातेलींत भिजत ठेवावे. दुसरे दिवशीं मंद अग्नीवर शिजत ठेवून ढवळीत रहावें, उभारणी येऊन बाहेर सांडूं देऊं नये. पाण्याप्रमाणें पातळ करून शिजत ठेवून ढवळीत असतांना त्यांत खडी साखर, केशरी पिवडी आणि दर्पदार (हलकी दारू,) ह्या जिनसांपैकीं दारू चिकोटा उतरण्याच्या पूर्वीं १० मिनिटें त्यांत घालावी. त्या पूर्वीं खडी साखर व अफू घालावी. चिकोटा लावल्यापासून प्रहर दोन प्रहर त्यास दमसरपणा राहण्यासाठीं खडी साखरेचा उपयोग, ओढ धरण्यासाठीं अफूचा उपयोग, शिरसास घाण येऊं नये व कृमि पडूं नयेत म्हणून दारूचा उपयोग करवा. जितका चिकोटा केला असेल व जितका वेळ दमसरपणा रहावयास पाहिजे असेल त्या मानानें खडीसाखर वगैरे वस्तु घालाव्यात. शिरसाचा मलीनपणा दबविसाठीं केशरी पिवडीचा उपयोग करावा.

शिरस शिजत असतां ढवळीत राहून त्याची चांचणी, (बोटावर थेंब घेऊन दोन बोटांनीं चेपून बोट उचलून तार सुटलीशी) झाली ह्मणजे उतरावा. हा चिकोटा पावसाळ्यांत पुष्कळ वेळ दमसर राहतो,

उन्हाळ्यांत कमी वेळ दमसर राहतो, थंडीच्या दिवसांत लवकर कडक होतो; इकडे लक्ष देऊन त्यांत खडी साखर किती घालावयाची तो अंदाज करावा. हवेच्या मानानें किंवा बराच वेळ मधें गेल्यानें विशेष दाट होऊन लावतां येत नाहीं; किंवा असें होईल तेव्हां त्यांत पाणी घालून ऊन करावा. सोन्याचा, चांदीचा वर्ख डकविणें असेल तेथें हा लावून कांहीं वेळ बोटानें चेपला असतां बोटास लागून येत नाहीं व बोटास ओढ बसलीसें भासेल, त्या वेळीं वर्ख डकविण्यास बसावें तें असें कीं, पुष्कळ उजेड आहे, वारा बिलकुल नाहीं, किंवा रात्रीं दिव्याच्या प्रकाशांत वर्ख लावण्याचें काम करावें. वर्ख लावण्यासाठीं गोल्ड साईस व चिकोटा लावाययाचा असेल त्या जागीं प्रथम केशरी पिवडी लावून ठेवावी. म्हणजे चिकोटा व गोल्डसाईस लावण्यास अंदाज समजतो व वर्ख चांगला दिसतो. चांदीच्या वर्खासाठीं चिकोट्यांत किंवा गोल्डसाईसमध्यें पिवडी घालूं नये, सफेता घालावा.

गोल्डसाईस बनविण्याची कृति.

१ भाग पेपरवॉरनीश, १ भाग बेलतेल चांगल्यापैकीं, २ भाग गोल्डसाईस, या मानानें वाटेल तितकें मिश्रण करून त्या मिश्रणास सफेतपणा येईल इतक्या बेतानें चांगल्यापैकीं हाबक घालावा. (हा बेलतेलांत तयार केलेला सफेत रंग असतो.) आणि घोंटून एक जीव करावा. रुपेरी वर्ख लावण्यासाठीं थोडें निराळें काढून ठेवून बाकी राहिलेल्यांत, नारिंगी पिवडी व केशरी पिवडी ह्या दोन जातीच्या पिवड्या सदर मिश्रणांस पिंवळेपणा येईल इतक्या बेतानें घालून खलून बाटलीचें तोंड बंद करून निवाऱ्यास ठेवावें. जरूर त्या वेळीं

उपयोगाशिवाय बाटली उघडूं नये. हें बरेंच दिवस पुरेल तितकें चांगलें. थोडें थोडें बाटलींतून काढून घेत जावें. ह्या मिश्रणास वर्ख लावण्या योग्य असें गोल्डसाईस म्हणतात. ह्याचा उपयोग खोटा वर्ख डकविण्यासही होतो. वर्ख विटत नाहीं.

चिकोटा, गोल्डसाईस, गोल्ड पेंट [सोनेरी रंग] कोठें कसे किती लावावे या विषयींचा खुलासा–सूचना प्रकरण नंबर ९ पहा. बाकी माहिती पुढें देतों. चिकोटा व गोल्ड साईस लावण्यासाठीं जाड व पांढऱ्या केंसाचीं, अडचणीच्या जागीं लाहान रुंद जागेसाठीं मोठें अशीं दोन कलमें घ्यावीत. चिकोटा व गोल्ड साईस पुसट पुसट अगदीं पातळ असा एकदां लावून तें खडखडीत सुकलें म्हणजे दुसरा हात त्यांवर द्यावा. वर्ख बसविण्याची वेळ झाली कीं नाहीं, तें वरतीं पुर्वी सांगितलेंच आहे. परंतु खोटा वर्ख लावणें असल्यास तो जाड पत्रा असल्यामुळें लवकर चिकटत नाहीं. करितां गोल्ड साईस, वर सांगितल्यापेक्षां कांहीं नरमपणा राखून खोटा वर्ख लावावा. जशी रुंद व अरुंद जागा असेल त्या मानानें कागदासकट वर्खाच्या चोपडीचे अखंड तुकडे कातरून घ्यावे. आणि पातळ टोंकाच्या चिमट्यानें कागदासकट अचूक वर्खाचा तुकडा उचलून त्याजागीं ठेवून बोटानें कागदावर किंचित दाब द्यावा. मग चिमट्यानें कागद हळू उचलून घ्यावा. वर्खाचा संग्रह विपूल असल्यास दिडका तुकडा बसवीत जावा. नाहीं तर एकेरी बसवावा. अशा तऱ्हेनें वर्ख लावून झाला म्हणजे सुमारें हाताच्या आंगठ्या

इतक्या रुंद व मऊ कलमानें तो वर्ख चित्राच्या वर्ख कामाच्या वरच्या भागाकडून चेपीत चेपीत खालीं यावें. असें एक वार करून पुन्हा वरून ज्यास्त चेपीत यावें. नंतर वर्खावरून हळूहळू ओढीत ओढीत कौशल्यानें तो वर्ख साधारण झाडीत आणावा. नंतर पांढरे जाड केसाचे ब्रशानें खांचींतील, झाडीत व खांचीतच चेपीत अशा तऱ्हेनें झाडून काढावा. तुषार राहिले तर गोल्डसाईस व चिकोटा चांगला खडखडीत सुकल्यावर मग ते तुषार झाडतां येतात. मऊ कलमानें वर्ख चेपतांनां आडवें कलम वर्खावर टेकावें. उभें टेंकून चेपू नये. वर्ख लावलेल्या जागीं कोठें चिकटला नसून जागा रिकामी असेल तर, चिकोटा लावला असलेली जागा तोंडानें हॉः अशी वाफ दिली म्हणजे ती जागा लगेच दमसर होते, त्या बरोबर लगेच वर्ख बसवावा. गोल्ड साईस असलें तर (अगदीं पुसट ब्रश) गोल्ड साईस तेथें फिरवावा आणि त्यावर वर्ख चेपावा व कांहीं वेळानें तो झाडावा.

वर्ख लावलेल्या जागीं एकाद्या ठिकाणीं वरून दुसरा पातळ कपडा आहे असें दाखवावयाचें असेल तर (त्यास ट्रान्स्पेरंट, म्हणतात.) त्या जागीं गोल्डसाईसवर वर्ख लावूं नये. तें तेलकट असल्यामुळें त्यावर वर्ख लावला तरी वरती पाण्याच्या रंगाचा पातळ कपडा बरोबर वठत नाहीं कारितां अशा जागीं चिकोट्यावरच वर्ख लावावा. बहुतकरून जेथें वर्खावर रंगकाम करावयाचें असेल तेथें चिकोट्यावर वर्ख लावावा ह्मणजे त्यावर रंगकाम चांगलें वठतें. कारण चिकोट्यास तेलकटपणाचा अंशहि नाहीं. गोल्ड साईस हें तेल असल्यामुळें त्यावर पाण्याच्या रंगाचें काम नीट होत नाहीं.

तेलाच्या रंगाचें काम केलें तर तें बोजड होतें नाजुक काम दिसत नाहीं. या उपर वाटेल तसें करावें. सदरीं लिहीलेले प्रकार पुन्हा वाचून ध्यानांत घ्यावे.

गोल्ड पेंट (सोनेरी रंग) हें हल्लीं फारच वापरण्यांत येत आहे. परंतु तें तेजहीन आहे. व कांहींसें काळसर दिसतें, व पुष्कळ दिवस टिकणारें नव्हे. हें लावून त्यावर कांठ किनारी वगैरे रंग-काम केलें तर तें गोल्ड पेंट विटतें व रंगकामही मलीन दिसतें, ह्या गोल्ड पेंटवर रंगकाम करावयाचें नसेल तेथेंच याचा उपयोग करावा. तरीही खऱ्या वर्खाची बरोबरी ह्याच्यानें होत नाहीं. थोडेच दिवस काम ठेवावयाचें असल्यास, किंवा घाई घाईच्या वेळीं ह्या गोल्ड पेंटचा उपयोग करून, वेळ साजरी करून घेतां येते. प्रेक्षणीय व टिकाऊ कामाच्या हें उपयोगी नाहीं. खरा सोन्या-चांदीचा वर्ख चिकटविण्याची दुसरी एक पद्धत आहे कीं, सुमारें पांच साहा आंगळें चौरस फळीवर कापूस अर्ध पाऊण इंच जाड असा पसरून त्यावर कमाविलेल्या कातड्याचा केंसाचा भाग काप-साकडे करून तें कातडे चारी बाजूनें चुका मारून त्या फळीवर बसवावें. नंतर त्या गादीवर चोपडींतील वर्खाचें पान, न दुमडे अशा तजविजीनें अचळ सोडावयाचें, नंतर जसे तुकडे पाहिजे असतील तसे चाकूनें पाडावयाचे. नंतर चिमट्यानें (पातळ टोंकाच्या सवाण्यानें) एकेक तुकडा हळूच उचलून वर्ख लावण्याच्या जागीं ठेवावा. किंवा कापसाची बोथी करून, तोंडाची वाफ त्या बोथीवर सोडावी, म्हणजे त्या योगानें तुकडा उचलून जाग्यावर ठेवीत जावा.

असें काम चिमट्यापेक्षां लवकर होतें, परंतु कांहींसा वर्ख चुरडला जातो. तोंडाची वाफ प्रत्येक खेपेस देण्याचें कारण नाहीं. वर्ख न उचलेल तरच वाफ द्यावी. अशी ही दुसरी पद्धत आहे.

खरा सोन्याचा वर्ख लावते वेळीं तोंडाचा, नाकाचा सुस्काराही सोडतां कामा नये. त्या योगानें वर्खाचे तुकडे केलेले उडतात, चुरमडतात, फाटतात. चिमट्यांत धरलेलाही तुकडा फाटून उडून जातो गोळा होतो वगैरे. यासाठीं निवाऱ्याची जागा असून सुस्कारा संभाळून वर्ख बसविण्याचें काम केलें पाहिजे.

चांदीच्या खऱ्या वर्खाचें काम चांदीचे दागिन्यावर लावावें आणि गणपतीच्या पितांबराचा कांठ किंवा स्त्रियांचे चित्राच्या नेसणाच्या वस्त्राचा कांठ व एकाद्या चोळीचा कांठ या ठिकाणीं लावून त्यावर ब्ल्यू (निळ्या) रंगाचें काम करावें; फार चांगलें व हुबेहूब दिसतें. जरीचा कोणताही कपडा असो. लहान व मोठ्या चित्राच्या मानानें जरीच्या कपड्याची अगदीं बाहेरची किनार, कपड्याचा रंगदेण्यासाठीं, वर्ख लावल्या शिवाय, राखून ठेवावा. पदरास आंचळ्या (दशा) पर्यंत जर कधींही नसतो, म्हणून अखेर पर्यंत वर्ख लावूं नये. किनारही अखेर पर्यंत जरीची क्वचीत असते. कदाचित एखाद्या वस्त्राची असली तरी जरीखेरीज कपड्याच्या सुताचा भाग थोडासा तरी दिसतो. कदाचित चुकून किनारीस अखेर पर्यंत, व पदरास अखेर पर्यंत वर्ख व गोल्ड पेन्ट लागलें गेलें तर तो किनारीचा आणि पदराचा भाग, रंग देते वेळीं, किनारीवर रंग काम करावयाचे वेळीं वर्खावर किंवा गोल्ड पेन्ट वर रंग लावून ती चुकीची दुरस्ती करावी. नंतर किनार आंखणीचें काम करावें.

प्रकरण ५ वें.

रेखणी प्रकरणांत येणारें रंग काम.

सर्व प्रकारचे केंस, डोळे, भिंवया, गंध, सोंडेवरचा तुषार, कुंकू, स्तन, व त्यावरील केंस, नखें, वस्त्राची कांठकिनारी, त्याच्या आंचळ्या (दशा) व करव्या, बैटक–लोड–तक्यावरील वगैरे वेल-पत्ती, बुट्टी दाखविणें, इत्यादि बारीक रंग काम, रेखणी या सदरा-खालीं गणलें जातें.

मातीच्या चित्रांवर रंगाच्या माहितीचे प्रकरणांत रेखणी हेंच काम महत्वाचें आहे. त्यांत विशेष महत्वाचें म्हणजे डोळे, भिंवया, हें काम करतांना मनाची वृत्ति चलबिचल न होईल अशी शांत ठेवावी. सूचना प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें फिरत्या स्टूलावर रेखणी करण्या-साठीं जें चित्र घेतलें असेल त्या करतां रंगकामास लागणारी सर्व सामुग्रीची तयारी करून घेऊन मग रेखणीच्या कामास बसावें. ती सामुग्री–स्वच्छ पाणी, निरनिराळे दोन चार पेले, स्वच्छ पिंचरलेला कापूस, लाली देण्याचा सुखा रंग, डिंक, शिरस, सफेता, शेंदूर, नारिंगी पिवडी, तपकिरी अंबर, काजळी रंग, हे भिजवून घोटून गाळून तयार केलेले रंग, एक दोन चमचे, दोन तीन बशा, लहान दोन तीन घोंटे, रंगाच्या वड्या, धुवट मलमलीचा कपडा, कलम व हात बोट पुसण्यास साधारण एक दोन फडके, रेखणीचीं सर्व कलमें [सेबलब्रश] इतर जातीचीं मऊ व जाड केसांचीं लहान मध्यम

मिळून पांच सात कलमें, कलमें ठेवण्यास तिधारी घोडी, इत्यादि तयारी करून घेऊन रेखणी कामास बसावें. बारिक काम करते वेळीं करांगुळी वगैरे बोटें गोऱ्या रंगावर टेकल्याकारणानें बोटाचा मलीनपणा व घाम लागून रंग खराब होतो, या साठीं मलमलीचा स्वच्छ कपडा करांगुलींत अडकवून धरावा. पापण्या, डोळे, भिंवया, गंध अशीं कांहीं कामें दोन्ही बाजूकडून सारखीं दिसलीं पाहिजेत, म्हणून जो गणपती किंवा चित्र रंगविण्यास घेतलें असेल त्याची उजवी बाजू प्रथम साधारण पुसट अपुरी करून मग त्याप्रमाणेंच अपुरी चित्राची डावी बाजू रंगवावी म्हणजे सुलभ पडून कमी अधीक फेरबदल करण्यास हरकत नाहीं. एकदम दोन्ही बाजूकडचें काम पुरें करूं नये. दोन्हीकडचें अर्धवट केलेलें काम आपली दृष्टी त्या कामाकडे सारखी लावून पाहून कमीपणा वाढेल तो भाग थोडासा सुधरून पुन्हा अवलोकन करून दोहोंकडचें काम बरोबर जमवून आणावें. डावऱ्या रंगविणाऱ्यानें वर सांगितल्याच्या उलट वागावें. [चित्राच्या डाव्या बाजूकडून सुरुवात करावी.]

डोळे—घारे, पिंगट, काळसर वगैरे अनेक प्रकारांपैकीं मनानें योजलें असेल तसे रंगवावे; परंतु बहुधा पाहणारांस पसंत पडेल असें काम करावें. एकाद्या गणपतीचे किंवा चित्राचे डोळे पिंगट, भिंवया फिक्कट, गंधही पुसट असें, वगैरे सर्वच रंगकाम कडक न करतां, नरम व शांत असें केलें तरी हरकत नाहीं. ढळढळीत किंवा शांत काम हें प्रत्येकाचे आवडीवर आहे.

डोळ्यांत वारनीस लावल्यावर बुबुळ फार नीलवर्ण दिसूं नयेत कुंद पुष्पाच्या पाकळ्याप्रमाणें स्वच्छ पांढरेपणा दिसेल इतक्या बेतानेंच किंचित निळा रंग सफेत्यांत घालून तयार करून थोडासा ठेवावा. हा सफेता रेखणीस बसतां आरंभीं चित्रांच्या डोळ्यास लावावा. तो पापणीच्या कोरीवर येऊ नये, यासाठीं कलम बेतशीर घ्यावें. गोरा रंग लावतांना बुबुळांवर लागलेला असतो करितां दोन वेळां बुबुळांवर सफेता लावून गोरा रंग साफ झांकेल असें करावें. पहिल्यानें फिरविलेलें सफेत्याचें कलम चांगलें सुकलें म्हणजे मग दुसऱ्यांदा सफेता लावाला. फिका तपकीरी व काळसर तबकिरी अंबरची वडी पैकीं काळसर तबकिरी अंबरची वडी बशीवर उगाळून, झीरो नंबरच्या आंखूड केंसांच्या सेबल ब्रशानें पापणीचे केंस दाखवावे. दोन्ही बाजूंच्या खालच्या वरच्या पापण्यांचे केंस बरोबर जुळले ह्मणजे फिकी तबकिरी वडी निराळी उगाळून त्या रंगानें पापणीची धार (कोर) रंगवावी. फार काळसर करूं नये; कारण बाळंताणा सारखे डोळे दिसतात. ती कोर साधारण फिकट काळसर नाहीं केली तर अष्टांगरांतील कांहीं लोकांचेपिचक्या डोळ्यांप्रमाणें दिसते. करितां पापणीची कोर वर सांगितल्याप्रमाणें रंगवावी. पण लहान मोठे डोळे, पापणीचा फुगवटा, इकडे लक्ष देऊन त्या फुगवट्यावर केंसाचा भाग किती गेला पाहिजे, फुगवटा किती रिकामा दिसला पाहिजे, पापणीचे केंस दाट, मध्यम व पातळ; कोणते कसे बरे दिसतात; इत्यादी प्रकार माणसांच्या पापण्याकडे दृष्टी ठेवून लक्षांत वागवून चांगलें दिसेलसें रंग काम करावें.

प्रदर्शनांतील गणपतीचा फोटो सन १९०५



चित्रकारः—गो. रि. गोखले.

नंतर काळीं बुबुळें रंगवावीं. आपण चित्राच्या डोळ्यांकडे सारखी दृष्टी ठेवून चित्र आपणाकडे पहात आहे असा केंद्र ध्यानीं आणून चित्राचें उजवें बुबुळ फिक्कट तबकिरी वडीच्या पातळ रंगानें, (वाटल्यास मोठें वर्तूळ करतां येईल अशा बेतानें) वर्तूळ काढावें. तें तसेंच चित्राच्या डाव्या बाजूचें रंगवावें. वरच्या पापणीच्या खालीं, चौथ्या हिशानें, गेलेलें आहे, असें रंगवावें. मग दोन्हीं बुबूळांची साम्यता, आंत, बाहेर, वर, खालीं, असें झालें कीं काय, तें नीट पाहून त्यांतील व्यंग कमी करून दोन्हीं सारखीं जुळलीं, अशी खात्री झाल्यावर तीं दोनही वर्तुळें त्याच रंगानें भरावींत; फार फिक्कीं वाटल्यास त्याच रंगानें पुन्हा भरावीं, कीं, त्याहून काळेपणा मध्य बाहुलीच्या वर्तळास दिसला पाहिजे. अशीं पुर्वींच्या वर्तुळाच्या आंतील काळीं वर्तुळेंहि रंगवावीं.

नंतर शेंदुर पातळ करून बारीक कलमानें दोन डोळे मिळून चारी कोपरे रंगवावे, व खालच्या पापणीच्या आंतील खांच रंगवावी. पांढऱ्या बुबुळाचा भाग मोठा असल्यास कानाकडील दोन्ही डोळ्यांच्या कोंपऱ्याकडून डोळ्याच्या वर्तुळाकडे आलेल्या उगाच दोन तीन, पण वांकड्या (सरळ नव्हत) अशा शिरा ह्या पातळ शेंदूरानेंच दाखवाव्यात. पातळ शेंदुरानें हा मांसासारखा तांबूसपणा आरंभीं जरी चांगला दिसला नाहीं, तरी वारणीस दिल्यावर तो तांबूसपणा व्यक्त होतो. अशा तऱ्हेनें भिंवया आणि डोळे रंगवून झाले म्हणजे, मोठे वर्तमान पत्राचा सबंद कागद, किंवा पांढरा जाडसर असा स्वच्छ धुवट कपडा पाठिमागून आपल्या डोकींवरून धरून ती छाया समोरच्या रंगविलेल्या चित्राच्या डोक्यावर पाडून, आपण

जरा मागें हटून, व थोडें वांकून तें रंगविलेलें काम एकाग्र दृष्टीनें पाहावें. म्हणजे त्यांत व्यंग असल्यास चटकन लक्षांत येतें. तें सुधरून पुन्हा पहावें. अशी छान करावी. अशा ह्या तपासणींत जें चांगलें दिसेल, तेंच रात्रीं, दिव्याच्या प्रकाशांत दिसणार, असें समजावें. पापणीत व्यंग असलें तरी चालेल पण मातीकामाच्या वेळीं कोरण्यानें डोळ्यांचीं बुबूळें तयार केलेलीं वेळीं लहान मोठीं होतात, ती जोड बरोबर सारखी जमवून घेण्यासाठीं शेंदराच्या पातळ रंगानें दोन्ही बुबूळांचा पांढरेपणा सारखा जमवून घ्यावा. हा शेंदराचा तांबडेपणा फार रुंद दिसतो असें वाटल्यास, पापणीच्या कोरीवर फिका काळसर लावलेल्या रंगाचा भाग जरा आंत वाढवून दोन्हीं बुबूळें सारखीं दिसतील असें करावें.

काळ्या बुबूळांत तीन तऱ्हा दिसतात, अगदीं बाहेरची वर्तुळाची रेघ, मध्यें फिकट, व मधलें बाहुलीचें काळें बुबूळ, ह्या आंतल्या बुबूळास लागून फिक्या वर्तुळावर आलेल्या काळसर, सरळ व सभोंवार, चार पांच रेघा दिसतात; परंतु हें काम मोठे डोळे ज्या चित्राचे असतील त्याचें काम करावें, व असें काम करणें झाल्यास प्रत्यक्ष माणसाचे डोळे पाहून त्या आधारानें रंगवावें.

बारीक काम करतेवेळीं वशींतील रंग कलमानें घेतल्यावर, डाव्या हाताच्या आंगठ्याच्या नखावर एक दोन वेळ कलम ओढून बेतशीर बारीक रेघ येते असें पाहून, मग चित्रावर रंगकाम करावें. सर्व काळें बुबूळाचें वर्तुळ खालच्या पापणीस टेकवूं नये. पापणीच्या धारेच्या व काळ्या वर्तुळाच्या मधें डोळ्याच्या लहान मोठ्याच्या

मानानें किंचित् सफेतपणा दिसला ह्मणजे नजर शांत दिसते. खालच्या पापणींत वर्तुळाचा भाग गेला तर रागीट नजर दिसते, इत्यादी गोष्टी फार बारकाईनें लक्षांत घेतल्या पाहिजेत.

मानुषी चेहेऱ्याच्या भिंवया प्रत्यक्ष माणसाच्या चेहेऱ्याकडे लक्ष पूर्णपणें पुरवून, किती लांब, किती रुंद, किती वांकडी, केंसांचें वळण कसें व तें कोठून निघून त्यांची चाल कोणीकडे आहे, कोठें दाट व कोठें पातळ, कोठें जुळलेले आहेत, नाकाजवळच्या वरच्या जागीं भिंवईच्या कांहीं केंसांचा झोंक उभा वर गेलेला दिसतो, हें नीट वारंवार पाहून ध्यानांत घेऊन काम केलें पाहिजे. ते भिंवईचे केंस कसे दाखवावे तें येथें लिहून दाखविणें शक्य नाहीं; सदरील वर्णनावरून आणि प्रत्यक्ष भिंवया पाहून समजून घ्यावें.

श्रीगणपतीचे चेहेरे लहान असतात त्या मानानें डोळ्यापासून किती वरती भिंवई असली म्हणजे शोभेल, व किती लांब व किती आंखूड असली ह्मणजे चांगली दिसेल, सोंडेच्या वरच्या बाजूस गंधाच्या खालीं दोन भिंवईच्यामध्यें किती अंतर असलें म्हणजे शोभेल, ह्याचा अंदाज विचार करून करावा, कांहीं माणसांच्या नाकाच्या वरच्या बाजूस, गंधाच्या खालीं, भिंवईचे केंस पातळ पातळ असे उभे असून, दोन्हीं भिंवया साधारण जुळल्याशा दिसतात; ती केंसांची ठेवण कशी आहे, हेंही लक्षांत आणून एखाद्या मोठ्या चेहेऱ्याच्या गणपतीच्या भिंवया तशा रंगविल्या तरी हरकत नाहीं. मात्र मधली जुळणी फारच पातळ व उभे केंस माणसाचे पाहून त्याप्रमाणें रंगवावें.

कोणी कोणी भिंवया धनुष्याकार असें समजून खूप कमानदार व लांबलचक, आणि दोन्हीं टोंकें उलट वर फिरलेलीं अशीं दाखवितात व ती तशा आकाराची रेघ देतात, नंतर त्या रेघेला फुटलेलें केंसाचें मूळ, आणि टोंकें बाहेर, अशा भिंवया रंगविण्याची पद्धत पुष्कळ ठिकाणीं आहे, पण त्या भिंवयांचे केंस घोणीच्या पांयांप्रमाणें दिसतात, तें खरें काम नव्हे.

कोणी कोणी भिंवईच्या जागीं प्रथम ब्ल्यू रंगाचा अगदीं पातळ पुसट हात देतात आणि त्यावर काळ्या रंगानें केंस दाखवितात. व बाकीचें केंसाचें जायवळ वगैरे रंगकाम कसल्या तरी तबकिरी रंगानें किंवा फिक्या काळ्या रंगानें रंगवितात. त्याची व भिंवईच्या रंगाची जुळणी मुळींच बसत नाहीं. असें काम कधींच कोणी करूं नये. दोन भिंवईच्यामध्यें कपाळावरचे जे उभे केंस दाखवावे म्हणून वर सांगितलें, ते केंस अगदीं उभे सुळ्यासारखे नसून त्यांस कांहीं वांकडा बांक असतो. कसा असतो तो प्रत्यक्ष पहावा. भिंवईच्या केंसांचा उगम बाहेरून कपाळाकडून असून टोंकें आंत आलेलीं पण चाल कानशिलाकडे असते; व कपाळाकडच्या बाजूवर केंस पातळ आणि कानाकडच्या बाजूकडे बरेच जुळत गेलेले त्या योगानें दाटसर असे दिसतात. खरें खोटें प्रत्यक्ष पहा.

चित्र, याचा अर्थ प्रत, प्रतीमा, अस्सलची बरहुकूम नक्कल आहे. माती काम करून हुबेहूब दाखविणें, व रंगकाम करून हुबेहुब दाखविणें. माती काम व रंगकाम, खोटें करून खऱ्याचा भास होऊं देणें ह्याचेंच नांव चित्रकला व रंगकला.

गणपतीस गंध व सोंडेवर तुषार.

गणपतीच्या चित्राची सोंडेच्या कारणानें, कपाळवटी फार रुंद असल्यामुळें, डोळे बारीक असून बरेंच अंतर असल्यामुळें, जसें भिंवयांमध्यें अंतर ज्यास्त ठेवावें लागतें, तसें गंधही दोन्ही भिंवयांस मिळतें रुंद लावून उपयोग नाहीं. रुंद गंध लावलें तर गोपीचंदनाचा त्रिपुंड, बैरागी लोक लावतात, तसें विद्रुप दिसेल, करितां जशा भिंवया आंखूड बेतशीर, तसेंच गंधही अति रुंद व लांबट न लावतां, बेतशीर शोभेल असेंच लावावें. दोन भिंवयांचा, सोंड आणि कपाळ यांचा, मध्यबिंदू साधून, नारिंगी पिवडीचा अगदीं पुसट असा बारीक टिबका द्याया. तो बरोबर मध्यभागीं आहे कीं नाहीं तें आपण जरा मागें सरकून पहावें. मध्य न साधल्यास दिलेला टिबका रद्द समजून योजनेप्रमाणें पुन्हां टिबका द्यावा. दुबोटी उभें गंध लावावयाचें आहे असें समजून, त्या टिबक्याच्या खालीं न येई अशी नारिंगी रंगाची टिबक्यापर्यंत रेघ लहानशी ओढावी. म्हणजे ती रेघ दुबोटी गंधाची मधली रेषा झाली. नंतर नाम किती रुंदीचा शोभेल तें पाहून आपल्या डाव्या हाताकडील नामाची रेघ ओढावी. मग उजवे बाजू-कडची ओढावी. मग बाहेरच्या रेघांचीं अर्धे वतुळें मधल्या रेघेच्या मुळाशीं मिळवावीं. मग नाम वरच्या बाजूस किंचित रुंद दिसावा, अशा बेतानें दोन्हीं रेघा मारून खालीं पूर्वीं मारलेल्या रेघेस मिळ-वाव्या. गंडस्थळाच्या कारणानें गंध उंच लावूं नये. तसें ऊंच लावलें तर विठोबाचे वारकरी नामदेव म्हणून दारांत येणारे, त्यांच्या गंधासारखा हा नाम दिसतो, शोभिवंत दिसत नाहीं. आंखूड झालें

तरी हरकत नाहीं, परंतु उंच लांबट नको. आंखलेलें गंध नारिंगी पातळसर रंगानें कांहीं ढळढळीत करावें. व सुमारें अर्ध्या नामापर्यंत पुसट व खालीं किंचित जरा दाट असा नारिंगी रंग लावावा. नंतर त्या नामाच्या बाहेरच्या धारेबरोबर अर्ध्या नामापासून, खालीं अर्ध वर्तुळापर्यंत, किरमेजी रंगाची रेघ द्यावी. खालीं वर्तुळाच्या आंत जरा ज्यास्त तांबूसपणा दाखवावा. मधली रेघ वाटेल तर, काळी तबकिरी अंबरची थोडीशी देऊन त्या रेघेच्या मध्येभागीं त्याच अंबरचा टिबका द्यावा. वाटेल तर न द्यावा. असें गंध लावलेलें केशरी गंध लावून मध्यें कस्तुरीची रेघ व टिकला आहे असें भासेल. एक बोटी गंध लावणें असल्यास दुबोटी गंधा इतकें रुंद लावूं नये. पाऊण पटीनें किंवा त्याहून जरा कमी रुंदीचें लावावें. वाटल्यास काळी रेघ व टिकली लावावी. आंखणीची स्थिती वर पूर्वी सांगितल्याप्रमाणेंच मध्य बिंदू देऊन, दोहों कडून दोन रेघा द्याव-याच्या. मात्र एक बोटी गंधास मधली रेघ देऊं नये. मध्यबिंदूच्या आधारानेंच दोहींकडच्या रेघा द्याव्या. उभ्या गंधाची ठेवण नेहमी वरच्या बाजूकडे कींचिंत रुंदी (पसरट) ठेवावी. भिंवयांच्या खालीं गंधाचा भाग आलेला दिसू नये व वरच्या बाजूकडे गंध पुसट असावें. जसें खालीं मुळाशीं ढळढळीत तसें वरती शेवटपर्यंत ढळढळीत लावूं नये. प्रत्येक रंग कामांत कोमल व नाजूकपणा असावा. राकटपणा असूं नये.

गणपतीच्या छातीवर मध्यभागीं दुबोटी पिंपळ पानाच्या आकाराचें गंध लावावें. पण त्या गंधाचें टोंक त्याच्या उजव्या बाजूकडे

न्यावें. उजव्या स्तनाच्या वरच्या बाजूस, बेंबीच्या वरच्या बाजूस, पोटा-वर तीन ठिकाणीं मधलें जरा खालीं दुशीकडचीं दोन जरा वर, ह्या पोटावरच्या गंधांत अंतर ठेवून लावावें. अगदीं जवळ जवळ लावूं नये. चारी दंडांवर, पोटावरच्या, छातीवरच्या, स्तनावरच्या, आणि गणपतीच्या डाव्या दंडावरच्या गंधाचीं टोकें अगदीं निमूळतीं झालीं नाहींं तरी चालेल, पण वरचा झोंक गणपतीच्या उजव्या बाजूकडे ठेवावा. उजव्या दोन्ही दंडावरच्या गंधाचा झोंक गणपतीच्या डाव्या बाजूकडे ठेवावा. छातीवरच्या गंधाखेरीज, बाकी पोटावरील वगैरे एकबोटी लावलीं तरी हरकत नाहीं. दुबोटीच लावावीशी वाटल्यास एकबोटीच्या गंधापेक्षां दुपटीचा हिशोब धरूं नये कांहीं लहान भाग धरावा. व नारिंगी पातळसर पिवडीनेंच प्रथम हीं गंधें लावून नंतर त्या गंधाच्या अर्ध्या खालच्या भागासच किरमेजी रंगाचा उपयोग करावा. असें लाविल्यानें केशरी गंधच बोटानें घेऊन चटचट सगळीकडे लावलें आहे, असा भास होतो. गंधासाठीं किरमेजी रंग कलमानें ह्मणव-याचा तो फार दाट घेऊं नये. दाट घतला तर काळसर दिसतो. त्या योगानें केशरी गध लावलें आहे असें भासत नाहीं.

सोंडेवर व कानावर तुषार.

पांढऱ्या जाड्या केंसांचें गोल व केंस आंखूड असें लहान कलम घेऊन नारिंगी पिवडी थोडी पातळ करून वशींत घ्यावी. तो रंग कलमास घेऊन, कागदावर चुबकलेंसें करावें, ह्मणजे सोंडेवर ज्यास्त रंग लागून डाग दिसणार नाहीं, इतक्या बेताचा रंग त्या कलमास आहे व नाहीं, अशा स्थितींत तें कलम गंधाच्या खालीं,

जागा सोडून, तेथपासून उभें कलम धरून, गोल व रुंदट असें हलक्या हातानें चुबकीत आणावें. तें सोंड ज्या वळणांत असेल, तिचा दर्शनी उंचवटा पाहत राहून, त्यावरून खालीं बारीक बारीक चुबकीत, शेवट पुष्करापर्यंत यावें. त्या चुबकलेल्या तुषारास कोठें विशोभित वांकण आलें आहे तें पाहून कलमास पूर्वींप्रमाणें पुसट रंग घेत जाऊन सारखा तुषार दिसेल अशा तऱ्हेनें कलम चुबकण्याची तजवीज राखावी. वरून रुंदट व खालीं क्रमानें बारीक तुषार व अरूंद होत यावा. हा नारिंगी पिवडीचा तुषार देऊन झाल्यावर किरमेजी रंग पातळसर वशींत करून तशाच दुसऱ्या कलमानें किरमेजी रंग घेऊन पूर्ववत कागदावर कृती करून नारिंगी तुषाराच्या मध्यभागावरून पूर्वींप्रमाणेंच वर्तुळ व रुंदींतील नारिंगीची जागा बाहेर थोडी थोडी सोडून, पुर्वींप्रमाणेंच पुष्करापर्यंत, अरुंद व बारीक देत यावें. याप्रमाणें नारिंगी तुषाराच्या मध्य भागावरून किरमेजीचा तुषार दिला ह्मणजे, केशराचा तुषार दिला आहे असा भास होतो. व आपल्याही अंतःकरणास गोड वाटतो. सदरीलप्रमाणेंच कानाची वरची खालची धार आणि कानाची हालणारी बाजू हिजला मागून व पुढून तुषार द्यावा; पुढल्या बाजूस जरा ज्यास्त रुंद द्यावा. शिवाय गंध, डोळे, इत्यादि रंगविलेलें बारीक काम, ह्या तुषाराच्या भपक्याखालीं झांकून जाईल असा ढळढळीत तुषार देऊं नये. सोंडेस शोभा येण्यापुरता मंद व शांत दिसेल, असा तुषार द्यावा. कोणी कोणी नुसत्या किरमेजी किंवा खुप तांबडा या रंगानेंच गंध व तुषाराचें काम करतात. परंतु त्या भडक रंगानें कामाची (ब्यूटी) शोभा जाते.

विरळ केंस—बाल गणपती किंवा बालक चित्राच्या जायवळाचे केंस, मुगूट असलेल्या गणपतीच्या डोक्यावरील केंसांत, कुरळेपणा असून, विरळ होऊन अस्ताव्यस्तपणें कपाळावर वगैरे आलेले असे रंगविले म्हणजे त्या चेहेऱ्यास मोहकपणा येतो. म्हणून मातीकामांत केंसाच्या जायवळाच्या दाखविलेल्या बटांच्या आधारानें, त्या वळणाप्रमाणें, त्यांतील कांहीं कांहीं केंस जुळून, व एकाद दुसरा कपाळावर आलेला, व कांहीं कानावर आलेले असे, रेखणीच्या आंखूड केंसाच्या सेबल ब्रशानें दाखवावे. ते प्रथम तबकिरी अंबरच्या रंगानें दाखवून, नंतर तबकिरी अंबरमध्यें थोडा काळा रंग मिसळून, त्या रंगाचे मधून केंस दाखवावे. तसेंच मुगुटाच्या खालून कपाळावर कांहीं आलेले, गहूं दीड गव्हांइतके, लांबट, पण वांकडेतिकडे, गुरपटलेले, कानावर आलेले, कपाळापेक्षां कानशिलाजवळच्या भागावर जरा ज्यास्त दाखवावेत. बाल्यावस्थेच्या जायवळाचे भागांत कोठें कोठें एकादी बट, वडाच्या पारंब्याप्रमाणें पण थोडी खालीं येऊन, एकाद्या वेलाच्या फुलाजवळच्या आधार तंतूप्रमाणें, त्या बटीची गुंडळी दाखवावी. कोठें तरी एकादा केंस बराच पुढें आलेला, एकादी पेळू खालीं येऊन पुन्हा उलट वरतीं जायवळांत शिरलेली वगैरे प्रकारें, हे चेहेऱ्यावरील केंस दाखवावे.

मोठा गणपती व मोठें चित्र उघड्या छातीचें असेल तर, त्याच्या अंगाच्या गोऱ्या रंगांत, थोडा शेंदूर व थोडा तबकिरी अंबर मिस-

ळून निराळा रंग करून ठेवावा. स्तनाचें वर्तुळ या रंगानें दाखवून मध्यें पातळ तबकिरी अंबरानें, भिन्न दिसेल इतपत टिंबका द्यावा. याप्रमाणें रंगविलेल्या स्तनावर केंस दाखविणें ते सभोंवार व त्यांचीं कांहींचीं टोंकें, वळणें, बाहेर गेलेलीं दिसावीं, तसेंच कांहीं मध्यभागींही दाखवावे. तसेंच कांहीं छातीवर शिंपीच्या ठिकाणीं माफक दाखवावे. उगीच छाती काळी करूं नये. हे सर्व ठिकाणचे केंस सरळ केव्हांही दाखवूं नये. त्यांस वाकडें तिकडें वळण असावें. आणि निखालस काळा रंग देऊं नये. तबकिरी अंबर, काळसर तबाकरी किंवा तबकिरी आणि काळा मिश्र करून रंग घ्यावा. हे केंस दाखविण्यास, योग्य असें कलम बारीक घेऊन, हात स्वाधीन ठेवून रंगकाम करावें.

शिंदेशाई पगडी, फेटा, पटका, रुमाल, असें गणपतीच्या किंवा चित्राच्या डोकीस असेल, त्याचे केंस विंचरून उलट वर परतून नेलेले असे दाखविले पाहिजेत. त्यांतून एकाद दुसरा, एकाद्या ठिकाणीं आंखूड वळणानें सहज व शोभे करितां सुटा कपाळावर आलेला असा वाटल्यास दाखवावा. व त्यांतल्या त्यांत तशी जागा असेल तर पगडी फेट्याचा झोंक पाहून भांग दाखवावा.

स्त्रियांच्या केंसांसंबंधीचा विचार असा कीं, भांग, बिनभांग, मधें भांग, तिरकस भांग, बाजूस भांग, व वांकड्या तिकड्या वळणानें, मनसोक्त परतून घेतलेले, व सारखे बसविलेले, ढिले ठेवलेले. मुद्दाम कपाळावर येण्यासाठीं कांही केंस कातरून आंखूड केलेले, असे अनेक प्रकार आढळतात, करितां लिहून समजविणें कठीण आहे.

करितां जसें ज्या योग्यतेचें चित्र असेल त्या वर्गातील स्त्रियांचे केंस प्रत्यक्ष पाहून खरे दिसतील असें दाखवावे.

नखांचा रंग करणें तो सफेत्यांत शेंदूर मिश्र करून करावा, परंतु त्या नखांवर वॉरनीश दिल्यावर फार लाल दिसतां उपयोग नाहीं. नखांप्रमाणें लाल दिसेल अशा अंदाजानें तो रंग करावा. किंवा नखांचा रंग करून लावून वॉरनीश लावून पाहून नंतर कायम करावा. वाटल्यास नखांच्या अगदीं धारेवर बारीक कलमानें, तब-किरी अंबरच्या रंगाचें पातळ पाणी, बारीक कलमानें लावावें, व नखांच्या मुळांशींही बारीक रेघ, नखांच्या आकाराची द्यावी. ही एक प्रकारची छाया दाखविल्या कारणानें नखांचा भाग खरा भासतो. पण इतकें बारीक काम मोठ्या बोटांच्या उपयोगी आहे.

कांहीं लोक नखांस गुलाबी रंग देवून, धारेवर आणि मुळाशीं अगदीं तांबड्या किंवा किरमेजीची रेघ देतात, व कोणी निखालस तांबडाच रंग लावतात. वॉरनीश दिल्यावर तें कांहींच्या बाहीं दिसतें.

रेखणीच्या कामासाठीं, आपल्या पाठीमागचा पण वरचा उजेड असावा. म्हणजे डोळे, भिंवया, गंध वगैरे रंगकाम करण्यास व दोन्ही बाजू बरोबर जुळवून घेण्यास सोपें पडतें.

प्रकरण ६ वें.

रंग व त्यांचीं मिश्रण

सुखे रंग घोटून तयार करणें ते, न झिजणारा शाळीग्राम शिळेचा किंवा विलायती डॉक्टरी खलबत्ता, व निदान जाड असा चिनाई पेला. त्यांत दरएक सुखा रंग घालून घोंटून घोंटून त्याची वडी बनू लागेपर्यंत सुरू ठेवून, मध्यंतरी, सुरी, चाकू, कांबीट किंवा कसल्या तरी ताठ पट्टीनें, वरचा खालीं खालचा वर करीत त्यांतील गोळ्या, गुठळ्या, खसखशीत पणा, नाहींसा होऊन घोट्या पेल्यास चिकटू लागला पाहिजे. असा तयार झाला म्हणजे काढावा. मग खलबत्ता धुवून पुसून सुकवून त्यांत दुसरा रंग घोटण्यास घ्यावा. या प्रमाणें सुखे रंग सर्व घोंटून ठेवावे, म्हणजे वाटेल तेव्हां, हवा तो रंग घेऊन भिजवून चटकन तयार करतां येतो. **मात्र**–हिरवा एमल्ड ग्रीन व शेंदूर हे दोन रंग सुखे न घोटतां, घोटतां येईल इतक्या बेताचेच पाणी घालून खूप घोटले पाहिजेत. एमल्ड ग्रान हा तर भिजवूनच घोटून घोंटून त्याचा फसफशीतपणा व कण अगदींच नाहींसे करून त्याचीं हाडें नरम करूनच वठणीस आणला पाहिजे. हा सुखा घोंटतांना फसफस बाहेर उडतो, व नांका तोंडांत त्याचा कडूपणाचा दर्प शिरतो. म्हणून यास वर सांगितल्याप्रमाणेंच तयार करावा. वेळीं शेंदूर सुखा घोंटला तरी चालेल.

कांहीं रंगांचें वजनमापाचें मिश्रण.

गोरा रंग—१० तोळे व्हाईट झिंक, [सफेता] किंवा व्हाईट लेड, किंवा चायनाक्ले—[चिनाई पांढरी माती] अर्धा तोळा केशरी पिवडी, [मिडलक्रोम], चवलीभार नारिंगी पिवडी, [आरेंज क्रोम.] यांचें मिश्रण.

पिरोजी रंग—१ तोळा सफेता, चवलीभार नीळ [व्हिक्टोरिया ब्ल्यू,] चवलीभार एमल्ड ग्रीन (हिरवा) हें मिश्रण.

पोंपटी रंग—अर्धा तोळा एमल्डग्रीन, अर्धा तोळा लिंबी पिवडी, हें मिश्रण.

भगवा—अथवा कोणी बदामी ह्मणतात. तो सफेता २ तोळे, शेंदूर अर्धा तोळा, नारिंगी पिवडी—चवलीभार, हें मिश्रण.

उंदराचा रंग—सफेता, किंवा चायनाक्ले, १ तोळा, काजळी काळा अर्धा तोळा, तबाकिरी अंबर पाव तोळा, हें मिश्रण.

खाकी रंग—सफेता, किंवा चायनाक्ले ४ तोळे, काजळी काळा अर्धा तोळा, व्हिक्टोरिया ब्ल्यू चवलीभार, हें मिश्रण.

गुलाबी रंग—सफेता १ तोळा, ४४८ नंबरच्या पेटीचा पिंक लेक पावलीभार, हा न मिळेल तर याच्या तोडीचा बाजारांत जो मिळेल तो, सफेत्यांत मिळवून जुळल्यास प्रमाण बसवावें.

सर्पाच्या सर्वांगावर प्रथम लावण्यासाठीं—सफेता ४ तोळे, पिवळा अंबर चवलीभार, हें मिश्रण.

सर्पाच्या पाठीवर—पट्टा देण्यासाठीं सफेता ४ तोळे, पिवळा अंबर पाव तोळा, चवली भार तबकिरी अंबर, हें मिश्रण.

सर्पावर टिबके देण्यासाठीं—पिवळा अंबर अर्ध तोळा, तबकिरी अंबर अर्धा तोळा, हें मिश्रण. याप्रमाणें, हीं कांहीं रंगांचीं वजनें दिलीं आहेत तथापि इच्छेनुरूप प्रमाण कमी ज्यास्ती करावें.

सुख्या रंगांची घोटणी सांगितल्याप्रमाणें तयार करून ठेविलेले रंग जरूर असेल त्या पूर्वीं एक दोन दिवस त्यांतील पाहिजेच असतील, ते रंग जरुरीच्या मानानें कमी किंवा ज्यास्त वाटेल तितके, पातळसर करून घोंटतां येईल, अशा एकेका पेल्यांत त्या रंगाच्या साधारण आंगाबरोबर पाणी घालून, भिजत लावून ठेवावे. असें केल्यानें पातळ करण्यास फार खटपट पडत नाहीं. ते आपसूख उमळून राहिलेले असतात.

पूर्वीं सुखा न घोटलेला रंग भिजविणें झाला तर पेल्यांत प्रथम सुखा घोटून नंतर घोटणें सुरू ठेवून त्यांत थोडें थोडें पाणी घालीत राहून जसा भिजत जाईल तसतसा पातळ करावा. बासुंदी इतका पातळ झाल्यावर त्यांत पातळ तेलाप्रमाणें करून गाळलेला डिंक घालून घोंटून गाळण्या योग्य होईतों डिंक घालूनच पातळ करून घुवट व घट्ट विणकरीचा कपडा एका पातेल्यास किंवा पेल्यास ताणून घट्ट बांधून त्यांत थोडा थोडा तो रंग घालून बोटांनी दाबून गाळून काढावा. उपयोगीं आणण्यास योग्य, किती पातळ पाहिजे असेल, तो पातळपणा गाळल्यानंतर करावा. तो असा कीं,

त्या गाळलेल्या रंगांतील थोडासा दुसऱ्या पेल्यांत घेऊन, डिंक घालून योग्य पातळ करुन, कलमानें कोठें तरी माती कामावर लावून पाहावा. दाट लागतो कीं पातळ झाला. वाळूं देऊन हातास येतो कीं काय तें पाहावें. त्या मानानें त्यांत पाणी पाहिजे कीं डिंक पाहिजे तें ठरवून सुधारणा करून, लावण्यास घ्यावा. लावलेल्या रंगावर बोट ओढलें असतां, बोटास लागून येऊं नये. इतक्याच बेतानें डिंक घालावा. ज्यास्त डिंक झाला तर खपल्या पडूं लागतात, व त्या रंगास बिलकूल सफाई यावयाची नाहीं. फाजील डिंक झाला व त्याच रंगावर दुसरा कोणताही रंग लावण्याचें कारण पडलें तर तो रंग नीटपणीं लागत नाहीं. यासाठीं रंग ठीक पातळ करतवेळीं प्रथमारंभी हातास किंचित लागत असतां थोडा थोडा अधिक डिंक घालीत जाऊन बोटास लागून येत नाहीं, असें झालें कीं, डिंक घालणें बंद करावें.

इतकी फोड केलां आहे. याप्रमाणेंच बाकी कोणतेही रंग तयार करून घ्यावे.

पेटीचे लेक रंग व कांहीं दुसरे रंग लावल्यावर उडून जातात. (कमी कमी होत जातात) ते रंग शिरसांत करावे, डिंक घालूं नये. चायनाक्रेचा स्वत: रंग किंवा त्यांत दुसरा मिश्ररंग, हें शिरसांत करूं नये, काळा पडतो.

कांहीं रंगांत शिरस घातला तरीही उडतात. असे रंग वारनीस वगैरे तेलांतून करून लावावे; पण हे मलीन दिसून अती चकाकतात. ती चकाकी ज्या रंगास शोभली जाईल तो तसा करावा.

शिरसांतले रंग जेथें लावावयाचे असतील, त्या जागीं पूर्वीचा जो सफेता वगैरे कोणताही रंग लावण्यास घ्यावयाचा असेल, तोहि शिरस घालूनच केला पाहिजे, डिंक घालून केलेला उपयोगी नाहीं.

शिरस आणि डिंक तयार करण्याची कृती पूर्वीं गोऱ्या रंगप्रकरणांत सांगितली आहेच.

मिश्रणें–राखट–सफेता आणि काळा.

प्रकार २ रा.–सफेता, काळा, व तबाकिरी अंबर.

प्रकार ३ रा.–सफेता, काळा, व तबाकिरी अंबर व थोडा तांबडा अंबर.

पारवा—सफेता, काळा, आणि निळा.

अस्मानी–सफेता, आणि निळा.

प्रकार २ रा.–सफेता, निळा व थोडा जंगला.

जांभळा—किरमेजी आणि निळा.

प्रकार २ रा–किरमेजी, निळा, आणि काजळी काळा. जांभळा रंग शिरस किंवा जिलेटाईन, यांत चांगला होतो, व सर्व सारखा लागतो.

वैंगणी–किरमेजी, ब्ल्यू, आणि तांबडा अंबर.

प्रकार २ रा–किरमेजी, काजळी काळा, आणि तांबडा अंबर.

गुलाबी–सफेता, आणि किरमेजी. हा जरा मलीन गुलाबी होतो.

प्रकार २ रा–सफेता आणि हिंगूळ. हाही साधारण होतो. तरीही हे गुलाबी रंग शिरसांत करावे.

पिरोजी—पेटीचा ब्ल्यू लेक किंवा फिका ब्ल्यू आणि सफेता, हाही शिरसांत करावा.

पोषटी—चायनीज ग्रीन, आणि लिंबी पिवडी.

पिस्ताई—सफेता, लिंबी पिवडी आणि चायनीज ग्रीन.

प्रकार २ रा—सफेता, लिंबी पिवडी, एमरल्ड ग्रीन.

प्रकार ३ रा—सफेता, लिंबी पिवडी, एमरल्ड ग्रीन, किंचित ब्ल्यू.

प्रकार ४ था—सफेता, लिंबी पिवडी, पेटीचा हिरवा.

चटणी—सफेता, हिरवा, पिंवळा.

अंजिरी—हिरवा, काळा, किरमेजी.

प्रकार २ रा—हिरवा, काळा, किरमेजी, तांबडा अंबर.

बदामी—सफेता, शेंदूर, पिवळा अंबर, नारिंगी पिवडी.

गार हिरवा—पेटीचा हिरवा, आणि एमरल्डग्रीन.

हे वरील दोनही रंग शिरसांत करावेत. गार हिरवा हा उत्तम रंग होतो.

तुळशी रंग—थोडा सफेता, तांबडा अंबर, चायनीज ग्रीन, किंचित काळा, किंचित किरमेजी, व किंचित ब्ल्यू ह्या मिश्रणानें केलेला रंग शालीस चांगला दिसतो.

कपाशी—सफेता, लिंबी पिवडी, किंचित् चायनीज, ग्रीन, व किंचित् केशरी पिवडी.

तांबूस आकाशी—सफेता, किरमेजी, ब्ल्यू, काळा.

कोऱ्या धोतराचा—सफेता आणि पिंवळा अंबर थोडा. यांतच तबांकिरी अंबर घातला कीं मलीन धोतराचा रंग झाला.

लाईट ग्रीन–(पांढरा हिरवट) सफेता, एमरल्डग्रीन, व किंचित ब्ल्यू. हा रंग चित्राच्या पटक्यास किंवा स्त्री चित्राच्या पातळास चांगला शोभतो. असे मिश्रण ह्यांचे प्रकार अगणित आहेत ते सांगतां येणार नाहींत. ज्या वेळीं जो रंग करावा असें मनां येईल त्या वेळीं त्या योजलेल्या रंगांत कोणकोणते रंग मिश्र असून, अधिक कोणता व कमी कोणता आहे हें तर्क दृष्टीनें जाणून त्याप्रमाणें मिश्रण करून, योजलेल्या वस्तुप्रमाणें झाला कीं नाहीं, त्या मानानें कमी ज्यास्तीची सुधारणा करावी.

गाळून घेतलेल्या रंगांपैकीं जरी मिश्रण करून कोणताही एक तऱ्हेचा रंग बनविला, तरी तो मिश्रण केलेला रंग चांगला घोटून पुन्हा गाळून उपयोगांत घ्यावा. रंग मिश्रणांत किंचित, असा शब्द ठिकठिकाणीं आहे, तर बाकीच्या रंगांचें मिश्रण प्रथम करून ढवळून नंतर, किंचित म्हणून जो रंग तो मागाहून घालावा.

मिश्र केलेला वगैरे तयार केलेला रंग बरोबर जमला किंवा नाहीं, वगैरेचा खुलासा सूचना प्रकरण नं. ६ पहा. रंग गाळण्याचा फडका एकच उपयोगी नाहीं, एकादा रंग फडक्याचा चटकन धुवून न गेल्यामुळें दुसरा रंग गाळतांना त्याचा अंश त्यांत येऊन, गाळलेला रंग नीट जुळत नाहीं, करितां तीन चार तरी फडके रंग गाळणें म्हणून असावेत. शेड व लाईट (छाया व प्रकाश) कोणत्याही स्वतंत्र व मिश्र रंगास, शेड व लाईट, वांचून हुबेहूबपणा भासत नाहीं, त्यामुळें मजा येत नाहीं. करतां मूळ रंग, फिका अथवा खुला आणि गैहिरा, असे तीन प्रकार निरनिराळे करावे. कपड्याचे जागीं

प्रथम कपड्याचा म्हणून जो लावावयाचा तो मूळ रंग, सुरकुतीच्या वरचा तो, फिका अथवा खुला, (लाईट), सुरकुतींतला, ती (शेड छाया, मूळ रंगांतला थोडा निराळा घेऊन त्यांत थोडा सफेता घालून तो लाईट करावा. मूळ रंगांत तबकिरी अंबर घालून तो (शेड) छायेसाठीं करावा. असें हें ठोकळमान सांगितलें. परंतु ज्या मूळ रंगास जुळता होईल, अशा रंगांनीं, लाईट व शेंडचे रंग बनवावे. तरीही त्या मिश्रणास मूळ रंगाचें सहाय्य घेतलें पाहिजे. म्हणजे जातीस जात मिळून शेड व लाईट चांगली दिसते. व मूळ रंगास मिळता जुळता होतो.

उदाहरणार्थ–एक दोन प्रकार. पितांबरास किंवा शेल्यास किरमेजी रंग लावला आहे, त्यांतील किरमेजी थोडा घेऊन त्यांत थोडा सफेता घालून सुरकुत्यांच्या वरतीं लाईट देण्यासाठीं बनवावा. निराळ्या किरमेजी रंगांत तबकिरी अंबर घालून, सुरकुत्यांच्या सखलवटांत छाया दाखविण्यासाठीं बनवावा.

प्रकार २ रा–पिंतांबर व शेला केशरी पिवडीनें रंगविला आहे. त्यांतील केशरी पिवडी थोडी निराळी घेऊन तींत थोडी लिंबी पिवडी घालावी, हा सुरकुत्यांच्या लाईटचा रंग झाला. याहून लाईट पाहिजे तर थोडा सफेता घालावा. निराळी थोडी केशरी पिवडी घेऊन तींत नारिंगी पिवडी जरा जास्त घालून, हा रंग सुरकुतींत शेडसाठीं बनवावा. किंवा बरोबर छाया न दिसेल तर नुसती नारिंगी पिवडीची छाया द्या. विशेष खोलगटपणा असेल तर नारिंगी पिवडी लावून, त्यांतील थोडी नारिंगी पिवडी व तबकिरी अंबर असें मिश्रण

करून त्या सुरकतीच्या अगदीं सखलवटांत मध्यभागीं, सुरकुतीच्या आकारानें, ही थोडी शेड द्यावी. इतकें स्पष्टीकरण केलें आहे. यावरून सर्व प्रकारें शेड लाईटचा खुलासा ध्यानीं आणावा.

पसरट सुरकुती असली तर त्यांत शेडसाठीं मलीन रंग लावूं नये. पाण्याच्या रंगांत शेड लाईट दाखविताना मूळ रंग दिलेला झांकून जातां कामा नये. व शेड लाईट देतांना पट्टे दिसतात, ते मिळवून घेत्तां येत नाहींत, त्या बाबतींत शहाणपण चालत नाहीं. होईल तितकी तवकल जलदीनें कलम मारून लगेच थोडा पाण्याचा भाग कलमास घेऊंन, त्या पट्टयाच्या सांध्यावरून मोठ्या सफाईनें कलम मारावें, आणि तो विशेष दिसणारा सांधा जमेल तितका चटकण जमवून घ्यावा. पण तसेंही कलम एकाच जाग्यावर दोन तीन वेळ फिरवीत राहिलें तर मूळ रंग निघून वेळीं माती दिसूं लागते. करितां हातचलाखी हलकी ठेविली पाहिजे.

शेड लाईटचें काम रात्रीं दिव्याच्या प्रकाशांत शोभा देणारें आहे. करितां काळोख करून दिवा लावून, शेड, लाईट दिलेलें काम कसें दिसतें तें पाहून, कमी जास्तीची सुधारणा करावी.

प्रकरण ७ वें.

रंग लावणें.

प्रत्येक रंग कसकसा लावावा त्या विषयीं, विशेष विवरण.

सूचना—प्रकरण नं. ७ पहा.

सर्पाचा—रंग, सर्पावर प्रथम सफेताच द्यावा. [चायनाक्ले देऊं नये.] तो वाळल्यावर, सफेत्याचा पांढरेपणा थोडा कमी होण्या-इतका पिवळा अंबर सफेत्यांत घालून तो दुसरा हात द्यावा. नंतर पाठीवर [कण्यावर] देण्यासाठीं तयार केलेल्या रंगाचा पट्टा देतांना दोन्हीं कुशीकडील सफेत भाग राखून, तोंडाकडे न लावतां डोळ्यांचा मध्यभाग, [ताळू] पासून शेंपटापर्यंत, सर्पाच्या कण्या-वरून त्या रंगाचा पट्टा द्यावा. नंतर कण्यावर दिलेल्या थोड्याशा रंगांत थोडा सफेता घालून त्या रंगानें, पूर्वी दिलेल्या पांढऱ्या रंगाचा, व कण्यावरील रंगाचा, सांधा जमवून घ्यावा. सारांश पट्टा दिल्याची रेघ दिसूं नये. शिवाय कण्यावर दिलेल्या रंगांतून थोडासा रंग निराळा घेऊन त्यांत किंचित् किरमेजी रंग घालून ढवळून पातळ सर असा उगीच झांक, सर्पाच्या मानेच्या खाली अर्ध्या फणीच्या भागापर्यंत तो रंग लावून, तांबूस पणाची छाया दाखवावी. अशी तांबूस छाया कांहीं सर्पाच्या फणीवर मागल्या बाजूस भासते. हें ध्यानांत असावें. सफेत्यांत शेंदूर मिश्र करून त्याच्या तोंडाची चिरा,

डोळ्यांच्या खालच्याकडे बरोबर पापण्यास व किंचित नाकपुडींत असा लावणें. सफेत्यांत काळा रंग थोडा मिळवून बुबूळांस लावावा. तो वारनीश लावल्याबर तीं बुबूळें फार काळीं दिसूं नयेत, कांहीं पिंगट भास व्हावा; अशा बेताचा. कांहींचे काळे तांबूस असेही बुबूळ असतात, परंतु वर लिहिल्याप्रमाणें विशेष असतात.

सर्पाकर खवलें दाखवावयाचें काम फार कठीण आहे. म्हणून त्यांच्या उलट, ठिबके देऊन तीं खवलें आहेत, असें दाखविण्या-साठीं ठिबके द्यावयाचे. ते देण्यासाठीं, ठिबक्यांचा तयार केलेला रंग बशींत घेऊन पातळसर करून, सर्प लहान मोठा असेल त्या मानानें ठिबके द्यावेत. अशा बेताचें आंखूड केंसांचे कलम घेऊन, एका कागदांवर कसे ठिबके येतात, तें पाहून नंतर सर्पावर देण्यास लागावें. ठिबका, चिबूडाच्या बीप्रमाणें, पण कांहीं लांबटपणा कमीं. व दोन्हीं टोंकें अगदीं अणीदार नसावीं. ठिबके दिल्यानंतर खवळेंच दाखविलीं आहेत कीं काय? असें भासण्यासारखे, कलमानें दाखविलेली ठिबक्यांच्या मधली पांढरट रेघ (खवळ) समजण्यांत आली पाहिजे. असें सर्व ठिबके देऊन झाल्यावर, दोन्हींकडूनही पाहिलें तरी पांढरट तिरकस रेघा दिसल्या पाहिजेत, माथ्या पासून आरंभी बारीक व सर्पाच्या अर्ध्या भागा पर्यंत साधारण प्रमाणानें मोठे होत आलेले, तसेंच अनुक्रमें मोठ्यांचे लहान होत गेलेले, व शेपटांकडे बारीक व नाहींसे होत गेलेले; अशातऱ्हेनें ठिबके देण्याची व्याख्या पुन्हां पुन्हां बघून ध्यानांत धरावी.

व तीं वर्णनाप्रमाणें कागदावर ट्रायल करून, माथ्यावर दोन ठिबके मोठे द्यावे, ह्या दोन मोठ्या ठिबक्यांना कोणी ज्ञातें, विष्णु-पदें असें ह्मणतात. ह्या दोन ठिबक्यांच्या मध्यभागापासून आरंभ करून थेट कण्या वरून बेतशीर लांबट असा एकेक ठिबका देत शेंपटापर्यंत जावें. मोठ्या दोन ठिबक्यांच्या पुढें तोंडाच्या चिरीपर्यंत बारीक व पुसट असे द्यावे. कण्यावरची पहिली रांग पुरी झाली ह्मणजे पुन्हा माथ्यापासून दोन ठिबक्यांच्या बाजूस पण मध्यभागीं, म्हणजे पूर्वी दिलेल्या रांगेंतला पहिला टिबका सर्पाच्या तोंडाकडे अर्धा सोडावा, व त्या शेजारचा खालचा अर्धा सोडावा. अशा तऱ्हेनें दुसरी रांग शेवटापर्यंत पुरी करावी. मग तिसरी, याप्रमाणें सर्पाची एक बाजू पुरी झाली ह्मणजे दुसरी बाजू ठिबके देण्यास घ्यावी.

सदरी, बियेचा आकार सांगितल्या प्रमाणें त्या आकाराचा टिबका वठेल असेंच कलम पाहून घ्यावें. सर्पाच्या वांकणांत, ठिबके आंखूड बोजड वाटोळसर असे झाले तरीही दोहोंच्या मध्यें एक देण्याचें, केव्हांही चुकूं नये, तसेंच वांकणाचा बाहेरचा भाग ताणलेला असल्या मुळें तेथें सदरील प्रमाणानें, ठिबके देतां देतां लांबट व कांहीसे रुंद झाले तरीही दोहोंच्या मध्यें एक देण्याचें आपण सोडूं नये तो हिशोब सोडला कीं शेवटपर्यंत गोंधळच होत जातो. मग कसें तरी करावयाचें, तें कामही मग कसें तरी दिसतें.

सदरील हिशेबी रंगकाम करून हुबेहूबपणाबद्दल आम्ही भर दिवसास कांहीं लोकांस कांहीं दूरून फसविलेलें आहे. (हा गर्व नव्हे.) चांगलें काम करण्याची हिम्मत येण्यासाठीं सुचविलें आहे.

सर्पाच्या मानेपासून फणीच्या भागाकडे वर गेलेला दहाचा आंकडा कशा वळणाचा, कशा आकाराचा, त्या आंकड्यांत कोठें, कसा रंग दिसण्यांत येतो, त्यांत कांहीं सफेत भाग दिसण्यांत येतो, तो कसा, कोठें, व किती, हें, आणि फडी केलेल्याचा व मिटलेल्याचा दहाचा आंकडा कसा, फडीवर पुढल्या बाजूंस दोहोंकडे दहाचा आंकडा नसून इंग्रजी आठाच्या आंकड्याच्या आकाराचे साधारण चुबके चुबके व पुसट असा भाग दिसतो तें; तसेंच पोटवळा वरील विषाच्या लहरींच्या खुणा, किती रुंद, किती फिक्या व किती ढळढळीत, त्यांत कोणत्या रंगाचा भास होतो. व पोटवळा वरील, आडव्या गंधाप्रमाणें सर्पाच्या चालीची खवळें असतां, त्याचा रंग कितपत निळकट किंवा काळसर, किंवा, मळकट असतो, व त्या खवळांचें वळण कसें असतें, दोन्ही कुशी कडच्या बाजूस त्या आडव्या खवळांचा मिलाफ कसा झालेला असतो, वगैरे ह्या सर्व गोष्टी लिहून सांगतां येण्यासारख्या नाहींत. करितां प्रत्यक्ष सर्प जिवंत आणि मेलेला प्रसंगोपात पाहून हृदयांत बिंबवून ठेविले ह्मणजे, रंग काम करते वेळीं तें अगदीं सोळा आणें बरोबर नाहीं झालें तरीही आठ आणे काम होऊन रस्ता चुकला नाहीं असें कोणीही म्हणेल.

वर्खावरील रंगकाम.

चित्राच्या कोणत्याही जरी किनारीवर जरीपदरी कपड्यावर गोल्डपेन्ट किंवा वर्ख लावला असेल, तो भाग दोन्ही बाजूनें कपड्याचा रंग द्यावयाचा असेल, त्या रंगानें सारखा करून घ्यावा

प्रदर्शनांतील गणपतीचा फोटो सन १९१८



चित्रकार:—गो. वि. गोखले.

ह्मणजे त्यावर बुट्टी वगैरे रंगकाम केलेलें सर्व सारखें होतें, व रुंद अरुंद असें गैर दिसत नाहीं. जरीच्या भागाससुद्धां कोठें कोठें उंच सखल, असा भाग असतो, तेथेंही पूर्वी वर्णन केल्याप्रमाणें, जराची चमक विशेष कमीं न होईल. अशा बेतानें, लाईट व शेड दाखवावी. नंतर त्यावर, किनार, बुट्टी, वगैरे जें रंगकाम करणें तें करावें. तेंही अती ढळढळीत करूं नये, बारीक व शांत असें करावें. किनारीच्या व वेलपत्ती बुट्टीच्या, तऱ्हा अगणित आहेत, त्यांतील जी आपणांस साधेल, किंवा हौस असेल किंवा फार बिकट नाहीं, उभ्या रेघा फार मारण्याचें काम नाहीं, अशी योजना करून, नमुना घेऊन, त्यांतील सर्व बारीक काम तर होणार नाहींच, पण चटकन मुख्य काय काम दिसण्यांत येतें, तेवढेंच करावयाचें. असें मनांत योजून, त्याचा थोडासा नमुना कागदावर तयार करून, या कामानें जरीचा भाग विशेष झांकून जाणार नाहीं, व सर्व बारीक काम तितक्या रुंदीच्या जरीच्या पट्टीवर होईल अशी खात्री करून, नंतर तें काम जरी किनारीवर करावें.

शालू ह्मणून जो जरीकिनारी, व जरीबुट्टीचा असतो त्या जरीवर रंगकाम कांहींच नसतें. मात्र कपड्याच्या अंग रंगाचीच शेड (छाया) त्या जरावर दिसते, ती तशी आपण द्यावी. मध्यें जी बुट्टी वाटोळी असते, त्यावर मात्र त्याच कपड्याच्या अंग रंगाच्या प्रत्येक बुट्टीवर दोन तीन उभ्या रेघा दिसतात, त्या आपण दाखवाव्यात. सोनेरी जरी कांठावर सफेत्याचें व काळ्या रंगाचें काम चांगलें दिसतें. रुपेरी जरीवर ब्ल्यू रंगाचें चांगलें दिसतें. पैठणी

वगैरे कांहीं शेल्याच्या जरीपदरावर नारळी पदर ह्मणतात, ती किंवा अन्य तऱ्हेची बुट्टी असते. तो नमुना पाहून, त्यांतून चित्राच्या लहान कपड्यावर जें जितकें होण्यासारखें असेल तितकेंच करावें. नमुन्याबरहुकूम सर्वच काम करण्याचें मनांत आणून चित्राचा कपडा बिघडवूं नये.

कोणत्याही वस्त्राच्या पदरास आंचळ्या असतातच. कांहीं वस्त्रास करळ्याही असतात. चित्राच्या वस्त्राच्या मानानें, करळ्या व आंचळ्या दाखवाव्या. निदान आंचळ्या अवश्य पाहिजेतच, त्या वांचून शोभा नाहीं. करितां वस्त्रास जो रंग दिला असेल त्याच रंगास मिळता असून दिसण्यांत थोडा भिन्न असा रंग तयार करून त्या रंगानें दशा (आंचळ्या) दाखवाव्या. उदाहरणार्थ सफेत वस्त्रास, सफेत्यांत थोडा तबाकिरी अंबर मिळवून त्यानें दाखवाव्या. हिरव्या वस्त्रास पातळ काळ्या रंगानें, गुलाबी वस्त्रास गैहिरा गुलाबीनें, तांबड्या रंगास, तांबड्यांत थोडा काळा घालून अशा तऱ्हेनें योजना व्हावी. आणि आखूड केसांच्या बारीक कलमानें रंग घेऊन सप् सप् अशा उभ्या रेघा माराव्या एकाशीं एक अशी हळू व सरळ रेघ ओढीत राहू नये. कोठें कमी, ज्यास्ती, वांकडी, तिकडी, समोर, अशी मारणी ठेविल्यानें सहज काम दिसतें. मुद्दाम छापील, सरळ, असें करळ्यांचें काम दिसू नये.

कांठ किनारीच्या आणखी कांहीं विवरणासाठी

सूचना—प्र. नं. ८ पहा.

भरभरीत कपडा दाखविणें असल्यास त्या भागास कागदानें पालीस करूं नये. व जो रंग लावणें असेल त्याच पेल्यांतला बुडाचा रंग घेऊन लावावा व त्यावर फडक्यानें वगैरे सफाई आणू नये.

ट्रॉन्सपॅरन्ट—आंतील बाजू दाखविणारा वरच्या कपड्याचा रंग असा द्यावयाचा कीं, पातळ, किंवा पातळ सदरा, किंवा धोतर वगैरे, यांतून दुसरा कपडा किंवा चित्राच्या शरीराचा भाग दिसणें असा रंग करावयाचा असल्यास, आंतील द्यावयाचे असतील ते सर्व रंग देऊन आंतील रंगकाम पुरें करावें त्या वेळीं वरच्या पातळ कपड्याच्या ज्या सुरकुत्या, व उठावे भाग (उंच) असा असेल, त्या त्या जागीं आंतील रंग लावूं नये, उंच व उठाव आणि सुरकुती विरहीत भाग असेल त्यावर मात्र आंतील रंगाचा एकच पातळसा हात द्यावा. नंतर वरच्या पातळ कपड्याच्या रंगाचे तीन प्रकार करावेत, मूळ रंग, मध्यम व त्याहून पातळ, सुरकुत्यांवरून मूळ रंग द्यावा. मध्यम रंग सुरकुत्यांच्या जरा शेजारीं व उठाव उंच भागावर द्यावा. नंतर त्याहून पातळ रंग केलेला रंग मागल्या बाजूस कोठें तरी लावून पाहून, त्यांतून, आंतील भाग पातळ वस्त्रांतून जसा दिसला पाहिजे, तसा दिसतो. असें तपासून पाहून मग जरा मोठें रुंद मऊ कलम घेऊन त्या कलमानें बाकीच्या जागीं सफाईनें चटचट आणि लांब कलम ओढावें, तें सर्व पातळ कपड्यावरून ओढावें. खांचींत व कोपऱ्यांत आरंभी टेंकून दुसऱ्या खांची कोपऱ्यांत नेऊन सोडावें. मधेंच उचलूं नये. फार सफाई ठेवली पाहिजे. एकावर एक कलमांतील रंगाचा पट्टा चढूं देऊं नये.

विशेष खुलासा.

सूचना–नं. ४ पहा.

ट्रॅन्सपॅरेन्ट–रंग देण्याच्या आंतील रंगांत किंचित डिंक ज्यास्ती घालावा. म्हणजे वरच्या पातळ रंग देतांना आंतील रंग या पातळ रंगांत निघून येत नाहीं, व येऊं नये म्हणूनच हात चलाखी ठेविली पाहिजे. या रंगासही शेड लाईट साधल्यास द्यावा, म्हणजे ज्यास्त शोभा येते.

रंगांस अस्तर–कांहीं रंग उठाव व खुले दिसण्यासाठीं ते लावण्यापूर्वीं त्या त्या रंगांस जुळेल असा अस्तर म्हणून निराळा पातळ रंग करून लावून तो सुकल्यावर कपड्यानें पुसलासा करून नंतर त्या रंगावर मुख्य कोणता तो लावावा. असें केल्यानें चटकन् जुळन येतो, व सफाईदार दिसतो. हें अनुभवाअंती समजेल.

उदाहरणार्थ–गोऱ्या व लिंबी पिवडीस सफेत्याचें अस्तर. केशरीस–लिंबीचें, नारिंगीस–केशरीचें, फिक्या गुलाबीचें, गेहिऱ्या गुलाबीस, गुलाबीचें, किरमेजीस, किंवा तांबड्यास, पोपटीचें, गार हिरव्या रंगास, याप्रमाणें–अस्तराचा रंगाचा बराच पातळ हात एकदांच लावावा. मग त्यावर मुख्य रंग द्यावा.

किरमेजी–रंग हा जरूर लागेल तेव्हांच भिजवून तयार करून उपयोग करावा. हा रंग दोन चार दिवस भिजलेला असला तर काळा पडतो. व यांत डिंक फार झाला तर काळसर होतो. सहसा हात बोटास लागणार नाहीं असा बेतानेंच डिंक घालून थोडेसेंच,

रिठ्याचें पाणी घालून लावावा. हा बेतशीर पातळसरच लावला पाहिजे. दाट लागला तर काळसर दिसतो. हा चांगला सुखल्यावर बारीक धुवट कपड्यानें साधारण चोळलासा करावा. सफाई येऊन रेशमी भास होतो, कपड्यास शंखजिरें लावूं नये. कारण भुरकट दिसतो.

जेरानिअम लेक–(कुसुंबी.) स्कार्लेट लेक–(गुलेनार) हे दोन्ही रंग, शाल, पैठणी, शेला, पितांबर वगैरे लाल कपडा दाखविण्यास शिरसांत करून लावावे.

ब्ल्यू लेक–हा बनातीसारखा कपडा दाखविण्यास लावावा. यास योग्य शेड लाइट दिला तर दुरून मखमलीसारखा भासतो. याप्रमाणेच, ग्रीन लेकचा उपयोग करावा. लेक रंग, हे उडणारे असल्यामुळें शिरसांत करून लावावे.

पैठणी पितांबर–वगैरे जरीकांठी दाट विणकरीच्या कपड्यांच्या आंतून [ट्रान्सपॅरन्ट] अंग दिसेल असें रंगकाम करूं नये.

चोळी—ज्याकीट, वगैरे भरजरीचें रंगकाम वरच्या पातळ कपड्यांतून ट्रॅन्स्पॅरन्ट दाखविणें असेल तर वर्खावरची बुट्टी किंवा अन्य तऱ्हेचें बारीक रंगकाम करणें तें वारानिसांत टरपेन तेल घालून त्यांत रंग कालवून त्या रंगानें करावें. खडखडीत सुखल्यानंतर ट्रॅन्स्पॅरन्ट द्यावा. असें केल्यानें पातळ रंग देतांना बुट्टी निघून येणार नाहीं.

हातांपायांवरील शिरांचा रंग—ज्या चित्राच्या शिरा दाखवावयाच्या असतील त्याच्या अंगाचा रंग थोडा बशींत घेऊन त्यांत किंचित् साधा हलका जंगला, व किंचित् ब्ल्यू, हें मिश्र करून पातळ करून ठेवावें. मातीकामांत चित्रास शिरा दाखविल्या असल्यास ठीकच, नाहीं तर ज्या वयमानाचें चित्र असेल, साधारण तरी त्या वयाच्या मनुष्याच्या शिरा, त्यास जवळ बसवून त्या पाहून तशा वळण वांकणाच्या फिक्या पुसट अशा सदरील रंगानें, दाखवाव्या. शिरांचें आगम निगम टोंक समजूं नये अशा योजनेनें कलम चालवावें. वळणांत कोठें बारीक मोठी, एकावर एक चढलेली, एकींत एक मिसळलेली, हें सर्व ध्यानीं आणून शिरा दाखवाव्या. जेथें शीर ज्यास्ती ढळढळीत रंगली गेली असेल त्या ठिकाणीं अंगाचा रंग पातळ मारून जमवून घ्यावा. किंवा अंगाला रंग लावल्याबरोबर, शिरा रंगवून, त्यांवर अंगाच्या रंगाचा पातळ हात द्यावा. अशानें शिरा फार जपून रंगविण्याची भीती रहात नाहीं. सहज काम जुळून येतें.

हजामतीचा रंग करणें तो शिरांच्या रंगा प्रमाणेंच मात्र निळ्या रंगाच्या ऐवजी किंचित काळा रंग घालावा. तो लावतानां कलमाचा पट्टा न दिसेल अशा तजविजीनें लावावा. किंवा अंगाचा रंग दिल्या बरोबर तो सुखला म्हणजे, हलका जंगला (चायनीज ग्रीन) हा रंग सुखा घेऊन कापसानें चोळून लावून हजामत केलेली असें दाखवावें वाटल्यास ह्या सुख्या रंगांत किंचित् काळा किंवा तबाकिरी अंबर सुखा घालून दोहोंचा नीट मिलाफ करून मग कापसानें दाखवावा कपाळ्या-

कडची पुढची केसाच्या मर्यादेची बाजू मंद पुसट दिसावी. रेघ मारल्याप्रमाणें हजामतीची मर्यादा दिसूं नये. व हजामतीचा रंग कपाळाकडे फार आणूं नये. हजामतीच्या खेरीज कपाळवटी ज्यास्त रूंद असली तरी गईर नाहीं. किंवा डिंक घातल्या शिवाय पाण्यांत हजामतीच्या रंगाचे मिश्रण करून तो रंग लावून सुखल्यावर फडक्यानें कापसानें पुसून काढावा. ह्मणजेही काम होतें.

केंस रंगविणे तबकिरी अंबर पातळ करून बशींत घेऊन केंस रंगवावें. ते माती झांकली असे रंगवून, दुसरा तबकिरी अंबर निराळ्या बशींत घेऊन त्यांत थोडा काळा रंग मिळवून पातळसर करून रंगविलेल्या केंसांत जो खोलगट, खोलगट, भाग असेल त्यांत हा रंग लावावा. बाकी कुरळेपणा, कपाळावर आलेले केंस वगैरेचें विवरण रेखणी प्रकरणांत पूर्वीं लिहिलेंच आहे.

वॉरनीश–प्रथमच जास्त घेतलें आणि तें लावण्यास वेळ लागला तर तें दाट होत जातें, व पुढें पुढें तें चांगल्या रीतीनें लावतां येत नाहीं, व काम पुरें होऊन उरलेल्यांत केर वगैरे पडल्यामुळें शिलकीस असलेल्यांत ओतून ठेवणें बरें नव्हे. याकरितां थोडें थोडें घेऊन काम करावें. स्वच्छ पेल्यांत थोडें काढून, लावण्यायोग्य पातळ होण्यासाठीं, व लवकर सुकण्याकरतां, त्यांत टरपेन तेल घालून बोटानें ढवळून दोहोंचा चांगला मिलाफ झाला ह्मणजे, पांच सात मिनीटानीं हें लावावें. यासाठीं लहान मोठें अशीं दोन कलमें घेऊन, लहान कलमानें, गणपतीच्या किंवा चित्रांच्या,

प्रथम डोळ्यांत लावावें. मग गणपतीचे दांत, कपाळावरच्या गंधाचा खालचा अर्धवर्तूळ, टिका असल्यास त्यास, नखें, पुसट पुसट असें ओंठास, कुंकू वगैरे चकाकीचे निर्मळ भागांवर वॉरनीश पूर्वी लावावें. नंतर सर्प, व जायवळ--यांवर, (भिंवयांस लावू नये. त्या चमकत नसतात.) तसेंच सुटे सुटे दाखविलेले केंस, कपाळावर आलेल्या बटा वगैरे कपड्यावर आलेले पातळ पातळ केंस अशा बारीक मेहनतीच्या रंग कामावर वॉरनीश लावूं नये. वेळीं ओरंगळ येऊन काम बिघडतें. पातळसर पुष्कळच केंस पुढें वगैरे अन्यजागीं आलेले दाखविले असल्यास, त्यांचा नरमपणा व्यक्त होण्यासाठीं, अगदीं पुसट पुसट तजविजीनें कलम फिरवावें. तें फक्त केंसांवरच, त्यांत दुसऱ्या रंगाचा कोठें कोठें भाग दिसत असेल त्यावर न लागेल अशी तजवीज ठेवावी.

उंदरांच्या डोळ्यांस लावावें, आंगास लावूं नये. कोणत्याही चित्राच्या डोकीवरच्या, विंचरून बसविलेल्या केंसांस लावणे, तेंही माफक लावावें, फाजील चकाकी उपयोग नाहीं. कांचेसारखी चकाकी केंसास उपयोग नाहीं. डोळे व त्यांसारखी चकाकणारी वस्तु असेल तेथेंच ज्यास्त लावावें.

मारबलसारख्या घोटींव दगडाचें काम यावर शंखजिऱ्यानें व कपड्यानें चोळून जर चकाकी येत नसेल तर वॉरनीश लावावें. पांढरट भाग वॉरनीशानें मलीन दिसतो. सिंह, वाघ, हरीण वगैरे चित्रांच्या डोळ्यांखेरीज वॉरनीश शरीरास लावूं नये. फळ

फळावळ केली असेल, त्यांस शंखजिऱ्याच्या सहाय्यानें कपड्यानें घोळून जिलाई येईल तितकी पुरेशी आहे. द्राक्षासारख्या फळांचा रंगच वॉरनीसांत करून लावावा. व त्यावर आणखीं वॉरनीश दिलें तरी चालेल.

मुद्दा—हा, कीं, कृत्रीम असून पहाणारास खऱ्यासारखा भास होऊं देणें, हेंच चित्रकलेचें तत्व चित्रकारानें सदैव लक्षांत बागवून काम केलें पाहिजे. तें तत्व विशेष घांसून चकाकी आणून, किंवा अती वॉरनीश लावून, डामराच्या तारेप्रमाणें काम दाखविल्यानें सिद्ध होत नाहीं. वस्तूकडे लक्ष देऊन घांसून किती गुळगुळीत करणें, व वॉरनीश लावून किती चकाकी आणणें ती आणावी.

शिंदीच्या पातीचीं टोंकें फाडून अरुंद करून ती किरमेजी रंगांत रंगवून ठेवून सुखल्यावर त्यांस वारनीस लावून वाळवून ठेवावीं किंवा वारनीसांतच किरमेजी रंग कालवून त्यांत रंगवून ठेवावीं. वेळेवर सर्पाच्या तोंडांत जिभा म्हणून दोन दोन जिभोळ्या शिरसानें त्याच्या तोंडांत चिकटवाव्या.

किरमेजी—रंग वेळीं नसेल तर अगदीं लाल हिंगूळ व थोडा ब्ल्यू हे रंग एकत्र करून किरमेजी रंगाइतपत रंग बनवावा. म्हणजे साधारण किरमेजी रंगाचें काम करून वेळ मारून नेतां येते. पण हा रंग शिरसांत, व थोडा थोडा, जरूर लागेल तसातसा करून

घ्यावा. एकदम पुष्कळसा करून ठेवूं नये, काळा पडतो वुरशी येते.

वर्खावर किंवा गोल्ड पेन्टवर रंगकाम करतांना बोळल्याप्रमाणें रंग लागतो, सारखी रेघ वगैरे येत नाहीं, करितां त्या कलमास मधून मधून रिठ्याचें पाणी लावीत जावें. किंवा एक दोन थेंब त्या रंगांत टाकावें. जास्त घालूं नये. रिठे नसल्यास शिकेकाईचें पाणी. तीहीं नसल्यास निदानचें, साबणाचें पाणी.

प्रकरण ८ वें.

—◇—

उपयुक्त विषय.

१ **गोल्ड पेन्ट**–लावावयाचें असेल त्या जागीं प्रथम शिरसांत केलेला सफेता लावून तो सुखल्यावर स्वच्छ कपड्यानें चोळलासा करून नंतर त्या सफेत्यावर गुलाबी रंग लावावा. गुलाबी नाहींच तर नारिंगी पिवडी लावावी. ती ही कपड्यानें चोळून नंतर त्यावर गोल्ड पेन्ट लावावें. म्हणजे चांगलें खुलतें. किंवा गुलाबीवर व पिवडीवर गोल्ड साईस लावून तें सुखल्यावर मग गोल्ड पेन्ट लावावें, ह्यास चकाकी जास्त पण किंचित मलीन दिसते.

२ **पुढें**—ठिकठिकाणीं सांगितलें आहे तरीही हें ध्यानांत ठेवावें कीं, सफेत्यापासून शेवट रंगकाम पुरें होईपर्यंत पातळ रंग लावण्याची तजवीज ठेवावी, पातळ लागलेला पुन्हा लावून सुधारतां येतो. पण जाड लागलेला कमी करतां येत नाहीं.

३ **शालीची किनार**–व त्यावरची बुट्टी, दाखविण्यापूर्वी शालीच्या अंगाचा रंग द्यावा. तो देतांना जेवढी किनार (कांठ) रुंद दाखवावयाचा असेल तितका भाग राखून मग अंग रंग लावावा. तो लावल्यानंतर राखलेल्या भागावर केशरी किंवा बहुधा नारिंगी रंग, अरुंद, रुंद, असा न होतां, सारखा पट्टा दिसेल असा लावावा. शिवाय पदरावरच्या आंतल्या मोठाल्या कैऱ्या असतात. त्या आकारानें तेथेंसुद्धां नारिंगी पिवडी लावून ठेवावी.

पदराकडचा अखेरचा थोडासा भाग अंग रंगानें रंगवावा. किंवा अगोदर पट्टा, मोठ्या कैऱ्या, नारिंगीनें आंखून घेऊन, मग अंगरंग द्यावा. नंतर त्या पट्यावर आणि मोठ्या कैऱ्यांवर, हिरवा, ब्ल्यू, किरमेजी, गुलाबी, व काळा, या पांच रंगांचा अनुक्रमें वेगवेगळा तुषार द्यावा. तुषारांत ठिबका दिसतां नये. व बोजडपणा दिसूं नये. ह्या सदरील रंगाचा तुषार, व पट्टा दिलेला नारिंगी ह्या सर्वांचा मिळून एकप्रकारचा, कशीदाच आहे कीं काय, असा सर्वांचा सारखा भास व्हावा. अशा तऱ्हेनें तुषार दिला पाहिजे. नंतर मग त्या तुषारावर, बारीक कैऱ्या वगैरे ढळढळीत, व शांत, असें तऱ्हे-तऱ्हेचें बुट्टीचें, काम झालें पाहिजे, तें प्रत्यक्ष शाली पाहून, पाहून, ध्यानांत आणून बुट्टी दाखवावी. हें काम फारच कठीण आहे, परंतु दुरून शाल पाहिली असतां जें ढळढळीत काम नजरेंत येणारें असेल, त्यांतून जें आपणांस साधेल, तितकेंच पण गिजबीट न दिसतां, त्या चित्राच्या शालीच्या, अरुंद किनारींत, व कैरींत, होईल तितकेंच, सुटें, सुटें रंगकाम बारीक कल-मानें, आंखूड, लांब रेघा देऊन करावें. शालीच्या आंचळ्यांच्या आंत, व पदराकडच्या पट्टयाच्या बाहेर, दोन तीन रंगांच्या रेघा दिसतात, त्या व कांठाच्या आंतल्या बाजूस अंगरंगावर, करवती-सारख्या किंवा अन्य तऱ्हेनें आंखूड आंखूड पातळ रेघा दिसतात, मोठ्या कैरीच्या बाहेरच्याकडेनें मोर पिसाप्रमाणें रेघा दिसतात, किनारीच्या अगदीं बाहेरची कोर, निराळी विणकरीची पट्टी, फिती-प्रमाणें शिवलेली असते. ती, व तिच्यावर कांहीं तरी एक प्रकारची

बारीक कशिद्याची, किंवा बारीक फुलांसारखी ओळ दिसते. ती, वगैरे शाली किनारीच्या मुख्य मुख्य कामाचे प्रकार दाखविण्यांत चुकूं नये. असें करतां करतां त्यांतील मर्म सहज लक्षांत येत जाईल. किनारीच्या, बाहेरच्या, कोरीच्या, फितीच्या, रुंदी इतकीच, पदराच्या शेवट कोंपऱ्यावर, स्वतंत्रच, एक रंगी फितीचा तुकडा असतो. तो कोरीच्या पुरवणी करतां म्हणून तेथेंच शिवलेला असतो. हा तुकडा शालीच्या कशिद्याच्या रंगकामाची निशाणीच आहे असें समजावें. आणि तो ढळढळीत दिसेल असा रंगवावा.

याहून जास्त समजूत पडण्यासारखें विवरण करून लिहिणें ह्मणजे शालीच्या रंगकामाबद्दल दुसरें येक लहानसें पुस्तक होईल.

शालीच्या उलट किनार रंगविणें ह्मणजे, सुलट प्रमाणेंच नारिंगी रंग लावून त्यावर थोडा थोडा तुषार मारून, तुषारांच्या रंगांच्या वांकड्या तिकड्या गिजबीट धनुष्याकार, वाटोळ्या अशा रेघा द्याव्या. म्हणजे कशीद्याच्या सुताचा भाग एकांत एक मिश्र झालेलासा भास होऊन, उलटी किनार आहे असें दिसतें.

४ **हिरव्या मिन्या** सारखा रंग करावयाचा असेल, त्या जागीं गोल्ड साईसवर रुपेरी वर्ख चुरमडल्याशिवाय फारच सफाईदार लावावा. साधारण मोठा साखऱ्या (मोरस) प्रमाणें हिरव्या रंगाचे चकचकीत खडे असलेली कुपी, (चिना ग्रीन क्रीस्टल इ. एच्.) रंगवाल्यांकडे मुंबईस विकत मिळते. तिच्या झांकणावर मिन्याप्रमाणें हिरवा रंग चकाकीत असतो, ही खूण. ती आणून सुमारें कानकोरणें भर किंवा जास्त जरूर

असेल त्या बेतानें त्यांतील ते खडे दुसऱ्या एका बाटलींत घालून ठेवावे. व अती उत्तम पैकीं स्पिरीट आणून त्यांतलें थोडें, स्पिरीट निराळ्या बाटलींत घेऊन, लाखेची पूड वस्त्रगाळ करून त्यांतील थोडी पूड त्या स्पिरीटमध्यें घालून खूप हालवावी. त्यावेळीं बाटली गच्च बंद करावी. कांहीं वेळ तशीच ठेवून ती लाख विरघळून निश्र झालीशी पाहून, बाटलींतील थोडा अंश बोटास लावून दुसरें बोट वर दाबून उचलून पहावें. ठीक चिकटपणा आला आहे, असें वाटलें म्हणजे, त्या घेतलेल्या गोड्या खड्यांत, ह्यांतील लोशन थोडें ओतून बाटली हालवावी. कांहीं वेळानें खडे विरघळून एक जीव झाला म्हणजे तो रंग, लावलेल्या रुपेरी वर्खावर, पट्टा न दिसेल, व कलमावर कलम चढून तेथें रंग जरा काळसर होतो, तो न होईल, अती दाट रंग न लागेल, ठिकसाठीण, कपड्याप्रमाणें दिसेल, अती चिकट न होईल, असा सदरील कृतीनें रंग तयार करून लावण्याची स्थिती झपाझप ठेवावी. जशी जागा लहान व मोठी असेल त्या मानानें, कलमही लहान मोठें घ्यावें. हा रंग चित्राच्या चोळीवर, ज्याकिटावर, तुमानीवर रुपेरी वर्ख लावून त्या वर्खावर लावावा. तो हिरवा रंग वाळल्यानंतर गोल्ड साईस लावून त्यावर सोनरी वर्ख लावून, वाटल्यास गंडेरी काम दाखवावें, किंवा मनेच्छित करावें. ह्या सदरील मिश्रणाच्या सर्व बाटल्या गच्च बूच लावून ठेवाव्या. रंग लावते वेळीं थोडा थोडा बाहेर ओतून घेऊन लावावा. कारण स्पिरीट असल्यामुळें लवकर सुकतो, व घट्ट होतो. एखाद्या पितांबरासही वाटल्यास द्यावा.

प्रथम कलम अडचणींत टेंकून मग मोकळ्या भागावर आणावें. फ्रेंच पालीस म्हणून जें विकत मिळतें व लांकडी कामावर सुतार लोक उपयोग करतात, तें असेंच असून, वेळीं त्यांतही हा हिरवा रंग घालून काम भागतें. परंतु आपण स्वतः बनविलेल्याप्रमाणें तो स्वच्छ होत नाहीं, पण खटपट नाहीं. आयतें फ्रेंच पालीस आणलें म्हणजे झालें.

५ **गंडेरी**–जरीचें काम करणें तर, मूळ ज्या रंगाचा कपडा दाखवावयाचा असेल तो रंग लावून सुखल्यावर तो फडक्यानें चोळून चकाकी आणली म्हणजे रेशमी भास होतो. नंतर रंगाची पट्टी व वर्खांची पट्टी सारखीच दिसेल अशा तऱ्हेनें, शिरसाचा चिकोढा किंवा गोल्ड साईसवर वर्ख लावावा. किंवा हे दोन्ही न लावतां, गोल्ड पेन्टनेंच गंडेरी पट्टी दाखवावी. परंतु याच्याखालीं प्रथम गुलाबी किंवा नारिंगी रंग लावला पाहिजे त्या शिवाय गोल्ड पेंटची जरीपट्टी खुलणार नाहीं. याउपर मर्जी असेल तसें करावें. कोणी कोणी या गंडेरी कामास, रंगाची पट्टी ज्यास्त रुंदीची ठेवून जरीची कमी रुंदीची ठेवतात, कोणी जरीची जास्त ठेवतात कोणी जरीची नागमोड दाखवितात. वाटेल तसें करावें.

६ **बसंती** रंग, स्त्री चित्राच्या चोळीचा किंवा आणखी कोठें बसंती रंग दाखवावयाचा असल्यास, सफेत्यांत थोडा पिवळा अंबर घालून मिश्र करून सफेत्याचा पांढरा फटफटीतपणा कमी करावा. नंतर जरीचा किंवा नुसता रेशमी कांठ दाखविणें असेल, ती जागा सोडून बाकीच्या त्या कपड्यावर हा सदरील सफेत रंग लावावा.

नंतर जाडचा केंसांचें कलम घेऊन तें उभें धरून, गणपतीच्या सोंडे-वरच्या तुषाराप्रमाणें, पण पातळ तुषार, किरमेजी रंगाचा द्यावा. पण फार सावधगिरीनें द्यावा. कमी ज्यास्ती न होतां, पातळ पण सर्व सारखा दिसला पाहिजे. वाटल्यास अशा रंगाचा खण किंवा चोळी जवळ घेवून काम करावें. ह्या रंगाच्या चोळीचे कांठ, नाग-पुरी रुईफुली, कर्वती, व गोमीं असे शोभतात. तसा जरीकांठ शोभत नाहीं.

७ **माती कागावर कसब**—ज्याकीट, कबज्या, चोळीचे कांठ विजारीचा खालचा (पावला जवळचा) कांठ, वगैरे कसब काम दाखविणें झाल्यास, टिकल्या, चांदल्या [स्पेंगल] म्हणतात, त्या लहान व मोठ्या साईजच्या असतात. लहान मुली कपाळावरच्या कुंकवावर चिकटवितात. तशा खऱ्या व खोटया, दोन्ही जातीच्या मुंबईस टोपीवाल्यांकडे किंवा मसीदीजवळ बाहेर जरीची फीत वगैरे विकणारांकडे मिळतात. त्या व झीग म्हणून, लिळलिळीत दोन तीन तऱ्हेची असते. तीही आणावी. तशीच तांब्याची तार बारीक पैकीं, आणून ती तार दुहेरी करून वांकीच्या दोरीहून कांहीं जास्त असा पीळ भरून तिची दोरी तयार करावी. नंतर टिकलीच्या बाहे-रील गोल भागाएवढ्या [ती टिकली आंत बसेल अशा गोळ] कड्या पाडण्यासाठीं, पितळेची किंवा तांब्याची सळी आणून, तारेची केलेली दोरी त्या सळी सभोंवार गुंडाळून, सळी काढून, त्या गुंडळीच्या, कातरीनें गोल कड्या पाडाव्या. व त्यांचीं तोंडें मिळवून घ्यावीं. तारेची दोरी कांहीं शिल्लक असावी.

मग ज्या किनारीवर, वगैरे कोठें जसें रुंद अरुंद कसब काम दाखवावयाचें असेल, तेथें त्या कड्या चिकटण्या योग्य असा शिरस शिजवून तयार करून लावावा. तो अर्धवट सुकल्यावर, किनारीच्या दोन्हीं कडेनें तारेची दोरी दुहेरी चेपून बसवावी. अधिक लांब झाली तर तेथच्या तेथेंच तुकडा पाडावा. कमी झाल्यास दुसऱ्या तुकड्याचा सांधा द्यावा. एकदम वीत दीड वीत लांब दोरी न बसेल तर आंखूड तुकडे करून बसवितांना तोंड मिळवण नीट करावी. कांठ रुंद असेल तर टिकलीची रांग आंत बसेल अशा बेतानें आणखीं दोन दोन दोऱ्या बसवाव्या. मधली जागा जी ज्यास्त राहील त्यांत सर्पाच्या वळणाप्रमाणें एकेरी किंवा दुहेरी दोरी बसवावी. प्रत्येक वळणांत गोल पाडलेल्या कड्या, तीन, निदान एक तरी बसली पाहिजे. त्या सर्पाकृती वळणांत पुष्कळ जागा असल्यास, पांच अथवा सात फुलाच्या गोल आकारानें, कड्या बसवाव्यात. अगदींच कांठ अरुंद असला तर पूर्वीं सांगितल्याप्रमाणें दुशिकडे दोन दोन दोऱ्या बसवून, मधून एकेक वाटोळी कडीची रांग बसवावी. फुलाच्या आकारानें ज्या कड्या बसविल्या असतील त्या फुलास देंट असें समजून दोरीचे सरळ तुकडे पाडून बसवावे. फुलाजवळ किंवा त्यांतल्या त्यांत जागा असेल तर तांबड्या भोपळ्यांतील बीच्या आकाराचीं, बारीक तारेच्या दोरीचीं पानें करून बसवावीं, त्या पानासही देंट दाखवावा, याप्रमाणें करून सर्व जागा भरली म्हणजे, आणखी एकवार, सर्व कड्या व दोरी वगैरेवर पातळसा शिरसाचा हात द्यावा. परंतु जर तारेचें बसविलेलें काम बरोबर चिकटलें नसलें तर शिर-

साचें काम खडखडीत सुकल्यानंतर, त्या कामावर गोल्डसाईस किंवा चिकोटा लावून, खऱ्या सोन्याचा वर्ख दुहेरी बसवावा. त्या गोल्ड-साईसमध्यें व चिकोट्यांत केशरी पिवडी मिश्र केली पाहिजे. वर्ख चांगला सुकल्यावर झाडून झाला म्हणजे, बसविलेल्या गोल कडींतून पिवडी मिश्र केलेला असा शिरसाचा बारीक ठिबका ठेवीत जाऊन, त्या ठिबक्यावर एकेक टिकली बसवीत जावी. ती बसविली म्हणजे टिकलीच्या भोंकांतून, खालीं लावलेल्या शिरसाचा बिंदू वर येतो, त्यावर, किंवा बिंदू न आल्यास बारीक टोंकाच्या कलमानें टिकलीचे भोंकावर बारीक बिंदू देत जावें. त्या बिंदूवर लिळलिळीत झीगचे बारीक तुकडे करून बसवावे. व मधून मधूनही कोठें कोठें वाटल्यास बसवावे. तसेंच हिरव्या तांबड्या मिन्याच्या टिकल्या (कटोऱ्या) कोठें मधून मधून बसवाव्या. वेळीं त्या संग्रहास नसतील तर मिन्याचे बारीक तुकडे करून वाटल्यास बसवावेत. पण अतीच बसविले तर तें काम पोरकट दिसतें. हें सर्व काम झालें म्हणजे, कसब काम केल्याखेरीज जी मधली जागा फक्त वर्खच लागलेली, सपाट अशी मधून मधून दिसेल, त्या त्या ठिकाणीं त्याच कपड्यास जो रंग द्याव-याचा असेल, तो रंग बारीक कलमाच्या टोंकानें भरावा. तशीच कसबकामाच्या अगदीं बाहेरची कपड्याची कोर रंगवावी. म्हणजे हें कसबकाम हुबेहुब दिसतें. हें काम करण्याचा फक्त मार्ग सांगि-तला आहे. ज्याणें त्याणें आपली बुद्धी चालवून वाटेल तशी मेहनत करावी, आणि शिफारस मिळवावी.

८ **मातीकामांतच**—कपड्यावर भरगच्च व उठावदार कसब-काम दाखविणें असेल, तर मातीकाम पुरें होण्याचे वेळीं, ज्या तऱ्हेवर काम दाखविणें असेल, तशा आकारानें सुमारें सूत दीड सूत जाडीची माती त्या त्या योजलेल्या जागीं लावावी. ती साधारण सुकल्यावर त्या सर्व भागांवर बारीक टोंकाच्या कोरण्यानें, मुरावळे टोंचतात, तशी टोंचावी. टोंचून झाली ह्मणजे त्यांत वेल, पत्ती, फूल, कैरी, वगैरे आकार, निरनिराळा आणण्यासाठीं, कोरण्याच्या बारीक पातळ टोंकानें रेघा माराव्या, आणि सदरील आकार आणावेत. नंतर मध्यें मध्यें कोठें कपड्याचें आंग दाखवावें लागेल, टिकल्या, मिन्याचे तुकडे बसवावे लागतील, तशी योजना करून त्या त्या ठिकाणची टोंचलेली माती, थोडी थोडी युक्तीनें, कोरण्यानें काढून, रंग, मिना, टिकल्या, यांसाठीं योग्य अशी ती जागा त्याच वेळीं तयार करून ठेवावी. रंग देते वेळीं सफेता लावल्यावर नारिंगी व केशरी पिवडी ह्या दोन एकत्र करून हिचा हात देऊन तो सुकल्यावर दुसरा हात द्यावा. तो वर्ख चिकटण्यायोग्य झाला असें पाहून त्यावर सोनेरी खरा वर्ख बसवावा. हा वर्ख न झाडतां तेथच्या तेथेंच कापसानें, मऊ ब्रशानें, चेपून बसवावा. नंतर तो वर्खाचा भाग चांगला सुकल्यावर, सदरीं सांगितल्याप्रमाणें मधून मधून रंग भरावा, व किंचित शिरस लावून त्यावर मिना, कटोऱ्या, टिकल्या, झीग वगैरे चिकटवावें. हें उठाव कसबकाम दुरून खऱ्या प्रमाणें दिसतें. इजारीवर, ज्याकीट कबज्यावर, चोळीचा कांठ, कोटाच्या पाठीमागे मानेजवळ, बावळ्यावर कोट, ज्याकीटची छातीकडची

बाजू वगैरे, कोठें योग्य वाटेल तेथें करावें. मुसलमान जातींपैकीं चित्र असून श्रीमंती कपडा वापरण्यायोग्य, असल्यास, ह्या कसब-कामाचा उपयोग करावा लागतो. तारेच्या कसबकामाची तऱ्हा व शोभा निराळी, व ही तऱ्हा शोभा निराळी. ह्या कामींही वर्खा-ऐवजीं, चांगलें गोल्ड पेंट असून वापरलें तरी हरकत नाहीं.

९–१ मातीकाम करतांना असें धोरण ठेविलें पाहिजे कीं, रंग-काम करते वेळीं कांहीं कांहीं ठिकाणीं रंग देण्याची अडचण पडते. ती पडूं नये, अशा योजनेनें मातीकाम करावें. कांहीं भाग खोल आरपार असतात, तेथें नजर पोंचत नाहीं, व कोरणीनें साफ करतां येत नाहीं, पालीस करतां येत नाहीं, व रंग देण्याची पंचाईत पडते. ह्या जागीं रंग न लागला तर तेथील व्यंग दुरून दिसण्यांत येतें, परंतु जवळून सुधारतां येत नाहीं. अशा भागावर चित्रासंबंधीं वस्त्राच्या सुरकुत्या, व वस्त्राचा सफाईदार भाग, शोभेलसा दाखवून ही अडचण झांकून टाकावी.

२ धोतर, शेला, शाल, लुगडें, पितांबर वगैरेंचे कांठावर वर्ख लावण्यात व बारीक रंगकाम करण्यास अडचण पडूं नये, असें धोरण ठेवून मातीकाम रचावें. प्रत्येक कपड्याच्या किनारीचा भाग योग्य, योग्य, ठिकाणीं सुलट व उलट दाखविण्या-साठीं मातीस तसा आकार आणावा. व रंगकामाच्या वेळीं उलट सुलट काम रंगवावें. माती कामांत वस्त्रांचा कांठ सर्व ठिकाणींच, फळी, पट्टी, पत्र्याप्रमाणें, अगदीं सपाट असा ठेवूं नये. योग्य योग्य ठिकाणीं उंचवट, सखलवट, वांकणदार, सुरकुतलेला, असा दाखवावा.

३ सर्व कपड्यांच्या सुरकुत्या सर्व सारख्याच दाखवूं नये. लहान मोठें, बारीक, पातळ, जाड, रुंद, अरुंद, कोठें आंगाजवळ, कोठें अंगापासून जरा दूर, हे प्रकार प्रत्यक्ष मनुष्याचे, कोठें कसा बसला, उभा, टेंकलेला, वगैरे नेहमीं पहाण्याचा नाद ठेवून ध्यानांत घेऊन, किंवा चित्र रचतांना मनुष्य जवळ बसवून त्या आधारानेंच परंतु आपणांस रंगवितांना अडचण पडूं नये, अशा तजविजीनें माती काम रचून आकार आणावा. प्रत्यक्षापैकीं अर्धामुर्धा भाग जरी साधला तरीही तो रंगल्यावर, इझी ' नॅचरल ' (सहज) दिसतो.

४ वृद्ध स्थितीच्या चित्राचें शरीर मातीकामाचे वेळीं खवणीच्या कोरण्यानेंच साफ करावें, त्यावर अगदीं सफाईचें कोरणें बिलकूल फिरवूं नये. तसें खरबरीत ठेवून साधारण सुकलें म्हणजे मग जाड केसांच्या कलमानें, साधारण पाणी मारावें. तें जेथें जेथें साधारण सफाई पाहिजे, असे उंचवटे, त्यांवर चांबडीं तणावलेली, अशा जागीं तें पाण्याचें कलम जरा जास्त चोळावें, म्हणजे खवणीचा खरबरीतपणा कांहीं कमी होतो, तितका पुरे. तें चित्र सुकल्यावर, पालीस कागदानें घांसूं नये. तसेंच खरबरीत रंगवावें. व त्या वेळीं या रंगासही कोठें कोठें योग्य ठिकाणीं शेड (छाया) दाखवावी. असें हें केलेलें काम म्हातारपणचें दिसतें. ह्याच्या अंगाचा रंग, योग्य योजना करून तयार करावा.

५ **कांहीं** कांहीं माती काम करणारांच्या अशा ढोबळ चुका होतात कीं, चित्र कोरून तयार करतेवेळीं कपड्याचे, शरीराचे, लोड व तक्याचे, योग्य भाग न दाखवितां, कठीण भागांत मऊ

भाग शिरलेला, रुपलेला, धोतर वगैरे कपड्यानें शरीराचा भाग दव-लेला, लोड तक्या वगैरे यांच्या योगानें शरीराचा भाग चेपटलेला, वगैरे अशा चुका फारच होतात. तर ह्या चुका न होण्याबद्दल खबरदारी ठेवून, प्रत्यक्ष मनुष्याची टेंकलेली, स्थिती पाहून लक्षांत वागवून अशा चुका न होतील अशा तऱ्हेनें मातीकाम कोरतेवेळीं, दुसऱ्या बरोबर गोष्टी बोलत असलें तरी, इकडे लक्ष्य ज्यास्त असावें.

६ मातीकामावर सोन्याच्या खऱ्या वर्खाचें गिलीट काम.

१ पहिल्यानें, आपणास खालीं लिहिलेल्या मिश्रणाची जेवढी जरूर असेल त्या बेतानें, गणपती करण्याची माती (खडू) वस्त्र-गाळ केलेली अशी पूड घेऊन लोण्याइतका घट्ट शिरस तयार करून त्यांत ती माती भिजवून कालवून एकजीव करावा. नंतर त्या मातीस आकाशी रंग येईल, इतका निळा (ब्ल्यू) रंग बेतानें घालून मिश्रण करावा. नंतर रुंद तोंडाची बाटली किंवा बरणींत अर्धी-अधिक बरणी पाणी घालून तींत ते गोळे गच्च चेपून भरून, त्यांवर सुद्धां थोडें पाणी येईल अशा बेताचें आणखीं लागलें तर पाणी घालावें. [लोणच्यावर तेल येतें तसें] अशा तऱ्हेनें हें लोशन वर्ख लावून गिलीट करण्याचे पूर्वी जितके अधिक दिवस कुजेल तितकें चांगलें. अशी ही गोळे भरून ठेविलेली बरणी, अगदीं घट्ट तोंड बंद करून ठेवावी. नंतर कधीं आपणास उपयोग करावयाचा असेल तितके गोळे काढून साधारण गरम पाण्यांत घालून हातानें

कुसकुरून पाण्याचा त्याचा मिलाफ झाला ह्मणजे, कपड्यांत गाळून घ्यावें. [ह्या मिश्रणाचे, वर्ख बसविण्याच्या जागीं निदान सात आठ हात दिले गेले पाहिजेत.]

२ रंग लावण्याच्या बाततींत पातळ रंग लावण्याची जी स्थिती पुर्वी सांगितली आहे तितपत हे गोळे ऊन पाण्यांत घालून पातळ करून मग गाळावें. सात आठ हात द्यावयाचे आहेत, हें ध्यानांत आणून त्या बेतानें, शिरसाचा चिकटपणा कमी होऊं नये, अशा बेतानें, गोळे पातळ करण्याची तजवीज ठेवावी. गिलीट काम चांगलें वठणें हें ह्या पहिल्याच कृतीवर अवलंबून आहे. म्हणून ही कृती विशेष काळजी पुरस्सर करणें जरूर आहे. ज्या मातीकामावर गिलीट करावयाचें तें काम शून्य नंबरच्या पालीस कागदानें पालीस करून, गुळगुळीत करून नंतर हे सदरील शिरसाचे हात देण्यास तें काम घ्यावें. १ ला हात दिलेला चांगला वाळल्यावर मग दुसरा, अशा तऱ्हेनें हात पुरे करावे.

३ वर लिहिल्याप्रमाणें झालें म्हणजे सफेता तयार करण्याची कृती खालीं लिहिल्याप्रमाणें करावी. जरूरीच्या मानानें चॉक (खडू)—ची बारीक वस्त्रगाळ बुकणी करून ती बुकणी साधारण पातळशा शिरसांत खलून गाळून घ्यावें. ऑईल पेंट करतांना जितका (हाबक) सफेता पातळ असतो, व पातळ करतात, तितका पातळ हा चॉकचा पातळपणा झाला पाहिजे. आणि पूर्वीं दिलेल्या सात आठ हातांवर या खडू मिश्रणाचेही सात आठ हात द्यावे. पण हें लक्षांत ठेवावें कीं प्रत्येक हात चांगला खडखडीत वाळल्यानंतर दुसरा द्यावा, व

कोठें जाड कोठें पातळ असें होतां कामा नये. कदाचित् कोठें जाड लागलासें झालें तर, स्वच्छ कपडा पाण्यानें भिजवून साधारण ओलसरपणानें तो जाड झालेला भाग पुसून कमी करावा. याप्रमाणें हे दिलेले हात वाळल्यानंतर बारीक पालीस कागदानें हळू युक्तीनें घांसून सर्व सारखा होईल असा गुळगुळीत करावा. नंतर पुन्हां आणखीं पूर्वीच्या आकाशी रंगाच्या शिरसाचे, पातळसर असे, पण मिळून लागतील असे, सात आठ हात द्यावे. हे हात देतानां जर मध्यें कोठें थोडी बाजू चुकून राहिली, तर ती लगेच सुधरूं नये. पुन्हा त्यावर हात देतांना सुधरून घ्यावी. हेही हात एक सुकल्यावर मग दुसरा, तो सुकल्यावर तिसरा, असे द्यावे. याप्रमाणें पूर्वीचे आकाशी रंगाच्या शिरसाचे आठ, मध्यें खडूचे आठ, नंतर पुन्हा त्यावर, आकाशी शिरसाचे आठ, मिळून चौवीस हात दिलेले खडखडीत सुके-तांपर्यंत हवेवर धुरळा त्यावर न उडेल, अशा जागीं तें काम ठेवावें. नंतर सुकलें म्हणजे स्वच्छ फडक्यानें धुरळा झाडून झांकून ठेवावें. नंतर निवाऱ्याच्या आणि उजेडाच्या अशा एकांत जागीं, या सदरील कामावर वर्ख लावून गिलीट करण्याच्या कामास बसावें. तेथें सामुग्री पाहिजे तीः—

४ वर्ख लावणें प्रकरणांत सांगितलेली फळीच्या तुकड्यावरची, चांबड्याची (शामालेदरची) १ गादी, उंटाच्या केंसांचे बनविलेले चपटे ब्रश दोन, यांस (कुपन) असें ह्मणतात. ते, सेबल ब्रश विकणारांकडे हे मुंबईंत मिळतात. शिवाय एकादा सेबल ब्रश, खऱ्या सोनेरी वर्खाची चोपडी, किंवा सोन्याचा गांवठी वर्ख, चाकू, कापूस,

स्वच्छ लहानसा फळीचा गुळगुळीत तुकडा, थोडें तूप, स्वच्छ पाणी, व पेला सोनार लोकांजवळ असते तशी ओपसळी, इतकी तयारी पूर्वी करावी,

पूर्वी स्वच्छ फळीच्या तुकड्यास तूप पुसट असें सारखून ठेवावें, मग त्या गादीवर वर्खाचें पान सफाईनें सोडावें, मग चाकूनें बेतशीर असे वर्खाचें तुकडे पाडावे.–(बरफी कापतात तसा चाकू त्या वर्खाच्या पानावर ओढावा.) मग वर सांगितलेलें (कूपन) चपटा ब्रश त्या पळीवरच्या तुपावर टेंकावा त्या आधारानें वर्खाचा तुकडा उचलावयाचा. दुसरा चपटा ब्रश घेऊन, पेल्यांत पाणी घेऊन, त्यांत तो बुडवून, वर्खाचा तुकडा बसविण्याच्या जागीं तो पाण्याचा ब्रश फिरवावा, त्या ओलाव्यावर वर्खाचा उचललेला तुकडा टेंकून ब्रश उचलल्याबरोबर त्या तुकड्यावर तोंडानें फुंकर घालावा. म्हणजे तो तेथें चिकटतो. याप्रमाणें भागावर सर्व सारखा कोठें जागा न सुटतां वर्ख बसवून झाला म्हणजे चांगला सुखूं द्यावा. नंतर तो वर्ख ओपसळीनें हळूहळू घांसून त्या कामास जिलई आणावी. अडचणीच्या जागीं ओपसळीच्या टोंकानें जिलई आणावी. म्हणजे तो भाग गिलीट केल्याप्रमाणें दिसतो, व तें काम सर्व सोन्याचें आहे असें दिसतें.

सूचना—वर्खाचें गिलीट करावयाचें असेल तें माती काम करतेवेळीं जो बारीक, अरुंद, व खोलगट असेल तो भाग जरा जास्त रुंद व जास्त खोल ठेवावा. म्हणजे शिरसाच्या लोशनाचें,

२१ किंवा २४ हात द्यावयाचे असल्या कारणानें, ते भाग अगदीं बुजून जाणार नाहींत. ही सूचना मातीकामाचे वेळीं अवश्य ध्यानांत आणावी.

श्रीगुरुकृपेनें प्राप्त झालेलें-मातीकाम व रंगकला विज्ञान, या पुस्तकांतील सर्व विषयांचें विवरण निःकपटपणें पडदा न ठेवतां लिहिलें आहे. माती कामावर सोन्याच्या वर्खाचें गिलीट, हा विषय शेवटीं लिहिला आहे. या योगानें मातीकाम व रंगकाम वगैरे उत्तम प्रकारें करूं इच्छिणाऱ्या सर्वांचें अंतःकरण सोन्याप्रमाणें स्वच्छ राहून त्यांचें काम गिलीटाप्रमाणें झकाकदार होवो, असें इच्छितों.

प्रकरण ९ वें.

(सूचना प्रकरण)

नंबर १—स्टूल, कोणतेंही चित्र व गणपती, मातीकामासाठीं व पुढें रंगविण्यासाठीं चौरंग किंवा स्टुलाची जरूर अवश्य लागते. करितां खालीं सांगितल्याप्रमाणें स्टूल बनवावें. सुमारें दीड फूट औरस चौरस अशा एक संधी, १ इंच जाडीच्या दोन फळ्या तयार करून एका फळीचें, अर्ध पाऊण फूट उंचीचें व फळीच्या खालच्या बाजूस अगदीं फळीच्या जवळ अशा ४ पट्ट्या व त्या स्टुलाच्या पायांजवळ मुळाशीं पट्ट्या भरल्या करून, असें मजबूत व चारी पायांकडची बाजू वरच्या फळीपेक्षां चारी बाजूनें एकेक इंच चौरस पसरट असें करावें. स्टुलाच्या फळीस मध्य रेषा कल्पून एक दिडकीच्या घेराचा अर्धा फळी पोखरून खळगा करावा. त्याप्रमाणेंच वरच्या फळीचा मध्य कल्पून अर्धी फळी एक रुपया एवढी चौरस पोखरून, त्यांत चौरस खुंटी बसवून, तिचें टोंक एक दिडकीच्या घेराइतकें वाटोळें करून, तें टोंक स्टुलावर बसविलेल्या फळीच्या खळग्यांत शिरतें करून फळीला फळी चिकटे अशा बेताची खुंटी करून बसवून त्यावर ती फळी ठेवून हवी तशी गोल थोडक्या धक्कयानें फिरवितां येते, त्यामुळें आपणास काम करण्यास पुष्कळ सुलभ पडतें. या स्टुलावर माणसाइतकें वजन सहन होऊन फिरवितां येतें. वजनानें फळी घट्ट होऊन फिरेनाशी झाली तर स्टुलाच्या खळग्यांत एक दिडकी किंवा पत्र्याचा तुकडा गोल करून घालावा. म्हणजे ढिलेपणा होतो. याहून

स्टूल उंच उपयोगी नाहीं. वाटल्यास स्टुलाच्या फिरत्या फळीच्यावर, पाट फळ्या घालून, समोर असलेल्या चित्राची उंची हवी तितकी करतां येते.

सू. नं. २—कलमांचा व रंगांचा गोंधळ होऊं नये, याविषयीं विचार वगैरे. रंगांतील कलम धुतल्याशिवाय दुसऱ्या रंगांत बुडवूं नये. तसेंच डिकांतलें शिरसांत व शिरसांतलें डिकात बुडवूं नये. व परस्पर शिरस व डिकांच्या रंगांचें कलमहि ह्यांतलें त्यांत आणि त्यांतलें ह्यांत घालूं नये; धूत रहावीं. व रंग एक जातीचा असला तरीहि डिंकाचा शिरसाचा एकत्र करूं नये. कदाचित चुकीनें एकत्र जाहलाच तर तो दर्शनी बाजूस न लावतां आड बाजूस लावून संपवावा. शिरस व डिंक एकमेकाशीं अगदीं विरुद्ध आहेत. करितां त्या त्या रंगांचे पेले खुणेचे असून अगदीं अलग अलग ठेवावे.

सू. नं. ३—लाकडी घोडी रेखणी वगैरे बारीक रंगाचें काम करतेवेळीं उच्च जातीचे सेबल ब्रश वगैरे कलमें जमिनीवर किंवा बैठकीवर आडवीं केव्हांही ठेवूं नये. त्यांची टोंकें खराब होऊन काम बरोबर होत नाहीं. त्यायोगें, आपली बारीक काम करण्याची उमेद खचते. करितां सात आठ कलमें, केसाचा भाग साधारण जमिनीपासून एक दीड इंच उंचीवर राहील अशा बेताची लांकडाची घोडीअडणी करावी. ती अशी कीं, एक दीड इंच चौरस व सहा सात इंच लांब असें लांकूड तयार करून त्या लांकडाच्या चार धारांपैकीं तिरकस असोर समोरच्या दोहोंकडच्या धारांवर कानशिनें,

जवळ जवळ, खांचा पाडाव्या. सुमारें कलमाचा दांडा त्या खाचींत सहज शिरे, अशा बेताच्या खांचा पाडल्यावर, ज्या अमोर समोर तिरकस धारा राहिल्या, त्यांवरून करवतीनें कापून दोन भाग झाले म्हणजे, त्या दोन घोड्या कलमें ठेवण्यास तयार झाल्या, असें समजावें. याप्रमाणें जरुर असल्यास अधिक कराव्या. मोठीं कलमें ठेवण्यास मोठ्या खांची पाडाव्यां. खांचेची बाजू वरतीं करून ही घोडी ठेवून त्यांतून कलमें केसांचा भाग खाचीकडे व कलमाच्या दांड्याचा भाग जमिनीकडे अशा तऱ्हेनें कलमें, रंगकाम करतेवेळीं या घोडीवर ठेवावीं; जमिनीवर कशीं तरी टाकूं नयेत.

सू. नं. ४—ट्रॅन्सपेरंट रंग दाखविणें म्हणजे पातळ कपड्यांतून दुसरा कपडा किंवा चित्राचें अंग दिसणें. असें रंगकाम करावयाचें असेल तर एकाद्या मनुष्यास पातळ कपडा नेसवून, किंवा अंगांत अगदीं पातळ सदरा घालवून व त्यावरून पातळ दुपट्टा व शेला देऊन आपण त्यास जवळ बसवून त्याचें अंग आंतून कसें दिसतें, व शेल्या दुपट्ट्याच्या आंत सदरा कसा दिसतो व त्या सदऱ्याच्या आंत त्याचें अंग कसें दिसतें ? कोठें अधीक कमी, कोठें उठाव आणि खोलगट सुरकुती, व उठाव, सुरकुती विरहित भाग, शेड व लाईट कोठें, कसा, किती, दिसतो, तें पाहून त्यांतील मर्म ध्यानांत घेऊन रंगकामाचेवेळीं तो देखावा, मूर्तिमंत आपल्या पुढें आहे. असें पाहून रंगकाम करावें. यथासांग सर्वच नाहीं झालें तरी, जें होईल तितकें तरी करावें, पण प्रयत्न सोडूं नये.

असें रंगकाम नीट होण्यासाठीं प्रथमच माती काम रचतांना तीं, आपणास रंगकामाचे वेळीं अडचण पडणार नाहीं. व पडूं नये. अशा तऱ्हेची रचनाच करून माती कामांत तसे तसे भाग दाखवून, सुरकुत्या, उंचवटा, खोलगट, व सपाट, वगैरे भाग माती कामांत तयार करण्याची तजवीज ठेवावी. ट्रॅन्सपेरंट रंग दाखविण्याचें मनांत असलें म्हणजे माती कामांत सुरकुत्या वगैरे फार देतां उपयोगी नाहीं. आंतला भाग दिसावयास पाहिजेच, अशा भागावर माती काम सफाईचेंच ठेवलें पाहिजे. म्हणजे तीं आंतून दिसता रंग करण्याची हौस पुरी होते. स्त्री चित्राच्या आंगावरील कपड्यांतून आतील कपड्याचा भाग दाखविण्यांत चुका फारच होतात, म्हणून माती कामाचा प्रकार वर सुचविला आहे. पातळ पारदर्शक रंग कसे लावावे, तें रंग लावणें प्रकरणांत सांगितलें आहे.

सू. नं. ५ डिंक, शिरस, जिलेटाईन, हे भिजविण्यासाठीं व रंगकामासाठीं गोडें पाणी असावें, खारें मचूळ उपयोगी नाहीं. पावसाचें पाणी फारच उत्तम. महिना दीड महिना रंगकाम चालणारें असेल तर डिंक व शिरस, पुरेसा एकदम भिजत घालूं नये. शिरसास घाण सुटून कमी पडतात, डिंक बोळतो, व तार सुटते, चिकणसपणा कमी होतो, तसाच रंगांत उपयोग केला तर रंग नीटपणें लागत नाहीं. करितां थोडा थोडा भिजत घालावा. त्यावेळीं डिंकाच्या खड्यांवर थंड पाणी घालून तो धुवून टाकून भिजत लावावा. आणि लागेल त्या त्या वेळीं तेलाइतपत पातळ करून घेत जावें. भिजत घातलेला व गाळलेला यावर गच्च झांकण घालूं नयें.

हवा खेळती राहील असें झांकण घालावें. डिंक भिजल्यावर, खडे पांढरपट होऊन फुगतात, व हातास बुळबुळीत लागतात. ते काढून टाकावे, त्यास चिकटपणा नसतो.

शिरसाचे बारीक तुकडे करून खूप कढत पाण्यांत धुवून, कढत पाण्यांतच भिजत घालून झांकून ठेवावा. दुसरे दिवशीं तेलाप्रमाणें पातळ होईल इतक्या बेताचें कढत पाणी घालून बोटानें ढवळून स्वच्छ फडक्यांतून गाळून थंड झाल्यावर मग रंगांत उपयोग करावा. दाटसा वाटेल तेंव्हां ऊनपाणी घालून पातळ करावा. याप्रमाणेंच जिलेटाईनची कृती, शिरस व जिलेटाईन हे पातळ करण्यास, भिजत घालण्यास ऊनपाणी, व डिंकास थंड पाणी असावें. पांढरट रंगांत शिरसाचा उपयोग सहसा करूं नये, तो स्वभावता मलीन असल्यामुळें पांढऱ्या रंगास मलीनपणा येतो. वाटल्यास जिलेटाईन घालून करावा. शिरसाची ताबडतोब जरूर लागली तर अगदीं बारीक तुकडे करून आधण पाण्यांत घालून कलमाच्या दांड्यानें किंवा काठीनें किंवा बोटानें ढवळून, तें पाणी गाळून घ्यावें. डिंक मात्र ऊन पाण्यातून किंवा थंड पाण्यांतून कुवळून तें पाणी उपयोगांत आणलें तर रंग कांहींसा बुळबुळीत होतो. डिंक स्वाभावीकपणानेंच भिजला पाहिजे.

सू. नं. ६–कोणताही रंग लावण्याच्या पूर्वीं तो योग्य झाला कीं नाहीं हें कळण्यासाठीं तो माती कामावर एकाद्या जागीं थोडा लावून पाहून बरोबर बठला अशी खात्री करून मग कोठें तो लावावा.

पेल्यांत ओला असतांना जसा दिसतो, तसा तो लावल्यावर सुकला म्हणजे दिसत नाहीं. घोळून चकाकी (तेजी) आणली तर त्याहून बदल होतो. तसेंच जाड आहे कीं पातळ आहे, दुसऱ्या हातास कितपत दिसेल, शेड, लाईट, दिल्यावर कसा दिसेल, वगैरे प्रकारें बरोबर छाननी करून नंतर लावावा. बहुतेक रंग पातळ लावण्याची संवय ठेवावी. वाटल्यास दुसरा हात द्यावा, आणि मिळवून घ्यावा. पण जाड रंग लावल्यानें खपल्या धरतात. कलमावर कलम चढलें म्हणजे तेथें रेघ दिसते. दाट रंग प्लेन दिसत नाहीं. पातळ झाला तर पुन्हा लावून सुधारतां येतो. फाजील जाड झाला तर खडबडीत दिसल्यामुळें, वेळीं पालीस कागदानें घांसून काढावा लागतो. करितां आरंभीच पातळ करून लावावा. प्रथमचे आडवे उभे पट्टे दिसत असल्यास ते दुसरा हात देतांना तिरकस कलम मारून ते जमवून घ्यावेत.

सू. नं. ७–किनारीवर रंगकाम करावयाचें म्हटलें म्हणजे मोठी अडचण ही कीं, वांकडे तिकडे, उंच, सखल, प्लेन, दुरमोड, ह्या भागावरून, उभ्या, लांब, सरळ रेघा, एकीशीं दुसरी, दुसरीशीं तिसरी, अशा रेघा चार सहा आठ सुद्धां देण्याचा प्रसंग येतो. हेंच काम कठीण पडतें. आंखूड रेघा तेथच्या तेथेंच द्यावयाच्या सोप्या. उभ्या रेघा मारण्याची संवय होण्यासाठीं रिकाम्या वेळांत, एकादें कसें तरी चित्र रचून त्याच्या कपड्यावर किनारीच्या रेघा मारण्याची, व किनारींतील दुसरें काम करण्याची संवय करून, हात स्वाधीन करून ठेवला पाहिजे.

आर्टस्कूलांत रंगकाम शिकलेले उमेदवार लोकांस सुद्धां, मातीकामावरचा उंच सखल, वांकडा तिकडा भाग असल्यामुळें ह्या रेषा मारण्याचें एकाएकीं साधत नाहीं. कारण त्यांस सपाट प्लेटवर काम करण्याची संवय.

नं. ८ वर्ख बसविण्याचे जागीं, चिकोटा व गोल्ड साईस लावावयाचें तें, किंवा गोल्ड पेन्ट लावावयाचें, तें असें कीं, जरीपदरी व जरीकांठीं, वस्त्र दाखवावयाचें असेल त्या वस्त्राच्या किनारीच्या बाहेरची कोर व पदराच्या शेवटचा कांहीं भाग, ह्या ठिकाणीं चिकोटा लावूं नये. वर्ख बसवूं नये. गोल्डपेंट लावूं नये. वस्त्राच्या रुंदीच्या मानानें बाहेरील भाग बेतशीर, वस्त्राचा रंग देण्यासाठीं राखावा.

नं. ९ चायना क्ले, ही चिनाई पांढरी माती गिरणींतील सफेत कापडावर खळ देण्यासाठीं मुंबईस येते. त्यांत उत्तम मध्यम अशी असते. रंग विकणाराकडे मिळते. सफेत्याहून, ही थोडी मळकट आहे. मातीच्या वगैरे चित्रांवर प्रथम सफेता देण्यासाठीं आणि गोरा रंग करण्यास उपयोगी पडते. हिच्या अंगी थोडा गुळगुळीतपणा आहे. करितां फडक्यानें चोळलें म्हणजे थोडी चकाकी येते. पण त्या चकाकीस मलीनपणा दिसतो.

डोळे वगैरे वारनीस लावण्याचे भागावर चायना क्लेचा रंग उपयोग नाहीं. ही माती जड असल्यामुळें पेल्यांत बुडाशीं रांखेसारखी बसते. हिचा व सफेत्याचा पेला जवळ जवळ असले तर वेळीं ह्यातलें कलम त्यांत व त्यांतील ह्यांत असें होतें, म्हणून पेले दूर दूर ठेवावे. तेच तेच शब्द लिहिणें भाग पडल्यामुळें लिहिले आहेत.

सू. नं. १० अभ्रक चांगला स्वच्छ पाहून घ्यावा. तो पाण्यांत भिजत घालून धुवून काढावा. नंतर खडखडीत सुखला म्हणजे त्याचे पापुद्रे होतील तितके सुटे सुटे करून, त्या पापुद्र्याच्या हातानें फाडून वारीक चिरफाळ्या करून त्या चिरफाळ्यांचा हातानें हातावर चुरडून बारीक चुरा करण्याची क्रिया करावी. तो चुरा, गव्हांचा मोठा रवा चाळण्याचे तारेच्या चाळणीनें चाळून, चाळणीतील जाडा चुरा पुन्हा चुरडून चाळावा. हा चुरा अगदीं बारीक पिठीच्या चाळणीनें चाळावा. ' ही चाळणीतून जी बारीक बुकणी पडेल ती उपयोगांत आणूं नये. वरील जाडी पूड गोऱ्या रंगाचा दुसरा हात द्यावयाचेवेळीं पेल्यांत निराळा रंग घेऊन त्यांत ती थोडी मिश्र करून तो गोरा रंग द्यावा. हें गोरा रंग प्रकरणांत सांगितलें आहे. याशिवाय पितांबराचे रंगांत मिसळून लावावा. फुलांचा रंग दिसल्यावर, सिंहाच्या, वाघाच्या, हरणाच्या अंगरंगावर, डोंगराचा सीन असेल त्यांतील ओल्या गवताच्या रंगावर, कमळावर, वगैरे, वार्निसा शिवाय जें रंगकाम साधारण मधून मधून चमकलें पाहिजे, व गुळगुळीत दिसलें पाहिजे, अशा रंगकामावर, अगदीं पातळ डिंकांत ही पूड मिश्र करून सफाईनें झपझप कलम फिरवावें. रंग लावीत असल्याप्रमाणें सावकास लावीत राहूं नये. दाट लागल्या कारणानें, डिंकाच्या योगानें, रंग मलीन दिसतो. अभ्रक पूड सफेत रंगावर लावावयाची असल्यास सफेताच पातळ करून त्यांतच पूड घालून लावावी.

— —

सूचना.

—:०:—

ह्या पुस्तकांतील माहितीच्या कोणत्याही स्पष्टीकरणाचा खुलासा वगैरे मागविणें झाल्यास प्रत्येक वेळच्या उत्तरासाठीं दोन आण्याचीं पोस्टाचीं तिकीटें आगाऊ आल्या-सच उत्तर पाठविलें जाईल.

शुद्धीपत्रक.

ज्या ज्या ठिकाणीं " ज्यूनीयन् व एमल्ड " हें शब्द पडले आहेत त्या त्या ठिकाणीं "जेन्युइन् व एमरल्ड" असे शब्द वाचावे.

पान नंबर.		अशुद्ध.	शुद्ध.
३		फ्यूअर	प्यूअर
५		क्रिस्टर	क्रिस्टल्
५		घेग्टणी	घोटणी
९		सिद्धिस	सिद्धीस
१२	ओळ १९	कषडा	कपडा
१२	,, २२	भातीचे	मातीचे
१३	,, १८	षट्टूं	पट्टूं
१७	,, ३	करता	करतो
३१	,, २१	आवडींवर	आवडीवर
३२	,, ९	लावाला	लावावा
३४	,, ३	छान	छानदी
३७	,, ९	द्याया	द्यावा
६९	,, १९	चिना	चायना
७२		कागांवर	कामावर
७७		वृद्ध	वृद्ध
८१		पळीवरच्या	फळीवरच्या
८२		निःक्रपटपणें	निष्कपटपणें

विनंतीः—मला इंग्रजीचें ज्ञान नसल्यामुळें व कित्येक ठिकाणीं पुस्तक छापतांनाही वेलांट्या मात्रा विराम चिन्हें उडालेलीं आहेत त्याबद्दल वाचकांनीं माफी करावी.

गो. वि. गोखले.

